



नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

चित्रकार दीनानाथ दलाल ह्यांनी सन १९४७ ते १९७१ दरम्यान प्रसिद्ध केलेल्या दीपावली ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीय स्वरूपात जतन करण्याबाबतचा प्रस्ताव चित्रकार दीनानाथ दलाल मेमोरिअल समिती, मुंबई ह्या संस्थेद्वारे राज्य मराठी विकास संस्थेस प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावानुसार दुर्मिळ मराठी ग्रंथांचे संगणकीकरण ह्या प्रकल्पांतर्गत दीपावली नियतकालिकांचे अंक संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात राज्य मराठी विकास संस्थेद्वारे सहमती दर्शविण्यात आली.

चित्रकार दीनानाथ दलाल मेमोरिअल समिती, मुंबई ह्या संस्थेद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला ही सामग्री संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहे.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.


१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व चित्रकार दीनानाथ दलाल मेमोरिअल समिती, मुंबई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.


स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व चित्रकार दीनानाथ दलाल मेमोरिअल समिती, मुंबई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.





अनुक्रमणिका



राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत






खास प्रौढ पुरुषांसाठीं

अनुक्रमणिका


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास








दीपावली


वर्ष १६ वें : वर्षारंभ अंक

खास (प्रौढ) पुरुषांसाठीं




श्रेयनामावलि

• **शामराव ओक**–अखिल भारतीय पीडित पति–मेला • **पु. ल. देशपांडे**–फिल् मिडस्ट्रीतला नामू • **विजय तेंडुलकर**–दोन बाह्यांचा स्वेटर • **बाळ गाडगीळ**–एका जंक्शन दादल्याची मुलाखत • **बाळ सामंत**–घरगुती भांडणावर आसवें आणि अरिष्टें • **प्रा. चंद्रकांत इंदापुरकर**–गरोदरपणाचें महाभारत • **वि. आ. बुवा**–बायको माहेरीं गेल्यावर झटपट स्वयंपाक कसा करावा • **गोपाळकृष्ण भोबे**–कृपासागरा तुज विनवितो • **राजा वढे**–किती फितुर बायका • **कोंडबा**–मूठ व मिठी, स्त्री व इस्त्री, गृहराज्ञी, तडजोड • **नवरंग**–बायकी चिमटे, नवरा म्हणूं नये आपला, आय्. ॲम्. ॲस् ची परीक्षा, विवाहितांसाठीं व्यायाम • **वृंदा लिमये**–लक्ष्मीनारायण • **सौ. दमयंती सरपटवार**–सुभगा वात्स्यायनीचे अष्टनायक • **शांता शेळके**–कुठें गेले ते पुरुषोत्तम नवरे • **सौ. इंद्रायणी सावकार**–नवरा 'एक सिंहावलोकन' • **विजय्या राजाध्यक्ष**–गेले ते दिवस • **सौ. नलिनी सुखठणकर**–स्त्रियांच्या मार्गातील धोंडा 'पुरुष' • **राम गणेश गडकरी**–स्वयंपाक घरांतील गोष्टी (जुन्यांतले सोनें) • **मधु कर्णिक**–कौटुंबिक विनोद • **य. वा. शास्त्री**–शतगुणी तांबुल..



संपादक-मुद्रक-प्रकाशक : श्री. दीनानाथ दलाल, दलाल आर्ट स्टुडियो ४०–४२ केनेडी ब्रिज, मुंबई नं. ४. प्रत्येक प्रतीस किंमत रु. १. आणे. रजिस्टर पोस्ट ५० नये पैसे. वार्षिक वर्गणी दिवाळी अंकासह रु. १२॥ या अंकांत प्रसिद्ध झालेली मतें चालकांची [illegible] मतें असतातच असें नाहीं.








अनुक्रमणिका



अनुक्रमणिका







भारतीय संस्कृतीचीं प्रतीकें : ११ • लक्ष्मी-नारायण

लक्ष्मीलालितपादपङ्कजयुगं भोगीन्द्रभोगासनम्
क्षीर[illegible]र्णवबिन्दुभिः परिवृत्तं कारुण्यकल्पैः सदा
ना[illegible] [illegible]न्तरगिल [illegible] नि-
व्या[illegible] नंदितविश्वमाद्यमनघम् वन्दे मुकुन्दं [illegible]मु ॥

शेषाधिष्ठित जो, प[illegible] चु[illegible] लक्ष्मी जयाच्या [illegible]ति
कारुण्ये द्रवलाच [illegible] गमतसे क्षारा[illegible] सिंचित
ब्रह्मा विश्वविनिर्मिता सृजि तया जो नाभि[illegible]
विश्वानंदन आद्य निष्कपट त्या विष्णुस हे वन्द[illegible]

— [illegible] लि[illegible]



आधी केलें मग सांगितलें

दीपावलीचा हा वर्षारंभ अंक वाचकांच्या हातीं देतांना आम्हास अत्यंत आनंद होत आहे. गेल्या वर्षी दीपावली मासिक स्वरुपांत सादर करतांना हें हातीं घेतलेलें कार्य यशस्वी होईल कीं नाहीं याबद्दल आम्ही, आमचे मित्र जरासे साशंक होतों. कारण दीपावली वार्षिकाची गेल्या पंधरा वर्षांची परंपरा आणि लोकप्रियता लक्षांत घेऊन मासिकाची आंखणी करण्याची अवघड जबाबदारी आमच्यावर होती.

—आणि त्यामुळें मागें वळून पाहातांना या अवघड जबाबदारींतून बऱ्याच अंशीं मुक्त झाल्याचें समाधान लाभत आहे. अर्थात् या अपेक्षापूर्तीच्या मागें दीपावलीच्या पाठीशीं असणाऱ्या धुरंधर लेखक मित्रांचे सहकार्य आणि मार्गदर्शन होतें याचा अवश्य निर्देश केला पाहिजे. त्यांतील कांहीं निकट अशा साहित्यिक मित्रांनीं 'आम्ही आपल्या पाठीशीं आहोंत' असें जाहीर लेखी आश्वासन दिलें आणि तें सातत्यानें पाळलें. यामुळें दीपावलीला उत्तम साहित्याचा कधींच तुटवडा पडला नाहीं.

—कारण दीपावलीच्या वाङ्मयप्रांतांत कसलाच सवतासुभा नव्हता. दीपावली कोणत्याहि पंथाचा अगर संप्रदायाचा गंडा बांधीत नाहीं. कोणत्याहि विशिष्ट गटांत दीपावली असूं इच्छित नाहीं. सर्व लेखकांना आणि सर्व वाङ्मयीन सांप्रदायिकांना दीपावलीनें सारख्याच ममत्वानें वागवलें आहे नवें आणि जुनें [illegible] भेदभाव [illegible] करीत नाहीं. नव्याचा योग्य तो पाठपुरावा आणि जुन्याचा [illegible] आदरभाव दीपावलीनें कसोशीनें राख[illegible] [illegible]चें मासिक 'दर्जेदार' आहे अशी घोषणा [illegible] [illegible]धींच केली नाहीं—तर तें वाचकांचेंच आहे अस[illegible] [illegible], त्यांच्या आवडीनिवडीकडे तत्परतेनें लक्ष पुरवून [illegible]नुसार जास्तींत जास्त निकोप, निरोगी आणि उत्तम अभिरुचीचें [illegible]त्य वाचकांना सादर करण्याचें धोरण सदैव ठेवलें.

—आणि या दृष्टीनें दीपावलीनें आपल्या कामगिरींत कुचराई [illegible] नाहीं असा [illegible] निःपक्षपाती वाचकांनीं निर्वाळा द्यावा.

[illegible] अंतरंगांतील चमत्कृति आणि वैविध्य [illegible] पराकाष्ठा केली. गुर्जर-खांडेकरांपासून भावे-गोखल्यांपर्यंतच्या सर्व कथाकारांच्या कथा दिल्या. मराठींतील प्रमुख ललित लेखक आणि विनोदी लेखक यांचें दीपावलीला नेहमींच पाठबळ मिळालें. दीपावलीचीं वेगवेगळालीं सदरें म्हणजे कुणाचेंच अनुकरण नसून दीपावलीचेंच स्वतंत्र वैशिष्ट्य होतें. महाराष्ट्र दर्शना-द्वारें दीपावलीनें आपलें अपरंपार महाराष्ट्रप्रेम व्यक्त केलें. भारतीय, लोकनृत्यें आणि भारतीय संस्कृतीच्या प्रतीकांचें चित्ररूप दर्शन करविण्यांत भारताची संस्कृति आणि लोककला यांची ओझरती ओळख करून देण्याचा एक छोटासा प्रयत्न केला. 'परमेश्वर आणि मी' या सदरांत तर महाराष्ट्रांतील विविध क्षेत्रांतील नामवंतांनीं आपले अनुभव मोठ्या मनमोकळेपणानें सांगितले आणि ते वाचकांना फारफार आवडले. 'माननीय व्यक्ति' या सदरांत दीपावलीनें अनेक देशीपरदेशी महान् विभूतींची निराळ्या तऱ्हेनें ओळख करून देण्याचा प्रयत्न केला. आणि 'भाषा मराठी'च या सदरांत मातृभाषेचें प्रादेशिक दर्शन घडविलें. 'पाणपोई' हें सदर तर खास वाचकांचेंच आणि तें इतकें लोकप्रिय कीं त्यासाठीं एक खास अंक काढावा एवढ्या प्रश्नांचा मारा वाचकांनीं एका महिन्यांतच केला. मराठींतील पुस्तक परीक्षणें वाचकांना समजतील अशा भाषेंत पण निर्भीड असावींत या हेतूनें स्फूर्तीचीं फुलें हें सदर सुरू केलें. हें करतांना दीपावलीनें आपल्या मित्रांचाहि अनेकवेळां रोष ओढवून घेतला. दीपमाला हें सदर सध्यां आहे त्यापेक्षां अधिक भरीव आणि वाचनीय करण्याचा संकल्प आहे.

या सदरांशिवाय इतर मजकुरांतहि वेगळेपणा राखण्याचा अखंड प्रयत्न केला. चंद्रसेन यांच्या रहस्यमय सत्यकथा' हें दीपावलीचेंच एकमेव वैशिष्ट्य. प्रा. काणेकरांचें रंगतदार प्रवासवर्णन, प्रभाकर पाध्यांच्या प्रवासकथा, निरनिराळ्या लेखकांच्या एकपानी कथा नामवंत कवींच्या कविता, 'जुन्यातलें सोनें' हे खऱ्या अर्थानें अभिनव सदर, लोकनृत्यांवराल लेखमाला इत्यादि साहित्य म्हणजे दीपावलीनें कसें वैचित्र्यपूर्ण मनोरंजक साहित्य सादर केलें याचा पुरावाच.

आणि यामुळें [illegible]नीं जें सहकार्य दिलें त्यानें उत्साहित होऊन यावर्षींहि नवे नवे प्रयोग करण्याचा आमचा विचार आहे.

गेल्या वर्षी ज्या लेखकमित्रांनीं आम्हाला सहकार्य दिलें त्यांचे मनःपूर्वक आभार. विशेषतः प्रा. मं. वि. राजाध्यक्ष, ग. दि. माडगूळकर, अनंत काणेकर, न. र. फाटक, सदानंद रेगे, अच्युत बवें, शां. शं. रेगे आदि लेखकमित्रांनीं नेहमींच उपयुक्त सूचना आणि मार्गदर्शन केलें. टॉम ॲण्ड ब्रे चे चालक श्री. गणेशराव तांबे यांचे जागतें सहकार्य होतें, तर बॉम्बे प्रोसेस स्टुडियोचे श्री. मोहनराव कामत, श्री. श्री. स. दाभोळकर. जगदीश्वर प्रेसचे श्री. भालचंद्र पाठक, आमचे नवभारत प्रेसचे चालक श्री. चिंतामणी देसाई. या सर्वांच्या सहकार्यावर, दीपावली [illegible] आकर्षक होईल असा विश्वास वाटतो. पण आधीं केलें [illegible] सांगितलें या न्याया[illegible] अनुसरून जें करणार आहोंत त्याचा [illegible]दरच वाच्यता कशाला म्हणून [illegible] येथेंच वाचकांची रजा घेतों.

—दीनानाथ



फाल्गुन शके १८८१ मार्च १९६०

कृपासागरा तुज विनवितों....

हे शेषशाई भगवंता, तुझ्या नाभिकमळांतून उत्पन्न झालेल्या ब्रह्मदेवानें तुझ्या आज्ञेनें सृष्टि उत्पन्न केली. त्या सृष्टीवर हल्लीं सातव्या मनूचें वैवस्वत मन्वंतरांतलें, 'विकारी नाम' संवत्सर चालू आहे. (हें तुला सांगायला नकोच!) तेव्हां तुझी 'सहस्र नामें'—विस्तारभयास्तव मनांतल्या मनांत म्हणून, तुला आवाहन करून कांहीं विनंत्या करीत आहे. तरी हे भक्तवत्सला, मान्य करून घे! दयानिधे, सांप्रतच्या 'विकारी नाम' संवत्सरांत, यथानाम तथाकृति असें, पूर्णपणें साधनशुचितेपासून अलिप्त असलेलें, कामविकृतीचा आविष्कार करणाऱ्या विकाऊ वाङ्मयाचा पुरस्कार करणारें कांहीं लिहिल्याबद्दल तूं आम्हां सरस्वतीभक्तांना क्षमा कर! योगक्षेमासाठीं केवळ हें आम्हांला करावें लागलें. हे नारायणा, बुद्धिदाता तूंच आहेस; परंतु हे माधवा, ज्यांनीं हें आधीं बाजारांत मांडलें—आणि आम्हीं केवळ दीक्षा घेतली—त्या अमेरिका देशावर तुझी अधिक कृपा आहे. किंबहुना आमच्या पंचवार्षिक, दशवार्षिक विकासांच्या योजनांसाठीं आम्हांला मदतीसाठीं त्यांच्याचकडे हात पसरावा लागत आहे. तेव्हां अन्यायी कोण याचा निर्णय तूंच दे!

अच्युता, आम्हीं भारतीयांनीं, संस्कृति संस्कृति म्हणून—तुला भिवून फक्त आक्रोश चालवलेला आहे. आमच्यावर आम्हीं अनेक निर्बंध लादून घेतलेले आहेत. संस्कृतीला विघातक असें कोणतेंच कृत्य आम्हीं करत नाहीं. (केलें तर घाबरून करतों ही गोष्ट वेगळी) आणि कसलाच [illegible] नसलेल्या एका देशानें तर हल्लीं तिन्हीं लोकांत विलक्षण [illegible] उत्पन्न केला आहे. ज्यांच्या [illegible] पडद्यांत तुला [illegible] आहे, त्यांना तूं असें शिरजोर करूं शकतोस ! आणि [illegible] आणि तुझ्यांत कसलाच आडपडदा नाहीं अशा [illegible] मात्र सर्व लोकांनी—खुद्द आम्हीहि—'दरिद्री देशांतले' मानावें हा दैवदुर्विलास नाहीं काय? नारायणा, ज्या भूमीवर तूं नऊ अवतार घेतलेस, त्या भूमीला हल्ली हे असे काय दिवस यावेत?

हे माधवा, केवळ आस्तिकांनाच तूं पावतोस असा विश्वास धरावा, तर नास्तिकांचें देखील तूं कोटकल्याण केलेलें आहेस! आज रशियाच पाहा. पृथ्वीवर तर त्यांचें साम्राज्य आहेच; परंतु तूं निर्माण केलेल्या आकाशस्थ चंद्र-मंगळावर सुद्धां ते वर्चस्व गाजवूं लागले आहेत. हे आदिदेवा, तूं आपल्यासारखेच त्यांनाहि 'ग्रह' निर्माण करायला शिकवलेस, त्यामुळें इतरांचा मात्र तुझ्याबद्दलचा ग्रह वाईट झाला. सध्यां तर रशियाचा एक उपग्रह पृथ्वीभोंवतीं फिरतो आहे. बहुधा ते तुझाच शोध करीत असावेत. हे मधुसूदना, तूं शेषावर झोंपलेला आहेस आणि शेषाच्या डोक्यावर पृथ्वी आहे, अशी आपली आम्हां भोळ्याबापड्यांची कल्पना. तेव्हां हे शेषशाई, त्यांना [illegible] देऊन, पृथ्वीबद्दलचा आमच्या पूर्वजानीं लावलेला शोध खरा कर. जगदात्म्या, अजून आमच्याकडून एकहि 'शोध' पुरा झालेला नाहीं. आमच्या पंतप्रधानांनी 'भारताचा शोध' नांवाचें एक पुस्तक लिहिलें; पण त्यांत दिलेल्या नकाशानें भलतेंच संकट ओढवलेलें आहे. त्या संकटापासून आमचें रक्षण कर!

वासुदेवा, तूं 'नलगे त्याग जपतपासि न [illegible]' असा आहेस. 'केवळ नामेंकरूनि तरति' असाहि तुझा [illegible] आहे. वारंवार मुखांतून तुझें नांव घेणाऱ्या आम्हाला या [illegible] [illegible] आम्ही एकमेकांचा द्वेष करूं; परंतु तूं तिकडे डोळेझांक कर. देवाधिदेवा, ढोंगी लोकांना सद्बुद्धि दे, त्यांच्यांत अस्मिता जागृत होऊं दे. हाती घातलेलीं धरणें पुरीं होऊं दे, खेड्यापाड्यांत सुखाचे दिवस येऊं दे. धरण बांधणीच्या कामांत असलेल्या तुझ्या अधिकाऱ्यांनी पैसे खाण्याची दुर्बुद्धि देऊं नकोस. [illegible] असलेल्यांना लांच खाण्यापासून परावृत्त कर.

[अनुक्रमणिका](#)

श्रीकृष्णा, ज्या हस्तिनापुरांत तूं 'गीता' सांगितलीस आणि जें तुझ्या पदस्पर्शानें पावन झालें तिथें हल्लीं काय चालले आहे, याकडे जरा लक्ष दे.

हे जगदात्म्या, सध्यां तरी तुझी कृपादृष्टि पाश्चात्यांकडेच फिरवळलेली आहे. तितली प्रत्येक गोष्ट आम्हांला हल्लीं चांगली वाटूं लागली आहे. तिथलें साहित्य, तिथली चित्रकला, तिथलें संगीत, तिथलें तंत्र वगैरे सर्व कांहीं आम्ही शिरोधार्य मानायला लागलों आहोंत. आतां हेंच पहाना, तिथले लोक आपल्या एखाद्या जुन्या साहित्यिकाबद्दल किती आदर दाखवतात, जगभर त्यांचा उदोउदो करतात, 'शेक्सपियर' काय 'चेकोव्ह' काय, त्यांच्या पुण्य-तिथींचे पडसाद या इथे उमटतात. आणि भारावून जाऊन आम्हीं सुद्दां त्यांच्याबद्दल रकानेच्या रकाने करून स्तुति-सुमनांचा वर्षाव करतों; परंतु आमचे सारे त्यागी-विरागी संतकवि भागवतधर्माचा प्रसार करतां करतां विराट स्वरूपांत विलीन झाले. त्यांनीं निर्माण केलेलीं महाकाव्यें ही काव्येंच नाहींत, किंवा खुद्द 'ते' कवि या संज्ञेला देखील पात्र नव्हते, असें कांहीं विद्वानाकडून अलिकडे वारंवार पुरलें जातें. देवा त्या विद्वानांना सद्‌बुद्धि दे. जुन्या लोकांची नाचक्की करणें हें त्यांना स्वतःचें आस्तित्व सिद्ध करायचें 'साधन' वाटतें; कृपाकरून त्यांना दुसरा एखादा मार्ग दाखव !

प्रभो, तूं अनंत आणि तुझीं नामेंहि अनंत; परंतु प्रत्येक नाम तुझ्या पराक्रमानें तूं सार्थ केलेलें आहेस किंबहुना आधीं पराक्रम आणि नंतर नामाभिधान असेंच तुझ्या बाबतींत झालेलें आहे. आमच्या बाबतींत मात्र सारा उलटा प्रकार आहे. वाटेल त्या वेळीं वाटेल तसे आम्हीं नामधारक होऊं शकतों. त्याला धरबंध नाहीं. कुणीहि शेंबड्या पोरानें थोरामोठ्याची सहज टोपी उडवावी. स्थिर चित्त आणि अनुभवी जसे जाणते, विचारे मूग गिळून स्वस्थ आहेत. विरोधी असा आवाज उठवावा तर आंगलट येण्याची भीति. अधोगतीच्या दाराशीं असलेले धडधडीत दिसत असतांना, स्थितप्रज्ञ राहाण्याखेरीज त्यांना गत्यंतर नाहीं. या युगांत सहज कुणी आचार्य होतो, कलानिधी होतो, इतिहासभास्कर होतो, भू गंधर्व होतो, स्वतः बंड करावें, म्हणवून घ्यावें. कांहीं म्हटल्या कांहीं मर्यादा राहिली नाहीं. म्हणून हे मर्यादा पुरुषोत्तमा आमची मर्यादा आम्हांला कळावी, अशी, बुद्धि दे !

विश्वंभरा, एके काळीं आम्हां हिंदवासियांचा 'सुवर्ण भूमितले लोक' असा उल्लेख होई. 'कोलंबस' ही सुवर्णभूमि शोधायला निघाला. त्याला तूं दाद लागूं दिली नाहींत ; पण तुझ्याच कृपेकरून निघालेला 'वास्कु द् गामा' यशस्वी झाला, आणि त्याच्या मागें आमच्या देशावर हक्क सांगणाऱ्यांची रांग लागली. त्यामुळें झालें काय कीं इथलें सारें सुवर्ण गेलें, व भूमि तेवढी शिल्लक राहिली.


स्वतंत्र हिंदुस्थानला पुनरुपी तसे दिवस यावेत असें सामर्थ्य दे !

हे चक्रपाणी, नाना तऱ्हेच्या संपांनी आहीं बेजार झालों आहोंत. अणु, हाइड्रोजन सारख्या संहारक स्फोटक गोळ्यांमुळें, पोटांत भीतिचा गोळा उठलेला आहे. तें भय दूर करून, जगाच्या कल्याणासाठीं त्याचा उपयोग करण्याची त्यांच्या निर्मात्यांना सद्‌बुद्धि दे.

लक्ष्मी नारायणा, पुढील 'शार्वरीनामक' संवत्सराच्या प्रारंभीच मुंबईसह संयुक्त–महाराष्ट्राचें स्वप्न साकार होणार आहे. आतांपर्यंत–सुदैवाने–आमच्यांत–विशेषतः मराठी साहित्यिकांत, हेव्या दाव्याला तोटा नव्हता, तरी "तेजस्विना वधीत मस्तु मा विद्विषा वहै ॥" हें आमचें मागणें मान्य करून घे !

आमच्यांतले हेवे दावे नष्ट होऊं दे, आणि सखोल, सघन, वरच्या पातळीचें कसदार, टोंकदार असें साहित्य साहित्यिकांकडून निर्माण होऊं दे. आणि चांगले दिवस आले म्हणजे तें आपोआप निर्माण होईलच !

— गोपाळकृष्ण भोबे






पु. ल. देशपांडे

निःसंग, कोडगा, कोरडा,
कपड्यांच्या जगांत वावरूनहि
नागवा, कसलाहि विधि-
निषेध न पाळणारा; परंतु
तरीहि हवासा वाटणारा
असा हा—

फिल्मिंडस्ट्रींतला नामू !

"**ना**मू चालता हो ! पुन्हां तोंड दाखवूं नकोस–" नामू परटाला माझें हें वाक्य नवीन नाहीं. माझे कपडे त्याच्याचकडून फाटले किंवा गहाळ झाले पाहिजेत असे माझ्या कुंडलींत ग्रह आल्यापासून दर महिन्यांतून कमीत कमी दोनदां तरी तो हें वाक्य ऐकतो, आणि शांतपणानें म्हणतो, वैनी कापडं काडा–!" हा इसम संत व्हायचा तो परीट कसा झाला ह्या विचारांत मी पडतों. असला निस्संग माणूस माझ्या पाहण्यांत नाहीं.

नामूची माझी [illegible] कोल्हापुरला एका चित्रपट कंपनींत पडली. अजूनहि "आम्[illegible] पी. एल्. साहेब यकदमच फिल्मिंड्रींत आलो" असें [illegible] माझ्या पाठीवर दहा ठिकाणीं बोलिलेलें मला ठाऊक आहे. प्रत्येक प्रश्नाला तो जितकीं स्वच्छ उत्तरें देतो तितके स्वच्छ कपडे धुता तर काय बिघडलं असतं ! पण नाहीं. त्यानें इस्त्री केलेल्या कपड्यांना जितक्या सुरकुत्या असतात त्याच्या एकदशांशानें चेहऱ्यावर न पाडतां तो वाटेल त्या अवघड प्रश्नांना तोंड देत असतो. एखाद्या नटाच्या थाटात तो 'माझ्याकडे सध्यां [illegible] पिक्चर हाइत्" असें ऐटींत सांगत असतो. म्हणजे आठ चित्रांतल्या नटनटींचे आणि डायरेक्टर, क्यामेरामनचे कपडे, नामूच्या भाषेंत 'कापडं' तो धूत असतो. मी चित्रपट सोडून दिला. नामू मात्र अजून फिल्म लाइनमध्येच आहे. कोल्हापुराहून आतां त्याचें पुण्याला स्थलांतर झाले [illegible] त्यानें, दिग्दर्शकांना पान सिगरेटी आणून देण्याच्या '[illegible]शिष्टनें [illegible] 'डायरेक्टर' झाल्याचें पाहिलें आहे. त्यापैकीं कांहीं जणांनीं पुढे [illegible] लौकिक मिळवला तरी नामूच्या लेखी कुणी '[illegible]' तर कुणी '[illegible]' असेच आहेत. धोब्यानी कपड्यांची बटणें तोडून आणणें [illegible] समजूं शकतो किंबहुना बटणें तोडणें हा धोब्यांच्या [illegible] मूळ आहे. परंतु नामूची लीला फार वरच्या दर्जाची आहे. [illegible] आणि एक दिग्दर्शक कथानकावर चर्चा करीत बसलो होतो. [illegible]

कपड्यांचा गठ्ठा घेऊन आला. अंगांत झकास शर्ट होता. आमचे लक्ष त्याच्या शर्टाकडे गेलें. मी त्याला विचारणार इतक्यांत दिग्दर्शक ओरडले—

" नाम्या गाढवा माझा शर्ट ? "

' बराबर आला माझ्या अंगाला '—नामू कपड्यांच्या शांतपणे थंड्या रचीत म्हणाला.

" लाज नाहीं वाटत,...ठेवून दे ते कपडे ! चालता हो..."

' भरीच्या पण...साहेब नवीन कंत्राट झालं आपलं. डझन शर्ट शिवाल की असले..."

' अरे पण न विचारतां शर्ट चोरायचा म्हणजे...' संतापानें दिग्दर्शकाला संपूर्ण डायलॉग सूचेना.

" साहेब चोरला असता तर तुमच्याकडे घालून कशाला आलों असतों—पी. यल्. सायब तुम्हीच बगा ! "

" आम्ही काय बघा ? लेका दुसऱ्याचें शर्ट परस्पर पळवायला नेमलाय काय तुला ? "

" खऱ्याची दुनिया नाहीं साहेब ! "

" खऱ्याच्या दुनियेचा तुझा काय संबंध ? "

" मी डूबायलाक म्हटला साहेब ! " नामूच्या हिशेबी कांहीं चतुर बोलणं म्हणजे ' डूबायलाक ' म्हणणं होतं.

" कसला डायलॉग ? "

" सायबांच्या नव्या पिक्चरचं नांव ' खऱ्याची दुनिया ' हाय का ?"

" हा डायलॉग होय ? "

" ष्टोरी कॉमिक हाय का रडारड ? "

" तुला काय करायचय् ! "

" बाकी तुम्ही ष्टोरी लिवनार म्हनजे कामिकपनाचीच असनार ! साहेब कपडे काडा..."

" कपडे बिपडे काय मिळणार नाहींत..."

" काष्ट काय पी. एल्. सायब सुलोचना का हंसाबाई..."

" तुला घेऊन काढतों पिक्चर "

" प्रत्येक पिक्चर मदी हाय तुमच्या ! "

हेंहि खोटं नव्हतं ! नामूनें अनेक मॉबसीनमधें कामें केली आहेत. कुठे पानवाल्याच्या गिऱ्हाइकांच्या घोळक्यांत, थेटरांतल्या ऑडियन्समधें कुणाचा तरी धुवायला आलेला सूट घालून, ऐतिहासिक चित्रपटांत ' हरहर महादेव ' करीत हातांत ढालतलवार घेऊन नामू हजर आहे. निर्माती देखील एक्स्ट्राचे पैसे वाचले म्हणून खूष ! हा नामू म्हणजे मला एक कोडं आहे. इतका कोडगा माणूस मी अजून पाहिला नाहीं. कपडे [illegible] विशिष्टवारीं आणून दिले आहेत. [illegible] फक्त [illegible] जायचंय अशी दहावेळां [illegible] कधी [illegible] तो देखील बहुधा गाडी [illegible] वेळेला ! आयत्यावेळीं फलाटावर कपडे आणून देऊन [illegible] करायची [illegible] त्याला कांहीं आसुरी आनंद मिळत असेल.

" काल कपडे आणून देतो [illegible] आणि आळास कां नाहीं ? "

(पान ६१ वर पुढें चालू)



किती फितुर वायका

कथितो तुजला आजकालच्या रुप अग्रनायिका
रसिक हो, किती फितुर वायका
घराघरांतुनि जिचे पवाडे गाती शुकसारिका
आजच्या कुलीन अभिसारिका ॥ धृ० ॥

एकावरती नजर ठेउनी, खुणवी दुसऱ्यास जी
करी जी प्याद्यासहि फर्जी
ही पहा हंसिनी तुडवि पती पदतलीं
शृंगारपद्मिनी भृंगावर भाळली
ही महाशंखिनी शंख करी दिनभरी
तया लोळवी, झुलवी फसवी—महानगरपालिका
रसिक हो, किती फितुर वायका ॥ १ ॥

ही वासवसज्जा, कलहान्तरिता कुणी
संगमोत्सुका ही बघत वाट निशिदिनीं
परपुरुष आळवी गृहिणी सहचारिणी
फिरतां पतिची पाठ,—प्रेमळा ही प्रेषित भर्तृका
करी उत्कंठित मनकर्णिका ॥ २ ॥

सात पावलानंतर पडतें वाकडेच पाऊल
देतसे काळाची चाहुल
धर्मार्थास्तव पती पूजिला कर्मास्तव प्रियकर
साधिते बन्धमोक्ष सुंदर
ती पहा कालची विलासिनी प्रेमला
तो पती असोनी डोळे हो आंधळा
शिर घेई हातीं तिनें कापतां गळा
सोडुनिया संसार, चालवी समाज संचारिका
प्रीतिची सवंग परिचारिका ॥ ३ ॥

चिठी चपाटी, भेट चोरटी, परिपाठी ही नवी
प्रियकरा पतिसन्मुख चानवी
देतांच वोट धरि मनगट ती स्वैरिणी
ये अंगलटीला कुलीन कलहंसिनी
या दंभयुगांतिल रोजेची कामि[illegible]
पतीसमोंजी जळती जिव्हा, दुजास सुखचा[illegible]का
अशा या किती फितुर वायका ॥ ४ ॥

— राजा बढे



पारितोषिकांची योजना.

उच्चभ्रू टीकाकारांच्या मतांपेक्षां सर्वसामान्य वाचकांचेंच मत मोलाचें. त्यामुळें मराठींतील वाचकांची अभिरुचि जाणून घेण्याच्या दृष्टीनें ' दीपावलीनें ' ही पारितोषिकांची योजना आंखली आहे. या योजनेंत सर्व वाचक सहभागी होऊन सहकार्य देतील ही आशा.

- पुढें एक विनामूल्य कूपन दिलें आहे. तें १० मार्च १९६० पर्यंत भरून पाठविणाऱ्या वाचकांच्या निवडीची नोंद घेण्यांत येईल.
- **दीपावली** मार्च ५९ ते फेब्रुवारी ६० पर्यंतचे (खास अंक धरून) सर्व अंक वाचून त्यांतील सर्वोत्कृष्ट साहित्याची नोंद करायची.

कूपन

१ ____________

२ ____________

३ ____________

४ ____________

नांव ____________

संपूर्ण पत्ता : ____________

योजनेच्या सर्व अटी मला मान्य आहेत.

सही ____________

- वाचकांनी आपल्याला आवडलेली उत्कृष्ट गोष्ट क्रमांक १, सर्वोत्कृष्ट ललित, विनोदि अगर विचार प्रवर्तक लेख—क्रमांक २, सर्वोत्कृष्ट कविता—क्रमांक ३, सर्वोत्कृष्ट इतर साहित्य (यांत प्रवासवर्णन, शरीरस्य कथा रम्यः, दीपमाला, मूर्ति लहान कीर्ति थोर, तिथें बदलला सौधा, क्रिकेट विषयक, माननीय व्यक्ति अगर अन्य कांहीहि)—क्रमांक ४ याप्रमाणें निवडून कूपनामध्यें त्याची नोंद करून पाठवावी.
- येणाऱ्या एकंदर कूपनांतील क्रमांकाच्या बहुसंख्येनें ज्या ज्या लेखकांचा क्रमांक लागेल त्या त्या लेखकांना पुस्तक रूपानें विशेष मानधन देण्यांत येईल.
- या अंतिम निवडीची अचुक नोंद असलेल्या प्रेषकानां दीपावलीचे एक वर्ष (विनामूल्य) वर्गणीदार करण्यांत येईल. बक्षिसपात्र वाचक अगोदरच वर्गणीदार असल्यास त्यास पुस्तक रूपानें पारितोषिक देण्यांत येईल अगर त्याच्या नांवे इतर कोणा मित्रासहि अंक वर्षभर पाठविण्यांत येईल.
- कोणत्याहि कारणानें एकादें कूपन रद्द करण्याचा अधिकार संपादकांस राहील. रद्द कूपनाबद्दल पत्रव्यवहार केला जाणार नाहीं.
- संपादकांचा निर्णय अखेरचा.
- एप्रिल ६० च्या अंकांत निर्णय जाहीर करण्यांत येईल.

अनुक्रमणिका

बायकांचें फाजिल वाढणारे वर्चस्व दूर करण्यासाठीं सर्व सनदशीर व इतर मार्गांनीं झटत रहाण्याचें व पतींना पत्नीकडून होणाऱ्या जाचाचा कडक बंदोबस्त करण्याचें, हिंद पति-सहकार (मर्यादित) अभिवचन देत आहे !...



स्वातंत्र्याच्या सर्व चळवळींत मुंबई नेहमीं आघाडीला राहिली आहे, हें पाहतां भारतातील पराधीन नवऱ्यांच्या विमोचनाचें आंदोलन इथल्या बहुरंगवाडीत सुरू व्हावें ही गोष्ट इतिहासाला धरूनच झाली. देशाला व त्याबरोबरच स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाल्यापासून परतंत्र बनलेल्या पतींचा धुमसत राहिलेला असंतोष पेट घेण्याची वेळ येत आहे असें पत्नी-पीडित समाजनिरीक्षक पुटपुटतच होते. बहुरंगवाडीतल्या त्या घटनेनें पुरुषांच्या स्वातंत्र्य चळवळीचा मुहूर्त झाला असेच भावी इतिहासकारांना लिहावें लागेल.

मुंबई हे बहुरंगी शहर आहे हा राजकीय शोध लागण्याच्या कित्येक वर्षें अगोदर बहुरंगवाडी वसली होती. छोट्या छोट्या बंगल्यांची, बाग-हिरवळींची आणि वळणदार रस्त्यांची ही ऐटबाज जायदाद जेव्हां हारूनशेट रंगारी यांनीं बांधली तेव्हां तिला बहुरंगवाडी हें नांव त्यांनी केवळ धंद्याच्या अभिमानानें दिलेलें, ' तमाम जातीचे रंग देणार गंजावर रंगारी हारून सेठ यांच्या इमल्यांची वाडी ' एवढाच अर्थ तेव्हां नांवात अभिप्रेत होता. पण दुसऱ्या महायुद्धा-पासून वाडीत [illegible] व वगैरे त्या रंगारूपाचीं आणि गुणधर्मांची बिऱ्हाडें [illegible]क झालीं आणि अलीकडे एकदोन वर्षांत बहुरंगवाडीला कॉस्मॉपॉलिटन— विश्वजनीन हा दर्जा ध्यानीमनीं नसतां मिळाला. भारतांतील जवळजवळ वेगवेगळ्या प्रदेशांचे वरिष्ठ-मध्यम वर्गीय प्रतिनिधी बहुरंगवाडीत एकत्र आले होते. अशा सार्वदेशीय [illegible] नवऱ्यांनाच आपल्या गुलामगिरीची जाणीव सगळ्यांच्या [illegible] आधी ही एक सूचक गोष्ट होती. कारण बहुतेक सर्वांच्या बायका सुशिक्षित, स्वतंत्रवृत्तीच्या, जागरूक, धीट खंबीर आणि उद्योगी होत्या. नवरा हा सद्गृहस्थ आहे, घरातलें काय तें तो निमूटपणें पाहील (न पाहून जातो कुठें) माझे कार्यक्रम मला पाहिले पाहिजेत, चूल नि मूल एवढेंच करण्यांत जन्म घालवायचा नाहीं मला, या विश्वासानें संसाराचें जोखड पतींच्या मानेवर सोडून आपापले घराबाहेरचे सांस्कृतिक, सामाजिक किंवा व्यावहारिक कारभार करायला आपण मोकळ्या आहोत, या विचारसरणीच्या निग्रही व निरलस, सुखवस्तु व सुदृढ अशा त्या बहुरंगवाडीतल्या बिऱ्हाडकरू बायका होत्या.

पोर्टट्रस्टच्या सांतू लोबोची बायको 'फ्लोरा' घरीं बालोद्यान वर्ग चालवीत होती. सेन्ट्रल एक्साइजच्या केशवन् मेनन्ची ' सुमथी ' हेल्थ व्हिजिटर असून शिवाय आर्डरी घेऊन विणकामही पुरवी. ईस्टर्न स्टीलमधल्या ' गोगोन ' घोषांची ' शौदामिनी ' संगीत विद्यालयाची प्रिन्सिपॉल होती. टेहमिना बाटलीवाला नवरा सोली हा जरी अमेरिकन इलेक्ट्रिकमध्यें एंजिनिअर होता तरी स्वतः टेहमीही दुसऱ्या एका विलायती कंपनीत रिसेप्शनिस्ट अथवा स्वागतसुंदरी म्हणून नोकरी करीत होती. अकौण्टंट जनरल मधल्या ' यस्. ' रंगमूची श्रीमथी चेनाम्मा समाज कल्याण खात्यांत कुठलासा हुद्दा भूषवीत होती. इंप्रूव्हमेण्टट्रस्टच्या नानाभाई निरंजनाचें कुटुंब शिरीनबाई या दूधकचेरीत नोकरी व ॲडव्होकेटच्या परीक्षेचा अभ्यास करीत होत्या. कस्टम मधल्या रामभाऊ गांवकरांच्या सीताबाई भारतीय नारी सभेच्या दिशाप्रमुखं होत्या. यूसफभाय मूसाजी सचिवालयांत



शा म रा व नी ळ कं ठ ओ क

होते तर त्यांच्या झीनतबी म्हातारपाखाडी गर्ल्स हायस्कूलच्या हेडमिस्ट्रेस होत्या. मोटारएजण्ट सुरिंदर खन्नाची जलदीप आकाशवाणी कलावंत आणि होलसेल बुक ट्रेडर्सच्या तिमाजी नायकांची विजयालक्ष्मी दारूबंदी अधिकारीण. शेअरब्रोकर नाथालाल कावत्राची सवितावेन बाळकेळवणी मंडळाच्या संचालिका तर पंडित अर्धचंद्र वागीश या कविवर्यांच्या भाग्यवती रोहिणीदेवी या महात्मा औषधालयाच्या आयुर्वेदिक कन्सल्टण्ट. वाडीतले एकटेच पोट-भाडेकरू तिमाजींच्या जागेतले सुंदरराव नगरकट्टी, यांच्या प्रमिलाबाईंनीं तर घरींच बाहुल्यांचा कारखाना काढला होता.

या महिलांच्या घरांतून स्वयंपाक होत होते, बऱ्याच जणींना मुलें बाळें देखील होतीं, पण घरचें पाहण्याचें काम त्यांच्या नवऱ्यांवर पडत होतें. त्यामुळें कित्येक नवरे विविध गृहकृत्यांत दक्ष व प्रवीण झाले हे खरें, पण ते हौसेनें नव्हे. उदाहरणार्थ नानाभाई निरंजन निष्णात स्वयंपाकी बनले होते, यूसफमियां पोरें संभाळण्यांत बीबीपेक्षांही तज्ज्ञ झाले होते. सोली बांद्रोटची विणकामांत चांगलीच प्रगति होत होती. आणि तिमाजी नाईक तर गड्याच्या गैरहजेरीत धुणींभांडी देखील करण्याइतके वाकबगार झाले होते—पण सारे नाइलाजानें. गृहदास्यांत धन्य मानण्याइतके सुखी गुलाम ते बनले नव्हते. आपणावर अन्याय होत आहे याची त्यांना जाणीव होती व त्याबाबत उपाय करण्याची वेळ केव्हांना केव्हां तरी येणार आहे असे मनांतल्या मनांत सर्व नवऱ्यांना वाटत होतें, पण संघटित कृति करण्याची कल्पना मात्र कोणाला त्या संस्मरणीय दिवसापर्यंत नव्हती.

* * *

एके दिवशीं असा कांहीं प्रसंग आला कीं सुट्टीचा दिवस असल्यामुळें बहुरंगवाडीतला पुरुष वर्ग तर सगळा घरीं होताच पण स्त्रीवर्गदेखील घरीं होता—बाहेर जाण्याच्या तयारीसाठीं. कारण भारताचे लाडके पंतप्रधान पंडित नेहरू त्यादिवशीं मुंबईत यावचे होते, त्यांना बालकांकडून 'नेहरूचाचा झिंदाबाद'ची सलामी व स्त्री-संस्थांतर्फे मानपत्र देण्याचा समारंभ होता, त्यासाठीं वाडीतल्या एकूणएक महिला सज्ज होत होत्या, आणि त्यांच्या तयारीची झळ पतिवर्गाला जाणवूं लागली होती. सकाळपासूनच वातावरण गरम होऊं लागले होते. घराघरांतून कुरबुर ऐकूं येत होती. सोशीक नवरे देखील बायकांच्या जाचानें कातावून गेले होते. कित्येकजण ओरडून बोलत होते. बायकोच्या साडीला इस्तरी करून देण्याचें सांगू लोबोंनें साफ नाकारल्यावरून खालीं त्यांच्या घरांत वाचावाची सुरू होती तर वर मुलांचा अभ्यास मागे राहिल्याबद्दल [illegible]यी चेनाम्बा श्री. रंगमूना चापीत होत्या. पलीकडे सकाळचा नास्ता बिघडवला म्हणून जलदीप खन्नानें सुरिन्दरचें घर दणाणून सोडलें होतें. अखेर आजच्या समारंभांत पंडित नेहरूंच्या अगदीं जवळची खुर्ची पटकावून ठेवण्याच्या कामीं तिमाजी नाइकांना अपयश आल्यावरून त्यांच्या सौ. विजयालक्ष्मींनी तिरिमिरीच्या भरांत पतिराजांच्या जी श्रीमुखात ठेवून दिली तीच जणुं भारतातील नवऱ्यांच्या बंडाची पहिली ठिणगी पडली.

त्या दुपारीं सारीं बायकापोरें बाहेर जाऊन वाडींत शांतता आल्यानंतर बंद दरवाजाआड सर्व पुरुषांची एक तांतडीची अनौपचारिक सभा भरली. बायकांकडून नवऱ्यांना होणाऱ्या छळाचा एकदां कायमचा काय तो इलाज करण्यासाठीं गंभीर विचारविनिमय सुरू झाला. सभेंत जमलेले नवरे भारताचे व मुंबईचें पूर्ण प्रातिनिधिक होते. मुंबईकरांच्या मैफलीस साजेशा आंग्लो-हिंदी—मराठी—गुजराती भाषेंत मंडळी संभाषण करीत होती पण त्यावेळीं भाषेपेक्षां अर्थाकडे सर्वांचे लक्ष होतें. चर्चेला सुरुवात करतांना तिमाजी नाईक खेदपूर्वक म्हणाले,

"त्यांनी, म्हणजे माझ्या श्रीमतींनी—माझ्या श्रीमुखांत दिल्याचें मला इतकें दुःख नाहीं. 'पर-सुधार मंडळा'च्या माझ्या समाजकार्यांत श्रीमुखांत खाण्याचे अनुभव मला नवीन नाहींत, पण तोंडांत मारतांना त्या मला जें 'यू नालायक कुली' म्हणाल्या (ओठांतून 'शेम' 'शेम'चे आवाज) तें मात्र मला असह्य झालें. त्या शब्दांनीं खाडकन् माझे डोळे उघडले व नवऱ्यांची प्रतिष्ठा आज काय उरली आहे हें स्पष्ट दिसलें. बायकांच्या जाचांतून [illegible] नवऱ्यांना मुक्त करण्याची आतां निकड आहे आणि म्हणून एक संघटना [illegible]"

त्यावर एक दीर्घ निश्वास टाकून गगनबाबू घोष म्हणाले, "[illegible], अगदीं हेंच माझ्या काल मनांत आले. ज्यांवेळीं घरांतल्या एकुलत्या एक आरामखुर्चीवर मीं बसूं लागलों असतां मला बाजूला ढकलून माझी पत्नी तेथे वाचायला बसली, जणुं मालकी हक्कानें.'

"दक्षिणेत आम्ही लोकांनीं स्त्रियांना आधीपासूनच वरचें स्था-

अनुक्रमणिका

दिले आहे, पण हें संपूर्ण स्वातंत्र्य मिळाल्यापासून बायकांची हुकूम-शाही अनावर होत आहे. 'मीं माझें मत कोणाला द्यावें तें माझी पत्नी जेव्हां मला दरडावून फर्मावते, तेव्हां ती माझ्या मूलभूत हक्कांची पायमल्ली करीत आहे असें मी तिला सांगतो, पण ती ऐकून घेत नाहीं. " केशवन् मेननने सांगितलें. त्यावर रामभाऊ गांवकर उद्गारले, "अहो कोण बायको ऐकून घेते आहे ! सग्ळ्या ऐकवतात मात्र."

सोली बांबोट म्हणाला, "हाज तो ! अरे आटली जबरदस्ती ! माझो मिसिस सांगते कश्मीरला चाल, मी नाय सांगते, रजा नाय. तो ते खुद निगूनसी जाते, ने कश्मीरसून तार ताकते के तू नाय येल तो मी इकरे एकेकीज रहेल, वारसवी नाय येल—साला जुलुम ! बसू, भाईलोक, करी नाखो ने एसोसिएन 'हेनपेक्ड हज्बण्डस क्लब.'"

"अरे कॉल इट यूनियन मॅन्, सगले नावा एकस्च" सांतू लोबोनें सुचविलें, पण सुरिंदर खन्नाचें मत "बेहतरीन नाम होगा बीवी परेशान मर्द जथा" असें पडलें. त्यावर आतांपर्यंत दुखव-ल्याच्या सभेला आल्यासारखे खालीं मान घालून बसलेले पंडित अर्धचन्द्र वर पाहून घसा साफ करून बोलले.

"बंधुओ, क्षमा कीजिए, मैं आप सब सज्जनोंको विनम्र याद दिलाना चाहता हूँ की हमारे देशकी भाषा हिंदी है और भारत हमारा देश है. कुछ भी काम करना हो, तो हिंदीमें और भारतीय श्रेणीपर चलना चाहिए. मेरा सुझाव है कि होनेवाली पति-संघटनाका नाम हो अखिल भारतीय गृहिणी-ग्रस्त गृहस्थ संघ."

"अहो तें तर आम्हाला म्हणायला देखील येणार नाहीं" नानाभाई निरंजन पुटपुटले. एस्. रंगम्नीं सुचवलें "हाउ अबाउट भार्याशासन संघम् ? बायकांना चांगला धडा शिकवण्यासाटीं ?"

"तोबा तोबा;" यूसफभाई म्हणाले "बीवीला सबक सिखाना आसान काम नाहीं साहेब. कभी कभी माज्याबी ख्यालमंदी येतो की झीनतबीला एकदां चांगला हात दाखवावा पण वेळ आली कीं तीच माझ्यावर फुटपट्टी उगारते."

"घरोघर तीच स्थिति आहे" रामभाऊ बोलले, "दोघांपैकीं घरांत पाटलोण घालणारें माणूस कोणतें" असा एक इंग्रजी वाक्प्रचार आहे. जंटलमेन, 'घरांत मी पाटलोण घालतो' असें छातीठोक आज कोणता नवरा सांगूं शकेल ?"

मेननेंनें 'पति प्रतिकार दल' हें नांव सुचवलें, पण त्यामुळें सुरुवातीपासूनच बायका भडकतील, तेव्हां त्यापेक्षां मुत्सद्दीपणानें 'पति-सहकार' सारखें एकादें रचनात्मक नांव देणें धोरणीपणाचें ठरेल ही सुंदरराव नगरकट्टीची कल्पना एकंदर मंडळींना मानवली.

"अरे राष्ट्रीय मरद मंडल म्हणा ने" नाथालालभाईंनी नवी सूचना केली, त्यावर झालेल्या चर्चेत एक गोष्ट स्पष्ट झाली कीं, सभा, समिति, संस्था, संसद अशा स्त्रीलिंगी किंवा मंडळ, अधिवेशन अशा नपुंसकलिंगी नांवांपेक्षां संघ, जथा, मेळा अशा मर्दानी नांवाना सगळे अनुकूल होते.

कांहींतरी निश्चित काम चालू करण्याची तिमाजींना घाई होती. त्यांनीं दोन्ही हात वर करून शांतता मागितली व भाषण सुरू केलें,

"समदुःखी मित्रहो, नांवे वगैरे तपशील सोईप्रमाणें योग्य वेळीं ठरवता येईल. एकादें नक्की ध्येय डोळ्यापुढें ठेवल्याखेरीज कामें भराभर होणार नाहींत. आपणास काय करावयाचें आहे ? तर अखिल भारतीय नवऱ्यांची बचावात्मक संघटना, पण तिच्या अगोदर या नव्या आंदोलनाचें संचालक जे आपण, त्या आपली इथली संघटना. मी ठराव मांडतो कीं बहुरंगवाडीतल्या श्रीमतींचे, पती श्रीमान् या अर्थानें आपण 'बहुरंगवाडी श्रीमान् संघ' हें निरुपद्रवी नांव रजिस्टर करून कचेरी उघडावी, व आपल्या विश्रमानें 'हिंद पति-सहकार' ह्या नांवाची सोसायटी नोंदवून घ्यावी. सर्व मुख्य शहरांतून शाखा उघडून देशांतल्या परतंत्र झालेल्या पतींना या सहकारी संस्थेचे भागीदार सदस्य करून घ्यावे. त्यांच्यामधून प्रतिनिधी बोलावून 'अखिल भारतीय पीडित पति मेला' किंवा वसका भरवावा, पण तो पति-सहकार या को ऑपरे-टिव्ह सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्तानें. या युक्तीनें पत्निवर्गाला आपल्या संघटनेचा पत्ताही न लागूं देता आपणास मेळाव्याचे कामकाज निर्वेधपणें करतां येईल."

हा आराखडा श्रोत्यांनीं पसंत केला व बहुरंगवाडी श्रीमान् संघाचे अध्यक्ष गगनबाबू घोष, उपाध्यक्ष एस्. रंगम्, नाथालालभाई कावत्रा, चिटणीस यूसफभाय व नानाभाई, अशा निवडणुका अविरोध झाल्या. नंतर तिमाजी नाईकांचा खट्टू चेहरा पाहून सदस्यांच्या लक्षात आलें कीं याना निवडून आणायला आपण विसरलोच. तेव्हां त्यांना (व स्वतःकडे दुर्लक्ष झाल्याबद्दल निषेधात्मक सभात्याग करण्यास निघा-लेल्या पंडित अर्धचंद्रजींना) सन्मान्य सल्लागार म्हणून निवडण्यांत आलें. 'हिंद पति-सहकार (मर्यादित)' ही को ऑपरेटिव्ह सोसा-यटी रजिस्टर करून शेअर विक्री व प्रचाराचें काम केशवन् मेननने अंगावर घेतलें, व तीन महिन्यांचे आंत 'अखिल भारतीय पीडित पति-मेला' मुंबईत भरविण्याचे नक्की करण्यांत आलें. मेळाव्याच्या ठिकाणाबद्दल बराच वाद-विवाद झाला. सुरिंदर म्हणाला,

"पिशोर यानें पुरुषपूर, मर्दान, असी गांवे आतां पाकिस्तानांत गेली, तथापि उरलेल्या हिंदमधेही पुरेशी पुरुषी नांवे सुदैवानें शिल्लक आहेत. कुर्ला, चकला, वडाला, दांडा, कांडला, रेवदंडा, भोईवाडा अंसा एकाद्या ठिकाणी मरद मेला, भरविणें चोख" त्यावर रामभाऊ गांवकरांनी पुण्याचे नरपतगीर भेट विचारांत घ्यावें असे म्हटले. पुण्याच्या नांवानें नेहमीं चिडणारे निमाजी नाईक म्हणाले,





" मग त्यापेक्षां खानदेशांतील नरढाणा हें नांव अधिक जोरदार आहे " तथापि मुंबईतच एकार्या मर्दानी नांवाच्या पत्यावर—उदा० मस्तान तलाव—मेळा भरविण्याच्या ठरावाला बहुमत पडलें.

• नांवाबाबत तोच आग्रह अध्यक्षपदासाठीं नांवें विचारांत घेताना दिसून आला. नरहरि, नरोत्तम, पुरुषोत्तम, नरवणे, नरे, नवरे इत्यादि नांवांच्या सूचनांबरोबरच मुडश्वर हें नांव इंग्रजी स्पेलिंगवरून माहीत असलेल्या मेननने ' मर्देश्वर ' हें ही नांव सुचवून पाहिलें. तथापि बऱ्याच चिकित्सेनंतर असा निष्कर्ष निघाला कीं केवळ नांवाच्याच मर्दपणाची कसोटी लावल्यास एकादा नरभेराम, खानमर्दाना, अरजन चड्डा किंवा उताण्या धनंजयादेखील अध्यक्षपदास लायक ठरायचा, तेव्हां इतर कांहीं पारख ठेवावी. नाथालालनें विचारलें कीं राष्ट्रपतींना अध्यक्ष कां करूं नये? सांतू लोबोनेही या कल्पनेला दुजोरा दिला, तेव्हां त्यांना पंडित अर्धचंद्रजींनी समजावून सांगितलें कीं मणांच्या अधिपतीसारखे आपले राष्ट्रपति गणराज्यांचे अधिपति आहेत, राष्ट्राचा नवरा नव्हेत. तिमाजी नाइकांनीं सांगितलें कीं अध्यक्ष उद्घाटक, समारोपकार प्रतिनिधी किंवा निमंत्रित यांच्या योग्यतेची परीक्षा घेण्यासाठीं तीन प्रश्न विचारले पाहिजेत.

(१) ते भारतीय आहेत काय ?

(२) ते पीडित आहेत काय, विशेषतः पत्नि-पीडित व

(३) ते खरोखरचे म्हणजे वैध पति आहेत काय, कीं (अ) कार्यकारी (ब) नामधारी ?

रंगम् म्हणाले हा तिसरा प्रश्न एकाद्याला विचारणें अवघड पडेल. तें पहून सभासदांनी थोड्या चर्चेनंतर ' स्वतःला पति म्हणवील तो पति ' ही व्याख्या ग्राह्य धरली. नंतर अखिल भारतीय पीडितपति मेळाव्याचे आमंत्रण व स्वागतजथा बहुरंगवाडी श्रीमान् संघच असावा, येणारे प्रतिनिधी हिंदपतिसहकार (मर्यादित) चे पूर्ण किंमत भरलेल्या शेअरचे भागीदार असावे, मेळाव्याचा खर्च सहकाराला मिळणाऱ्या शेअर भांडवलांतूनच कर्ज घेऊन तूर्त करावा, निमंत्रित पाहुणे फक्त देणगीदार असावे, प्रेक्षकांना तिकिटें ठेवावीं व स्त्रियांना संपूर्ण मज्जाव रहावा, हे ठराव भराभर सर्वानुमतें मंजूर झाले. नंतर सर्व वाडीकर नवऱ्यांनीं विषयनियामक खल करून खुल्या मेळाव्यात मांडण्यासाठीं पुढील ठराव तयार केले.

१. सार्वजनिक जीवनांतील सुप्रसिद्ध बायकांच्या हुतात्मा पतींना व जिवंत बळींना हा मेळावा अभिवादन करीत आहे.

२. बायकांचें फाजील वाढणारें वर्चस्व दूर करण्यासाठीं सर्व सनदशीर व इतर मार्गांनी झटत राहण्याचें हिंद पति-सहकार (मर्यादित) अभिवचन देत आहे.

३. देशाला स्वातंत्र्य मिळतांच स्त्रियांना स्वातंत्र्य देण्यांत राज्यकर्त्यांनी मोठी चूक केली असें अखिल भारतीय पति-पीडित मेळाव्याचें ठाम मत आहे.

४. भारतांतील बायकांचें स्वातंत्र्य ही पुरुषांची गुलामगिरी ठरली आहे. घर किंवा संसार हा आधुनिक पतिवर्गाला दुर्गम महत्त्वाची गोष्ट वाटते, घराबाहेर कार्य करणाऱ्या पत्नीची चाकरी सुसंस्कृत म्हणविणाऱ्या पतींला करावी लागते, या परिस्थितीची गंभीर दखल हा मेळावा घेत आहे.



[हाताचीं बोटें आणि आंगठा यांची कृति झाली कीं सणसणीत चिमटा बसतो. आधुनिक बायका चिमटे काढण्यांत प्रवीण असतात. या चिमट्यांबाबत ' कां आणि कसें '—]

१. इंग्रजी चित्रपटांत कसला तरी विनोद झाला कीं सगळे जाणते लोक हंसतात. आपणहि खुळ्यासारखे हंसतो. अशा वेळीं हा ' जोक ' कसला होता म्हणून बायको विचारूं लागते. पण आपण क्षणभर त्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतो—आणि एका सेकंदांत बायकोचा सणसणीत चि-म-टा !

२. बसमध्यें बायकोसह जाण्याचा आपल्यावर अनेकदां प्रसंग येतो. अलिकडे बसमध्यें पुष्ट उरोजांच्या सिंधी बायकाहि फार हिंडतात. सौन्दर्याचें आकंठ पान करायचें असा आपला स्वभावधर्म असल्यामुळें आपलें सहजच ' तिकडे ' लक्ष जातें. आपल्या पाळतीवर असलेल्या बायकोच्या ध्यानांत हा प्रकार आला कीं अर्ध्या मिनिटांतच बायकोचा दणदणीत चि-म-टा !

३. ऑफिसांतून तब्बल आठ तास खर्डेघाशी करून आपण दमूनभागून येतो-अशा वेळीं अंथरुणावर पाठ टेकतांच आपल्याला झोंप लागते. पण बायकोला जाग असते. तिला ऑफिसांतल्या गोष्टी विचारायच्या असतात, कांहीं सांगायच्या असतात, कांहीं करायच्या असतात. अशा वेळीं आपण हलवूनहि जागे होत नाहीं. अखेर नाइलाजानें बायकोचा चुरचुरीत चि-म-टा !

— नवरंग

५. लग्नाच्या कायद्यांत जरूर ती सुधारणा करून घराबाहेर गुंतणाऱ्या बायकोच्या घरांतल्या कर्तव्यांबाबत स्त्रीच्या पतीला जादा बायको अथवा बायका करण्याची सोय करून देणें सरकारचें कर्तव्य आहे, हा मेळव्याचा पूर्ण विचारांतीं निष्कर्ष आहे.

६. हजारो वर्षें भोगलेल्या तथाकथित पारतंत्र्याचा सूड घेणारी भारतीय स्त्री पतीवर घेत आहे या सत्यावर श्री. नेहरूंच्या नेतृत्वाखालीं सरकार स्त्रीवर्गाला पक्षपात दाखवीत आहे व स्त्रियांच्या चढाऊ धोरणाकडे कानाडोळा करीत आहे, याचा हा मेळावा निषेध करतो.

बायकांना नीट न वागवूलेत तर याद राखून रहा' असें आपल्या कर्मचाऱ्यांना दटावणारें सरकार नवऱ्यांशीं नीट वागण्याबद्दल बायकोंना कां दटावीत नाहीं असा या मेळ्याचा सरकारला रोकडा सवाल आहे.

८. 'केरळातले निवडणूक—निर्णय बायकांच्या मतांनीं ठरले' अमेरिकेचा अध्यक्ष मुख्यतः बायकांच्या मतावर निवडून येतो' 'पंडित नेहरूंच्या बायकांमधील लोकप्रियतेमुळेंच आज कॉंग्रेस सरकार सत्तारूढ आहे' ही चिन्हें नवरावर्गाला धोक्याचीं आहेत असा इशारा हा मेळा देत आहे.

९. 'मागसलेल्या स्त्रीजातीला पुढें आणण्यासाठीं' गेल्या पन्नास वर्षांत त्यांना ज्या ज्या म्हणून खास सवलती देण्यांत आल्या त्या पुरुषांना, निदान विवाहित पुरुषांना आतां मिळूं लागाव्यात अशी या मेळ्याची आग्रहाची मागणी आहे. त्याअन्वयें :

(अ) शिक्षणासाठीं वेगळ्या शाळा, वसतिगृहें, शिष्यवृत्त्या, कर्जें इत्यादि देण्याबाबत लग्न झालेल्या पुरुषांना स्त्रियांच्या अगोदर पसंती मिळावी.

(ब) खास पतिसंरक्षक पोलीस दल प्रत्येक शहरांत असावें व त्यानें पतींना पत्नीकडून होणाऱ्या जाचाचा कडक बंदोबस्त करावा. (शक्य तर या दलांत स्त्रीपोलिसांचा भरणा असावा.)

(क) शाळा कॉलेजांप्रमाणेंच ट्रॅम, बस, एस्टी, आगगाडी, बोटी, सिनेमा इत्यादि सार्वजनिक ठिकाणीं विवाहित पुरुषांची मागणी आल्यास राखीव जागा ठेवाव्यात.

(ड) नवरे हा वर्ग अनुसूचित म्हणून जाहीर करून त्यांना नोकऱ्यांचे बाबत इतर सर्व पुरुषांच्या अगोदर (व अर्थात् सर्व स्त्रियांचेही आधीं) अग्रहक्क मिळावे. या नव अनुसूचित वर्गाच्या उन्नतीसाठीं सरकारनें बरीच वर्षेंपर्यंत मोठ्या रकमांची सोय करावी व त्या योजनेत स्त्रियांचा कोठेंहि संबंध न येईल ही खबरदारी घ्यावी, अशी या मेळ्याची शिफारस आहे.

१०. परराष्ट्रीय पति-संघटनांशीं संपर्क ठेवून दुनियेतल्या दलित-पतींची जागतिक संघटना करणें व प्रसंगीं संयुक्त राष्ट्रांकडे 'नवरे' या जगभर पसरलेल्या वर्गासाठीं प्रतिनिधित्व मागणें, या हिंद पति सहकाराच्या ध्येयांना मेळ्याचा पाठिंबा आहे.

११. पतीची पूंत पत्नि स्वतंत्र होतांच संपते, म्हणून स्वतंत्र बाईच्या नवऱ्यास पति म्हणण्यांत येऊं नये, त्यानें स्वतःस 'कुटुंब' किंवा 'घरवाला' म्हणवावें व या खालच्या दर्जाची जाणीव प्रज्वलित ठेवून 'पत्नी गृहिणी होईपर्यंत पति म्हणवणार नाहीं' ही प्रतिज्ञा करून मिशांचे आंकडे खालीं वळवून व्रत पाळावें, असा या मेळ्याचा संदेश आहे.



मूठ व मिठी

अतां न राही मूठ झाकली तशी चोरटी मिठी
राजरोस या भेटी गाठी, नसल्या ताटातुटी
खिरापती इतरास वाटते, देवा पंचारती
मुठींत ठेवी पती, प्रियकरा मिठींत घेई सती


—कोंडया

इतकी चतुरंग तयारी केल्यानंतरही हिंद पति सहकार (मर्यादित) या संस्थेतर्फे अखिल भारतीय पीडित पति मेळाचें अधिवेशन अद्याप होऊं शकलें नाहीं. 'हा केवळ दैवदुर्विलासच म्हणावयाचा'. त्याचें असें झालें कीं हिं. प. स. ची कचेरी तिमाजी नाइकांच्या घरीं ठेवण्याचें ठरलें व सुंदरराव नगरकट्टींनी उत्साहानें बायकोचा बाहुल्यांचा कारखाना व्हरांड्यात आणून ठेवला आणि खोली खाली करून दिली. तितक्यांत विजयालक्ष्मी नाईक व प्रमिला नगरकट्टी परत आल्या. तेव्हां तेथें जमलेल्या इतर नवऱ्यांच्या मदतीनें तिमाजी-सुंदररावांनीं पत्नीद्वयास घराबाहेर ठेवलें व हें घर 'फक्त पुरुषांसाठीं' असल्याचें जाहीर केलें. वाडीतल्या इतर स्त्रिया आवेशानें आपल्या गृह-निर्वासित भगिनींच्या मदतीस आल्या. वाडीचा नोकरवर्ग तटस्थ राहिला. तिमाजींच्या घराला बायकांनी दिलेल्या वेढ्याचा आंतील नवऱ्यांनी एक रात्रभर यशस्वी प्रतिकार केला, अखेर सवित्राबेननें विजयालक्ष्मींची व फ्लोरानें प्रमिलाबाईची राहण्याची सोय आपल्या घरांत केली. दुसऱ्या दिवशीं शिरीनबाईच्या नेतृत्वानें 'तिमाजी व इतर' यांच्यावर कायदेशीर इलाज करण्याचा पत्नीवर्गानें प्रयत्न केला तोही अयशस्वी झाला. तिसऱ्यादिवशीं तिमाजींच्या विजयालक्ष्मींनी आपल्या दारूबंदी खात्याकडून स्वतःच्याच घरावर धाड आणून नवऱ्यांनी पोलिसांना दारें उघडतांच गर्दीकरून स्त्रीवर्गासह आपण आंत घुसण्याचा प्रयत्न केला, पण त्यावेळीं चाणाक्षपणानें सांतू लोबोनें 'एव्हरि मॅन फॉर हिमसेल्फ !' ज्यानें त्यानें आपापल्या बायकोला टिपून बाहेर ढकलावें असा सावधगिरीचा इशारा दिल्यामुळें आंतील नवऱ्यांनी निर्धारानें आपापल्या बायकांना बाहेर रेटलें, आणि जरी जलदीप सुरिंदरला चावली, विजयालक्ष्मीनें तिमाजी नायकांच्या पुन्हां श्रीमुखांत दिली, झीनतबीनें यूसफमियांचा शर्ट फाडला आणि फ्लोरानें नवऱ्याला तीन भाषांत लाखोली वाहिली, तरी हल्ला हटवला गेला. किल्ल्यावर नवऱ्यांचें निशाण फडकत राहिलें. 'हिंद पतिसहकार'चा नवीन रंगवून आणलेला बोर्ड तुटला होता तो पुन्हां लावण्यांत आला, पोलीस, मुलें व नोकर पोट धरधरून हंसत आहेत हे बायकांच्या लक्षांत आलें आणि त्या कलकलत आपापल्या घरीं गेल्या.

त्यानंतर लौकरच कांहींजणी माहेरीं किंवा दुसरीकडे कुठें गेल्या, कांहींजणी नवऱ्याशीं अबोला धरून घरांत शांतता ठेवूं लागल्या, कांहींजणींनी आजाराचें सोंग घेतलें, कांहींनी नवे व्यवसाय काढले आणि एक दोघी तर सुतासारख्या सरळ आल्या. मग बहुरंगवाडींतल्या श्रीमान् संचाला अखिल भारतीय पीडित पति-मेळा भरवण्याची इतकीशी निकड वाटेनाशी झाली. 'हिंद पति सहकार (मर्यादित)' ची शेअर्स विक्री मात्र समाधानकारक होत आहे.

'अहो स्वातंत्र्य म्हणजे काय हुरडा
हाय. कुनीची चोळावा आन
फाक्या माराव्या.
पायांतली व्हान पायांतच पाह्यजे.
हां, तिला कुरकुरूं द्यावी.
पन म्हनावं बाई कुरकूर, पन
पायांतच राहून...'

बा ळ गा ड गी ळ



एका जंक्शन दादल्याची मुलाखत

ऊनाचा ताव मी म्हणत होता. सारी धरणी त्यांत होरपळून निघत होती. गांवच्या शिवारांत अधूनमधून आंब्या-बाभळीची झाडं मुरचडून उभी होती. धाब्याची पडकी-उघडी घरं घेऊन तं गांव उन्हांत होरपळत निपचित उभं होतं. मी त्या तापल्या धुळींतून तावत यंका ढपाल्याच्या वस्तीकडं चालला होतो. रस्त्यानं एखादं ढोरसुद्धां नजरेला पडत नव्हतं. एखादं कुत्रं कायतें मधूनच केकाटे आणि त्या शांततेच्या डव्हावर काल्व्याची लाट उसळे. पण मग लगेच सगळीकडे गपगार होई.

माझ्या दोन्ही हातांत दोन बॅगा होत्या. त्या सांवरत मी चाललो होतो. माझ्या डोईवरच्या शिप्तरांतून घामाच्या धारा वहात होत्या. उडणारी धूळ माझ्या तोंडावर सगळीकडे चिकटली होती आणि त्या अवतारांत मी थेट मारुतरायासारखा दिसत होतो. हें लिहायला आतां मला मोठी मौज वाटते आहे पण त्यावेळीं मात्र तो उन्हाचा आणि धुळीचा कार मला सहन होत नव्हता. कुठून संपादकाच्या उत्तेजनाला बळी पडलो आणि वेडरवाडीच्या यंका ढपाल्याची मुलाखत घ्यायला तयार झालो असें मला होऊन गेलें. पण आतां परतणें बरोबर नव्हतें. दोन बायकांच्या या आदर्श दादल्याची मुलाखत संपादक माझ्या नांवावर जाहीर करून चुकले होते. मीही गाफीलपणें होकार दिला होता.

वस्ती जवळ आली तसा मी उचलल्या पौंडानें चाललो. इतक्यांत एक हळी ऐकूं आली.

"शेरचं पाव्हणं कां व ऽऽऽ"

ही मला उद्देशून होती हें माझ्या लक्षांत आलें आणि प्रत्युत्तर देऊन मी मीच असल्याबद्दल सांगितलें. मग जराशी धांवपळ झाली. यंका ढपाल्याच्या वस्तीवर जी शांतता पसरली होती तिच्यावर उगीच एक ओरखडा उठला. कुणीतरी येऊन माझ्या हातांतल्या बॅगा काढून घेतल्या. मी हुश्श् केलें आणि आजूबाजूचें ग्रामीण वातावरण न्याहाळून घेतलें. यंका ढपाल्याची सगळी वस्ती दुपारच्या टायमाला ऊनाचें पांघरूण घेऊन पेंगुळली होती. झाडाच्या सांवलीला बैल बांधले होते. ते डोळे किलकिले करून उगाच बसले होते आणि रवंथ करतांकरतां झोपी गेले होते. पांच सात कुत्रीं तर चक्क उन्हामध्येंच गुमान झोपली होती. माझ्यासारख्या पाव्हण्याच्या आगमनाचीसुद्धां या ग्रामीण मंडळींनी दखल घेतली नाहीं.

"ह्या बायली, अशी गडद झोपतात हीं कुत्रीं कीं हत्ती अंगावरनं चालत गेला तरीबी झोपूनच राहत्याल" यंका त्यांच्याविषयीं बोलतांना मला नंतर म्हणाला.

वस्तीवरच्या घरांची बहुतेक दारें बंद होती. हालचाल अशी कांहींच होत नव्हती. वारासुद्धां अगदींच पडला होता. झाडें शांत, घरें स्तब्ध सारें कसें शांत शांत होतें.

माझें सामान घेतलेल्या पाव्हण्यानें एका खोलीचें दार उघडलें आणि आंत सामान ठेवत तो ओरडला,

"यंकटराव, हे पाव्हणं आल्यात पुण्यासनं..."

खोलींतसुद्धां सगळीकडे झोपेचें साम्राज्य होते. पांचसात जण तरी सहज तिथें झोपलेले होते. अर्थात् फरक एवढाच होता कीं त्यांतले कांहीं अगदीं शांत झोपले होते तर कांहीं घोरत झोपेला सांथ करीत होते. कांहीं घोरत होते तर कांहीं मोठ्यानें.

अनुक्रमणिका

(येथें एक खुलासा. ही मुलाखत जेव्हां मी लिहिल्यांदा लिहिली तेव्हां आतांपर्यंतचें वर्णन त्यांत नव्हतें. एकदम मुलाखतच सुरू होत होती. त्यामुळे एडिटर म्हणाले "छया:, मुलाखत जास्त चढावयास पाहिजे. तिला अजून टोक आलेलें नाहीं." तेव्हां मी बसलो आणि आधीचे ॲटमॉस्फिअर आणलें. आतां या मुलाखतीला निदान सुरुवातीला तरी टोक आलें असेल अशी आशा.)

हांक ऐकतांच मोठ्यानें घोरणारे व्यंकटराव जागे झाले आणि त्यांनीं भलामोठा आळस दिला.

"रामराम व्यंकटराव," मी म्हणालो.

"रामराम, बसा..." आणि लगेच माझ्याकिरितां चहाची ऑर्डर सुटली.

"'चावडी' मध्यें आपला परिचय वाचला आणि आमचे संपादक म्हणाले कीं आपल्यालाही व्यंकटरावांची मुलाखत पाहिजेच."

"हां हां कागद आलाय मला त्यांचा. संपादक म्हणजे तुमचे आडिटरच ना. का एडिटर का काय म्हनत्यात..."

"तर मी काय म्हणत होतो की आपली हरकत नसेल तर एक संपूर्ण मुलाखतच छापावी अशी आमची इच्छा आहे."

"खुश्शाल छापा तुमी...च्याऽयला... कुनाची भित्ती हाय त्यांत..." हां हां म्हणतां व्यंकटरावांना 'इरेसरी' चढली. आणि तिचा फायदा घेऊन मी माझ्या मुलाखतींतला पहिला पवित्रा टाकला.

"नाहीं, म्हणजे लोक काय म्हणतात कीं पुरुषांनीं दोन, दोन बायका करणं हें आजच्या जमान्यांत बरोबर नाहीं..."

"आरं तिच्या...पन मी कुटं म्हन्तो की सर्वांनीं दोन दोन बायका कराव्या. ज्याची ऐपत नसल त्यानं खुशाल ब्रह्मचारी व्हावं. (यावेळीं व्यंकटरावांनीं मजकडे रोखून कां पाहिलं हें मला अजून समजूं शकलेलं नाहीं) पन ज्याची ताकद असेल त्यानं एक सोडून धा बायका कराव्या म्हन्तो मी. माझा आजा चार बायकांचा दादला होता..."

आजाची परंपरा आपण नेटानें आणि धैर्यानें पुढे चालविल्याचा अभिमान व्यंकटरावांच्या चेहऱ्यावरून ओसंडत होता.

"हां म्हंजे हे महत्त्वाचंच आहे..." दपाऱ्यानं केलेलं दोन बायकांचं समर्थन मी पचवलं.

"आणि बरं कां आडिटरसाहेब, तुमी खूप म्हनाल मी दोन बायका करतो पन त्या व्हायला पायजेत व्हवं. एकिलावी टिकवून ठेवू शकत न्हाईत असे दादले या वेडर्वाडींतच आहेत बरं कां नामर्द भ..." पुढची प्रत्ययकारी शिवी न देतांच मला समजली. आणि मी विषय बदलला.

"बरं व्यंकटराव, स्त्रियांना शिक्षण असावं यासंबंधीं आपलं काय मत आहे ?"

"च्यायायली, स्त्रियांना शिक्षान आणि ते कशापायीं ? शिक्षान देऊन त्यांना काय इशाल महिला करायच्या देसपांड्यांच्या नाटकांतल्या. अहो हितं आमच्याच शिक्षनाला पत्त्या न्हाई आणि बायांचं शिक्षान कुठून घेऊन बसल्यात !" व्यंकटरावांच्या बायकोचा उल्लेख 'चावडी' मध्यें 'सुविद्य' पत्नी असा केला असल्यामुळें मीही गडबडलो.

"पण मग तुमचं शिक्षण तरी हायस्कूल पर्यंत झालेलं असेलच..."

"कसलं आलंय हो. आमचं बी त्येच. दोन बुकं गना मास्तरच्या शाळेंत शिकलो अन् बा म्हनाला यंका पुरं झालं तुझं शिक्षान आन् आमचं शिक्षान पुरं झालं..." आणि त्याचे पुढले शब्द हास्याच्या कल्लोळांत बुडून गेले.

स्त्रीशिक्षणाचा निकाल लागला. आतां आलें राजकारण.

"बरं व्यंकटराव, तुम्हाला आतां एक वेगळा प्रश्न विचारतो. बायकांना मतं असावीं कीं नाही याबद्दल तुमचं काय मत आहे ?"

व्यंकटराव परत एकदां खो खो हंसले आणि हंसतां—हंसतांच बोलले,

"ह्ये काय क्येनं काढलंय् तुमी. बायकांना मत ! आन त्ये कशाला ? अहो, राजकारनाचा खेळखंडुबा काय पुरा होत न्हाई कीं काय बाईमानसांवांचून. तुमी तर आगदी मस्त इनोदी बोलताय आडिटरसाहेब..."

खरें तर आमच्या संपादकांच्याच भार्षेत सांगायचें म्हणजे व्यंकटरावांचें हें बोलणें बरोबरही होतें (आणि चूकही.) त्यामुळे मी यावर थोडावेळ कांहींच बोललों नाहीं

"नाहीं पण कांहीं सुधारकांचं असं मत आहे कीं, स्त्रिया अबला असतात. त्यांना मतं दिल्याशिवाय त्या प्रबला होणार नाहींत."

"काय डोस्कं आसल हो असं म्हननाराचं...आरं यांना कोन अबला म्हनल. आमचा शिदा पैलवान हे का. तो आपल्या बायली समोर चळाचळा कांपतो. आसे किती दावूं तुमाला...आन् मतं म्हंजे काय भाजीबिजी हाय की काय फुकट-वाटायला..."

वेडरवाडीच्या सुविद्य नागरिकाचें हें मत मी जसेंच्या तसं टिपून घेतलं...

" आतां मी आपणाला एक गंभीर प्रश्न विचारतो--',

" काय बी इचारा. पहिलीसरी आमचं उत्तर ठेवल्यालंच..." व्यंकटरावांनीं मला आश्वासन दिलं.

" आरं आसं कसं, वेंकटेशा. जरा इचार करून उत्तरं दिलीस तर बिघडनार न्हाई. हें समदं छापून यायचं म्हनत्यात..." व्यंकटरावांचा मामा शेजारी बसला होता त्यानें भाच्याला समजावलें...

" मग काय इतक्या वेळ इचार न करतां उत्तरं दिली कीं काय म्या ? धादा इचार केला अकराव्यांदा बोललो..."

" बरं तर मी विचारीत होतो कीं कुटुंब नियोजनाबद्दल आपलं काय मत आहे ? आजकाल आपल्या देशाची लोकसंख्या सारखी वाढत चालली आहे तेव्हां कुटुंब-नियोजन करावे असें आपलं सरकार सांगतें..."

" कुटुंबनियोजन ह्यो एक आगलंच खूळ बगा आडिटरसाहेब, अहो पोरांना नको म्हणणारं आपन कोन ? खंडोबाची देनगी आसत्ये ती आन् पोरं नसली तर शेतांत कामं कोण करेल. खिलारी बैलजोडीला आजकाल दोन हज्जार रुपये पडत्यात मालक ? तो काय तुमचं सरकार आनून भरणार हाय का सावकाराकडं. बोला..."

" हें तुमचं म्हणणं बरोबर आहे पण..."

" पण आमाला त्यामंदी एक हुशारी बाळगावी लागते बगा. साळंची आवड या पोरांना लागतां कामा नये. तुमाला एक गंमतच दावतो...पांडा अरं पांडा हिकडे ये बघू..."

पांडा नांवाचें एक शेंबडें पोर मला पहायला ' जमलेल्या पोरांच्या घोळक्यांतून बाहेर आलें. यंकटरावांनीं प्रेमानं पांडाला जवळ घेतलं आणि विचारलं.

" पांडा हे साहेब तुला साळंत न्यायला आलेत. जानार कां रं यांच्या संगं ?..."

त्याबरोबर पांडा एकदम ओरडला,

" नाय रं बाबा. मापल्याला साळंत जायचं न्हाई. बाबरोबर शेतांत जायाचं . बैलं हाकायची..."

पांडाच्या तोंडून हे बाणेदार उत्तर येतांच त्या प्रेमळ बापानें त्याची पाठ थोपटली.

" शाब्बास...ह्याः पठ्ठे..." आणि मग माझ्याकडे बघून त्या कनवाळू पित्यानें म्हटलें, " ही आशी शिस्त हाय बगा माझ्या समद्या पोरांना. सहा बच्चे हायेत. पण नुसतं सिंहाचे हायेत. एक बी साळंत यायला तयार व्हायचा न्हाई..."

झालं. म्हणजे कुटुंबनियोजनाच्या बाब-तींत सुद्धां व्यंकानं आमची डाळ शिजं दिली नाहीं. आतां म्हटलं आरोग्याच्या प्रश्नावर तरी आपल्या शहाणपणाचा प्रकाश व्यंकट-रावांच्यापेक्षां जास्त पडतोय कां पाहूं.

" व्यंकटराव, तुम्हाला असं वाटत नाहीं कां कीं सरकारनं खूप प्रयत्न करूनसुद्धां आपल्या खेड्यांतल्या जनतेचीं व्यसनं अजून सुटत नाहींत..."

" आतां व्यसनांत काय वाईट हेंचे मला समजत न्हाई. अहो पुरुषार्थाचें लक्षन हाय

हये. माझ्या आजानं काय व्यसनं कमी केली म्हणतां-, काय ठेवलं नाहीं. अन् माझा बा नं त्येच्याची सवाई. मानूस असावा तर असा आन् आतां हे तमाशाचं म्हनाल तर सरकारच त्येला उत्तेजन देऊन राह्यलंय..."

"अहो, पण तुम्हाला असं नाहीं का वाटत कीं पुरुषांच्या व्यसनीपणामुळं बायका-मुलांना घरांत त्रास होतो..."

"आतां मामा हे बघा. आन् तुमी म्हनता इचार करून उत्तरं द्ये..." वरं का साहेब. व्यसनं काय बाप्यानाच असतात! बायकाबी इड्या वडतात, पानं खातात, तपकीर वडतात..."

आतां यावर मी काय बोलणार? तरीसुद्धां मी म्हणालो, "छेः छेः पण या व्यसनापायीं भांडणं होतात, शिवीगाळ होते, मारामाऱ्या होतात. मला तरी बुवा हें कांहीं ठीक वाटत नाहीं."

"आता कसं बोललांत! अहो पिल्यावर काय सुद्धींत असतायत मानसं? मारामाऱ्या व्हायच्यात् आन् भांडणं बी व्हायची. पन् त्ये समदं सौसारांत हवंच असतंय् की...कोण-च्याशा रायटर्नं परवां लिवलंय् कीं भांडणं म्हंजे वंगणासारखींच असत्यांत म्हनूनं..."

"नाहीं पण मला वाटतं बाईमाणसाच्या जातीला मारणं आणि शिव्या देणं हें कांहीं ठीक नाहीं..."

"शाप चुकलांत बगा तुमी. बायकांनच्या जातीला भांडल्याविगार चैनच पडत न्हाई. त्या भांडतातबी आन् मार बी खात्यात... अन्न ग्वाडच लागायचं न्हाई त्याशिवाय... आन् शिव्या बी अशा फस्कलास देत्यात कीं दादला काय जेंबेल फुडं...हां..."

आणि मग पुढें वांकून खाजगी आवाजांत तो म्हणाला, "एकाच दालल्याच्या दोन बायकांचं भांडान पाहायचं असंल तर इथंच बरं. असं मस फुड रंगतुया. त्याफुडं सगळं रद्द व्हाय पघा."

मला तो फड पाहायची किंवा ऐकायची इच्छा नव्हती. परंतु इतक्यांत समोरच्या दर्वीतल्या बाजूला कांहींतरी चकमक उडाली आणि भांडणाला सुरवात झाली. ऐकतां ऐकतां भांडण टिपेला चढलें. आणि एकीपेक्षां दुसरी याप्रमाणें त्या बायका कचाकचा भांडायला लागल्या. अंदाजावरून हें भांडण व्यंकटरावांच्या 'सुशील' आणि 'सुविद्य' बायकांच्यांतलेंच असावें.

"आरं तिच्या. ह्यांना कुठुन कळलं ग मी भांडनाची आठवन काढीत हुतो म्हनून."

आणि यंकटराव खदखदा हंसायाला लागला. याचे दोन परिणाम झाले. एक म्हणजे आम्ही बसलो होतो ती खोली त्या हंसण्यानें हादरून निघाली आणि दुसरें त्या हंसण्याचा आवाज ऐकूं जातांच तें भांडण तिथल्यातिथें, जागच्याजागीं थांबलें. 'मालक' आज शेतावर नाहींत हे दोघी मालकीणबाई विसरल्या होत्या असें दिसलें.



स्त्री व इस्त्री

तापविता तापते एक, ती तापतसे हरघडी
एक मोडिते घडी,
घालते दुजी चांगली घडी
'कडकी' साठीं कडकलक्ष्मी
कपड्याला ती दुजी.
चुरल्या वस्त्रा हवीच इस्त्री,
वस्त्रचुरायास स्त्री.

—कोंडवा

बायकोच्या तालावर नाचणारे मिलमिशे नवरे शहरांत मी कितीतरी पाहिले असल्यामुळे आपल्या केवळ हंसण्याच्या आवाजानें स्वतःच्या दोन (एक+एक) बायकातील टिपेला पोंचलेलें भांडण अगदीं गपगार करून टाकणारा हा नवऱ्यांच्या जातीचा अस्सल आणि दुर्मिळ नमुना पाहून माझा ऊर अभिमानानें भरून आला. डोळ्यांत आनंदाश्रू आले. आणि ती मनांतल्यामनांत म्हणालो, "प्रभो तुझी करणी अगाध आहे. अणु युगांतसुद्धां दिसणारा तुझ्या सत्तेचा हा प्रभाव पाहून मी धन्य झालों."

नंतर मीदी खालच्या आवाजांत म्हणालो, "एक शंका विचारतो त्याबद्दल रागावूं नका तुम्ही पाटील, पण अशाप्रकारच्या दडपणाखालीं स्त्रियांना ठेवणं बरोबर नाहीं असा आपला आमच्या बाजूला समज आहे..."

"तो तुमच्याच बाजूला ठीक हाय. हिकडे गांवांकडच्या गोष्टी वेगळ्याच असतात. दडपन नको म्हने. दडपनाशिवाय कुठं भागलंय आन मी म्हन्तो त्यांना आवडलं न्हाई. खुश्शाल जावा कीं म्हनावं. बायका काय कमी हायेत म्हनून रडत बसायचं. एक गेली तर दुसरी आणि दुसरी गेली तर तिसरी..."

"नाहीं, पण आजकाल स्वातंत्र्याचं युग आहे म्हणून मला वाटतं कीं स्त्रियांनाहि स्वातंत्र्य असावयास पाहिजे..." मनांतल्या मनांत आगरकरांचे स्मरण करून हा प्रश्न विचारण्याचें नैतिक धैर्य मी माझ्यामागें उभें केलें.

"तुमी लोकांनीं हे गाडं पार बिघडवून टाकलंय पघा. अहो स्वातंत्र्य म्हनजे काय हुरडा हाय. कुनीबी चोळावा आन फाक्का माराव्या. माझं तर सपष्ट मत हाय कीं पायां-तली व्हान पायांतच पाह्यजे. हां, तिला कुरकुरूं द्यावी. आपल्याला बी मजा वाटते. पन म्हनावं 'बाई कुरकूर पन पायांतच राहून'..."

इतक्या वेळ गप्प बसलेले मामासाहेब मात्र यावेळीं अगदीं आनंदानं ओरडले,

"वा रं बहाद्दरा, वेंकटेशा. आतां कसं बोललास..."

भाच्याचें 'आरगुमेंट' आणि त्यावर मामासाहेबांनीं त्याला दिलेली शाबासकी याचें मला यावेळीं फारसें आश्चर्य वाटलें नाहीं. कारण आतांपर्यंतच्या बोलण्याला हें सगळें साजेसेंच होतें.

या जंक्शन् दादल्याकडून आणखी कांहीं वेगळ्या प्रकारची माहिती मिळेल हें अगदीं शक्य दिसत नव्हतें. तेव्हां दुसरें कांहीं तरी सहज विचारायचें म्हणून मी म्हणालो,

"काय हल्ली पुण्याला आला होता कीं नाहीं कधीं?"

"परवांच जाऊन आलो नव्हं कां? पिक्चर बी पाहून आलो..."

"वा वा छान. हें चांगलं केलं तुम्ही. कुठलं पिक्चर पाहिलं?" मला वाटलं होतं कीं 'सांगत्ये ऐका' किंवा असंच कांहीं पिक्चर यानें पाहिलं असेल आणि आपल्याला त्यावर कांहींतरी चवदार ऐकायला मिळेल.

"कुठलं सायबी पिक्चर होतं बा नांव आठवतं न्हाई. हिचका का फिचका कोन मोठा साहेब हाये म्हनं त्याचं..."

"हां हां म्हणजे हिचकॉकचं म्हणतां ना. डायल एम्. फॉर मर्डर' असेल बहुतेक...'

"हां बराबर तोच तोच. डायलेम... डायलेम..."

"मग काय कसं वाटलं तुम्हाला साहेबाचं पिक्चर..."

"थुत् त्येच्या. अगदींच फुसका बार हो. म्हंजे मला काय सगळं टावं न्हाई पन पाव्हन्यानं श्टुरी सांगितली. त्यावरनं मी म्हटलं कीं छ्याः यामंदी कांहींच दम न्हाई..."

"नाहीं पण तुम्हाला काय आवडलं नाहीं तें तर कळूं द्या आम्हाला..."

"अहो बायकोला मारायचं त्याला येवढा नुसता तरास कशापायी. भलता कार जिवाला करून घेतला बगा त्या गड्यानं..."

"मग काय करायला तरी काय पाहिजे होतं?" हिचकॉक्सारख्याची सुद्धां चूक हा काय काढणार यांमुळे माझें कुतूहल फारच वाढलें.

"सोपी गोष्ट. बायकुला उचलायची आन कुनी आसपास न्हाई आसं पाहून टाकून द्यायची हिरींत घडाम्..मग ठोकायची बोंब... अरं कुनी धांवा बायकू हिरींत पडली... आसं कंप्लीट काम करायचं कीं मग नसत्या भानगडी नकोत..."

वेडरवाडीचा यंका यंकटराव झाला नसता आणि डायेरक्टर झाला असता तर त्यानें हिचकॉक्च्या तोंडातच मारली असती असा विचार माझ्या मनांत आला आणि हंसून मी तो व्यक्त करणार इतक्यांत बाहेरच्या अंगानं एक वाकलेली म्हातारी ओरडतच आंत आली.

"यंका आरं प्वारा कवाधरनं चकाट्या पिटत बसलायस रं. काय हसतुयास अन् खिदळतुयास ल्हान पोराबानी. चल ऊठ आन् शेतावर जा. तिकडची कामं कोन तुझा बा करील व्हय् .."

मला या म्हातारीची दया आली. वाटलं आतां यंकटराव तिलाही आपला हिसका दाखवणार. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं तसें कांहींच झालें नाहीं. उलट म्हातारी ओरडतांच यंका घाबरून तडकन् उठला आणि म्हणाला,

"होय की ग माम्ये. पार इसारलोच कीं" आणि माझ्याकडे वळून त्यानें सांगितलें "चला आडिटरसाहेब उठा. तुमीबी शेतावर चला माझ्यासंगं. तिकडची मजा दावतो तुमाला जरा..."

तेवढ्यांत त्या म्हातारीनें आपला मोर्चा यंकटरावाच्या म्हाताऱ्या मामाकडे वळवला आणि ती ओरडली, "आन् तुमीबी यांच्यांत सामील झाला जनुं. जरा ऊनाचं गार सावलीला पडून ऱ्हायाचं. न्हाईतर माळकरी झालांत तर इठ्ठलाचं नांव घ्यायचं सोडून ह्यो काय धिंगाना मांडलाय तुमी बी."

पण म्हाताऱ्या बायकोची ही सरबत्ती ऐकायला मामासाहेब तिथें होतेच कुठें. ते केव्हांच तिथून पसार झाले होते.

मी यंकाबरोबर शेताकडे जायला बाहेर पडलो तेव्हां प्रश्नार्थक नजरेनें मी त्याच्याकडे पाहिलें.

"आतां काय या बायकांच्या आपन तोंडी लागायचंय् व्हय. आन् ही आमची मामी तर इचारू नका. त्या मामाच्या तोंडाला फेस आनलान हिनं बोलून बोलून. मलाबी फडाफडा बोलतिया. पन् मी रागावलो म्हंजे मात्र..."

"आरं यंका आजून तू हितंच आतां निघतोस कीं न्हाई रं भाड्या..." म्हातारी कुठूनतरी ओरडली आणि यंकाचे पुढचे शब्द तिथल्या तिथेंच जिरले...

"माम्ये बरडू नको. हाच निघालो मी" यंका म्हणाला.

मी व यंका मुकाट्यानें चालूं लागलों. यंकाची मान खालीं असल्यामुळे त्याला कांहीं दिसलं नाहीं. पण मी पाहिलं तेव्हां त्याची म्हातारी मामी झाडाखालीं सांवलीला बसली होती.

—आणि आपल्या बोळकं झालेल्या तोंडानं शांतपणें विडी ओढत होती. ••





कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि कै. राम गणेश गडकरी हे मराठींतील विनोदी वाङ्मयाच्या क्षितिजावर तेजानें तळपणारे ध्रुवतारेच! त्यांच्या पावलांचा मागोवा घेत आजच्या विनोदकारांची पिढी आपलें विनोदी लेखन करीत आहे. महाराष्ट्रभाषाप्रभु कै. गडकरी यांच्या अवखळ विनोदाचा हा नमूना आजहि वाचकांना रिझवील यांत शंकाच नाहीं—

स्वयंपाक घरांतील गोष्टी

— बाळकराम

"राष्ट्राचें खरें जीवन स्वयंपाकघरावरच अवलंबून आहे." **—स्वामी विवेकानंद.**

"फ्रान्सच्या सिंहासनावरून भ्रष्ट्युत झाल्याबरोबर माझ्या मुलानें भटारखाना उघडावा; म्हणजे त्याला अन्नाचा तुटवडा पडणार नाहीं."

—नेपोलियन बोनापार्टचा आपल्या मुलाला उपदेश.

"प्रत्येक पुरुषानें जेवण्याच्या गोष्टीकडे प्रथम लक्ष पुरविलें पाहिजे. मला जर कधींच पोटभर जेवावयास मिळालें नसतें, तर माझ्या हातून इतकीं पुस्तकें लिहून होण्याचा सुतराम् संभव नव्हता." **— हरबर्ट स्पेन्सर.**

"अन्नाद्भवति भूतानि। (असतील शितें तर जमतील भुतें.)" **—श्रीमद्भगवद्गीता.**

प्रस्तुत लेखाचा मथळा वाचून लगेच लेखकाच्या नांवावर नजर टाकतांच माझ्या सार्‍या वाचकभगिनी एकदम थबकतील, आणि मला स्वयंपाकघरांतून हांकलून लावण्याचा ठराव करूं लागतील! माझ्या भगिनीवर्गानें आपल्या या गरीब भावंडावर अशी आग पाखडण्यापूर्वी पुढील चार शब्द वाचून पाहण्याची कृपा करावी. माझ्या सुशिक्षित भगिनीजनांच्या विचारशीलतेची मला खात्री असल्यामुळें, या शब्दांकडे त्यांचें रागावलोकन होणार नाहीं, अशी मला पूर्ण उमेद आहे. बाकी एखाद्या निरक्षर बाईनें मात्र हे चार शब्द वाचण्याची तसदी घेतली असती किंवा नाहीं, याची शंकाच आहे! बहुधा पहिल्या दोन ओळींवरच नजर फेंकून तिनें माझा लेख चुलींत टाकला असता, आणि तापलेल्या कलथ्याच्या किंवा जळत्या कोलिताच्या साहाय्यानें मला स्वयंपाकघरांतून पिटाळून लाविलें असतें.

आज मला माझ्या या आवडत्या विषयासंबंधी दोन शब्द लिहिण्याची स्फूर्ति माझ्या भगिनींचें एतद्विषयक लेख वाचूनच झालेली आहे, हें कबूल केलें पाहिजे. सदर लेखांतून दिलेलीं पक्वान्नांचीं कांहीं कांहीं नांवें पाहून प्रथम माझें लक्ष या विषयाकडे वळलें. या नांवाकडे लक्ष देतांच काव्यशास्त्राप्रमाणेंच पाकशास्त्रांतहि काव्यालंकारांना बराच वाव मिळालेला आहे, असें वरवर पाहणारालाहि दिसून येईल. 'स्वयंपाकघरांत'ल्या बर्‍याचशा गोष्टींतून, 'मोहन' हा नायक असावा असें वाटतें! माझ्या पाकशास्त्रांतून मी याला असूयेनें हद्दपार केल्याचें पुढें वाचकांना दिसून येईलच. 'दुधाचा रस्सा,' 'दह्याची भाजी,' 'कांद्याच्या करंज्या,' किंवा 'तिखटमिठाच्या मेसूर वड्या' हीं स्वयंपाकघरांतल्या काव्यशास्त्रांतील विरोधाभास अलंकाराचीं उदाहरणें असून 'भोपळ्याच्या बियांचे अनारसे' अद्भुतरसाच्या कोटींत जमा होतात. 'अलिजा बहादूर' हें पक्वान्न वीररसाचें एकलकोंडें उदाहरण असून 'फजिता' हें हास्यरसाचें अपत्य असावें. 'मुरकी' 'मुरळी' 'होळंगी' हीं पात्रें परभाषावाचक असून संगीत 'मृच्छकटिकां'तल्या बौद्ध भिक्षूप्रमाणें किंवा 'शारदें'तल्या मुसलमान शिपायाप्रमाणें हास्यरसाचाच उठाव करणारीं आहेत. अशा प्रकारची नांमावलि पाहून माझ्या माहितींत असलेलीं आमच्या घराण्यांतलीं पिढिजात पाकरहस्यें वाचकांच्या फायद्यासाठीं पुढें दिलेलीं आहेत. हीं पक्वान्नें कित्येक वाचकांना कदाचित् माहीत असण्याचाहि संभव आहे; परंतु असे वाचक फार थोडेच सांपडतील अशी मला आशा आहे, 'स्वयंपाकघरांतील सामान्य व्यवस्थे' विषयीं प्रथम 'चार शब्द' लिहिल्यानंतर कांहीं पक्वान्नांचीं माहिती देऊन वाचकांची रजा घेण्याचा माझा संकल्प आहे.

स्वयंपाकघरांतील सामान्य व्यवस्था

माझ्या एका भगिनीनें म्हटलें आहे कीं, "स्वयंपाकघरांत आधीं चांगला उजेड पाहिजे." ही गोष्ट अगदीं बरोबर आहे; परंतु या गोष्टीकडे विशेष लक्ष देण्याची तिची सूचना मात्र मला कबूल नाहीं! स्वयंपाकघरांतल्या कोणत्याच गोष्टीकडे अजिबात लक्ष न दिलें, म्हणजे अनायासेंच कामाचा चांगलाच उजेड पडतो, हें उघड आहे. दुसर्‍या एका भगिनीनें स्वयंपाकघर अगदीं आरशासारखें स्वच्छ ठेवण्याविषयीं सूचना केली आहे, ती सुद्धां जराशी चुकीचीच आहे. माझ्या मतें आठ-पंधरा दिवसांनीं घरांतला केर काढणें फार उत्तम! अशानें वेणीफणी करतांना उघडेंच टाकून दिलेलें 'बाकस' वेळीं अवेळीं लाथाडल्यामुळें त्यांतून चोंहीकडे उधळलेलें मणी, टिकल्या, धुंगर्‍या किंवा याचप्रकारचें किडुकमिडुक आठपंधरा दिवसांत एखाद्यावेळीं सांपडून पुन्हां मिळण्याचा संभव

असतो. झालेला केर कोपऱ्यांत गोळा करण्यापूर्वी तिकडच्या धोतराच्या ओलेवतीचा बोळा एकीकडे ठेवलेला बरा; नाहींतर केराचा लेप बसून धोतराला लुगड्याची कळा येते आणि मग धुणी धुवावयाच्या वेळीं आपल्याला धोतर शोधून काढण्यासाठीं उगीच घरभर येरझारा घालाव्या लागतात. एका बाईला तर अशा रितीनें गडप झालेला धोतरांचा बोळा शोधून काढण्यासाठीं तिकडच्या खिशांतलें पैशांचें पाकीटसुद्धां उघडून पाहण्याची तकलीफ घ्यावी लागली ! त्याचप्रमाणें लोटे, गडवे, पाट वगैरे इकडे तिकडे पडलेल्या चिजा केराबरोबर न जाऊं देण्याची खबरदारी घ्यावी. कारण केर भरून टाकतांना मग उगाच जिवापाड ओझें उचलावें लागतें. मी तर म्हणतों कीं, रांगतीं पांगतीं मुलेंसुद्धां केरांत जाऊं देऊं नयेत. कोपऱ्यांतून बाहेर गडबडतांना तीं पुन्हां केर करून ठेवतात. मुलांच्या बाबतींत एकंदरीनेंच जास्त लक्ष दिलेलें कांहीं वाईट नाहीं. गतवर्षी आमच्या गांवीं एका बाईनें गडबडींत आपलें चारपांच वर्षांचें निजलेलें मूलसुद्धां बिछान्यांत गुंडाळलें आणि अखेर बिछान्याच्या वळकट्यांच्या उतरंडीखालीं तें पोर अक्षरशः चेंगरून मेलें ! सकाळीं झालेली ही गोष्ट अकरा वाजतां जेवतेवेळीं तिच्या लक्षांत आली. झालेल्या प्रकरणांत जरासा हलगर्जिपणा झाला असें म्हणण्याचें मी धाडस करतों. कारण नऊ साडेनऊ वाजतांच मुलाची एकदां चौकशी केली असती, म्हणजे मग त्याच्यासाठीं केलेलें सपाट वाटीभर कण्याचें खिमट फुकट गेलें नसतें ! एवढ्यासाठींच मुलांकडे जरा विशेष लक्ष पुरविण्याची मी सूचना करीत आहें. ऐन घाईच्यावेळीं पोळी लाटतांना वरण घाटतांना सकाळपासून भुकेलेला बाळ्या सरिखा रडत आला, तर त्रासिकपणानें ' मर मेल्या ' म्हणून त्याच्याकडे हातांतलें लाटणें किंवा पळी फेंकून मारूं नये. संतापाच्या भरांत बाळ्यावरचा नेम चुकून त्याचीं हाडें मोडण्याऐवजीं पाट्यावर आपटल्यामुळें लाटणें किंवा पळी मोडून चार आण्याचें नुकसान झाल्याचीं अनेक उदाहरणें घडलेलीं आहेत. तसेंच घाईघाईनें भाजी चिरून झाल्यावर रांगतें मूल जवळपास असल्यास विळीचेंपातें उघडे ठेवूनच दुसऱ्या कामाला लागूं नये. पोराच्या जातीनें सहजगत्या हातपाय कापून घेतल्यामुळें पुन्हा विळीचें काम लागल्यास धुऊन घेण्याची यातायात करावी लागते. गडबडीच्या वेळीं होतांहोईतों ' जळ्ळं मेलं कारटं ' तिकडच्या समोर आदळून बसवावें, हें उत्तम. तिकडून ऑफीसचें काम घरीं पाहात बसण्याचेंच सोंग चाललेलें असतें, तिकडे लक्ष देण्यांत कांहींच अर्थ नाहीं. आंघोळीला पाणी उपसून देतांना गंगाळाच्या तळाशीं भाताच्या शितांचा थर बसविण्याची काळजी घ्यावी. पेंढ्याच्या काड्या, कोळसे, भाजीचीं डेखें वगैरे योग्य मिश्रण असल्यानें घरांतली काडीसुद्धां फुकट जात नाहीं, अशी ' तिकड ' चीं खात्री होते. जमल्यास आंघोळीचें पाणी उपसल्यावर प्रथम केर काढावा व नंतर आंघोळीला ' खालीं ' बोलवावें. अशा रंगीबेरंगी पाण्यामुळें, आपण लुगडेंबिगडेंसुद्धां धुऊन घेतल्याचा ' तिकडे ' संशय येऊन उलट आपल्या कामाचा उरक लक्षांत येतो आणि तळचा शितांचा थर पाहिल्यावर भात झाल्याची खूण पटून ' तिकडे ' ऑफिसांत वेळेवर जावयाला मिळण्याची खात्री वाटूं लागते. वेणीफणी स्वयंपाकघरांतच करण्याचा सराव ठेवीला, म्हणजे मग भाकरी करतांना पिठांत केंस गेल्यावांचून राहात नाहींत; आणि अशा ' केशाकर्षणानें ' बनलेली भाकर उभ्या ओणव्यानें ताटांत टाकिली, तरी सहसा तिचे तुकडे होत नाहींत. एका भगिनीनें सुचविल्याप्रमाणें ' वाढतांना ' ताटांत गर्दी करूं नये, पदार्थ थोड्याथोड्या प्रमाणानें वाढावे, म्हणजे ताट पाहूनच जेवणाराचें समाधान होतें. ' विशेषतः पाव्हणे रांवळे असल्यास ही सूचना जरूर अमलांत आणावी मागून घेण्याची सोय नसल्यामुळें पाहुण्यांना ' ताटाकडे पाहूनच समाधान ' मानण्यावांचून अशा प्रसंगीं गत्यंतर नसतें !

यावांचून स्वयंपाकघरांतल्या साधारण व्यवस्थेखेरीज पुष्कळ गोष्टी सांगण्यासारख्या आहेत; परंतु स्थलसंकोचास्तव येथेंच आटोपतें घेऊन मला माहीत असलेल्या मुख्य पदार्थांच्या कृति देऊं लागतों:—

चापट पोळ्या

स्वतःच्या खेरीज दुसरी चांगलीशी पाठ घ्यावी, आपल्या हाताचीं बोटें नीट पसरून हात खूप जोरानें त्या उघड्या पाठीवर

अ.स्टावा. असेंच चारसहा वेळां करावें. चांगल्या चौपटपोळ्या होतात.

धम्मक लाडू

वरच्या प्रमाणेंच फक्त हाताची चांगली भक्कम मूठ करावी, याच पदार्थाला कोटं कोठें 'मुष्टिमोदक' असेंहि म्हणतात. हे दोन्ही पदार्थ वेळीं अवेळीं मुलांना द्यावयाला चांगले असतात.

कणिक तिंबणें

हव्यातशा हातानें दुसऱ्यावर माराचा वर्षाव केला म्हणजे त्याची कणिक तिंबून निघते. हें फार आटा आटीवें पक्वान्न आहे.

विहिणीची रेवडी

मोठ्या मानापानानें विहिणबाईंना बसावयास बोलवावें. शेजारच्या पाजारच्या बायकानां बोलावणें असावेंच. मग वेळ पाहून उखाळ्या पाखाळ्या काढाव्या व घालून पाडून बोलवयास सुरवात करावी, विहीण चांगली तापून निवेपर्यंत उणींपाणीं काढावयाचें सोडू नये. लौकरच साऱ्या बाया हंसावयास लागतात व विहीणीची शोभा होऊन चांगली रेवडी होते. मात्र यांत आपल्याकडे वरमाईपणाचें नातें असलें पाहिजे.

पोळ्या लाटणें

माझ्या भगिनींनीं या कामांत फारच मर्यादशील वृत्ति ठेवल्यासारखी दिसते. पोळय कधीं कधीं पुऱ्या व सटींसामासी पापड लाटण्यापलीकडे त्यांच्या मनाची धांव जात नाहीं. खरें म्हटलें असतां सवड सांपडल्यास कोणताहि पदार्थ लाटावयास मागेपुढें पाहूं नये! अर्थात् संकोची वृत्तीच्या सासुरवाशिणीनें या बाबतींत थोडें जपून वागलें पाहिजे त्यांनीं माझ्या एका भगिनीच्याच शब्दांत म्हणावयाचे असल्यास, 'पोळी फार मोठी लाटूं नये, पुरीसारखी लाटावी,' व इकडे तिकडे कोणी नाहींसे पाहून 'हलक्या हातानें ताळ्यावरून काढून घ्यावी.' ताजी मिळते दुसरे काय? बाकी झाकून ठेवलेली पोळी लाटावयासुद्धां हरकत नाहीं. या कामीं तरतरीतपणा विशेष लागतो.

बर्फीची चटणी

चांगली शेर, दीडशेर बर्फी घ्यावी व सहज हाताला लागेल अशी उघडी ठेवावी, स्वयंपाक करितांना अगर येतां जातां तिचा एकेक बकाणा भरीत जावें घटकेच्या आंत सगळ्या बर्फीची चटणी होते. माझ्या एका भगिनीनें कुरकूर केली आहे कीं, 'दररोज नवीन चटणी करण्यास फार अडचण होते.' माझ्या मतें कोणत्याहि आवडत्या पदार्थाची तेव्हांच चटणी करून टाकतां येते.

थंडा फराळ

दुपारचीं जेवणें झालीं म्हणजे खुशाल तणावून द्यावें व चुलीला वाटाण्याच्या अक्षता द्याव्या. संध्याकाळीं 'तिकडून' कामकाज करून कंटाळून घरीं येणें झाल्यावर आजाराची खबर सांगावी. 'तिकडे' बहुतकरून चुलीची आराधना करण्याचा कंटाळा असतोच! अशावेळीं हजार हिश्शांनीं 'थंडा फराळ' करून वेळ भागवावी लागते. हा पदार्थ उपासाला सुद्धां चालतो.

अंगाचा तिळपापड

बहुतेक प्रकार वरच्यासारखाच. मात्र 'तिकडून' ज्या दिवशीं दोनचार स्नेहि-सोबती संध्याकाळीं फराळाला बोलवायचे झालें असेल त्याच दिवशीं हा पदार्थ करतां येतो. ऐनवेळीं चुलखंडांत जिकडे तिकडे सामसूम पाहून तिकडच्या अंगाचा तिळपापड होतो. पण चारचौघांदेखत बोलावयाचें मात्र नाहीं. कदाचित् दुसऱ्या दिवशीं हा तिळपापड आपल्या अंगावर शेकून घ्यावा लागतो.

पाठीचें धिरडें

सारी तयारी पुन्हां वरच्यासारखीच. पाहुणा मात्र एकच असावा आणि 'तिकडून' विचारणें झालें, म्हणजे आपण जळफळूं लागावें. 'तिकडून' एखाददुसरा शब्द तोंडांतून काढतांच आपण तोंडाला तोंड द्यावें. 'तिकडून' हातघाईवर येणें होतें आणि लौकरच आपल्या पाठीचें चांगलें धिरडें होतें हें पोटाला बाधत नाहीं.

हाडांची पूड

नेहमीं कैदाशिणीप्रमाणें वागणें ठेवावें, वेळ-अवेळ पाहिल्यावांचून तोंडाला येईल तें भकावें. 'तिकड'च्या माणसांना शिव्यागाळी कराव्या. कांहीं म्हणतां कांहीं ऐकूं नये. साऱ्या घराला सळो कीं पळोसें करावें. एखाद्या दिवशीं तरी आपल्या हाडांची चांगली पूड होते! हें पक्वान्न नेहमीं करावयाला सोपें नाहीं.

मनांतले मांडे

आपल्याला जन्मजन्मांतरीं मिळणार नाहींत असे दागिने अंगा-खांद्यावर घालून आपण मिरवत असल्याची नेहमीं कल्पना करीत बसावें. यालाच 'मनांतले मांडे खाणें'





असें म्हणतात. गरिबीच्या संसाराला हा पदार्थ वाटेल तेव्हां करतां येण्यासारखा आहे.

माणसाचें मेतकूट

घरची चांगली श्रीमंती असल्याखेरीज हा पदार्थ होत नाहीं. घरांत चाकरमाणसें पुष्कळशीं असलीं म्हणजे आपण त्यांच्यावर मुळींच लक्ष ठेवूं नये. दळण, बाजारहाट, शिधा वगैरे गोष्टी होतील तशा होऊं द्याव्या. लवकरच साऱ्या माणसांचें छान मेतकूट जमतें. अर्थात् हें उवड्यावरें येई-पर्यंत टिकतें.

घरांदाराचें खोबरें

'तिकडे' बाटलाबाईच्यासारखें एखादें व्यसन लागलेलें पाहतांच आपण वैतागानें चाकर माणसांवर घर टाकून माहेरची वाट धरावी. वर्ष-सहा महिन्यांत साऱ्या घरादाराचें खोबरें होतें. हा पदार्थ जन्मांत एखाद्या वेळेला करितां येतो.

अकलेचा कांदा

आपलें चांगलें आठदहा वर्षांचें पोर घ्यावें त्याची तिन्ही त्रिकाळ सारखी वाखाणणी करावी. तो बोलेल तें त्याला बोलूं द्यावें. 'तिकडून' त्याच्यावर जरा रागवायचें झालें कीं पोराला पोटाशीं धरून दिवसभर रडत बसावें. त्याचे भलभलते लाड मनापासून पुरवावेत. वर्षा दोन वर्षांत पोराचा चांगला अकलेचा कांदा तयार होतो. पुढें याला बाहेरच्या लोकांनीं चांगला फोडून काढतांना पाहिलें म्हणजे मात्र खरोखरीं डोळ्यांना पाणी येतें !

गुळाचा गणपति

आपलेंच तीनचार वर्षांचें पोर घ्यावें. त्याला नेहमीं स्वयंपाकघरांत बसवून ठेवावें. नेहमीं त्याच्या हातावर गोडधोडाचें कांहींतरी ठेवीत जावें. त्याला इकडची काडी तिकडे करूं देऊं नये. शाळेंत सुद्धां जाऊं नये. खायला हवें तसें घालावें; पण जागचा हलूं देऊं नये. लौकरच बसल्याजागीं मुलगा अगदीं गुळाचा गणपति होतो. हा पुष्कळ वर्षें टिकतो.

याशिवाय 'डाळ शिजविणें' 'नाकीला मिरच्या लावणें', 'वाटाण्याच्या अक्षता', 'पुराणांतील वांगीं', 'वाटेल त्या कामांचा खिचडा' वगैरे पुष्कळ लहानसहान पदार्थ सहज करितां येण्याजोगे आहेत; परंतु स्थलसंकोचास्तव त्यांची माहिती देत बसणें शक्य नाहीं. तूर्त दिले आहेत, तेवढ्या पदार्थांचेच माझ्या भगिनींनी मोकळ्या मनानें चीज केलें म्हणजे स्वतः धन्य समजेन. त्यांनीं माझ्या या गुणाचें सहृदयपणें कौतुक करावें एवढेंच, या भोळ्या भाबड्या व गरीब भावंडाचें मागणें आहे.

Statement about ownership and other particulars about newspaper.

DIPAWALI MONTHLY.

(Form IV Rule 8)

1. Place of Publication.
   Dalal art Studio,
   40-42 Kennedy Bridge,
   Bombay 4.
2. Periodicity
   Monthly, published on Ist of every month.
3. Printers name.
   Dinanath Damodar Dalal.
   Nationality
   Indian.
   Address
   40-42 Kennedy Bridge,
   Bombay 4.
4. Publisher's name, Nationality, Address — As per 3 above.
5. Editors name, Nationality, Address — As per 3 above.
6. Name and addresses of individuals who own the newspaper and parteners or shareholders holding more than one per cent of the total capital.
   Dinanath Damodar Dalal.
   Address as per 3 above.
   No parteners or shareholders.

I, Dinanath Damodar Dalal, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 15 Feb. 1960.

D. D. Dalal.
Signature of Publisher.

गरोदरपणाचें महाभारत



‘साधनांनो, गेल्या पाळीस
तुम्हीं मला दगा दिला.
नम्रपणें तुमची सेवा करूनहि.
जो व्हायचा तो •
हाः हाःकार झालाच.
निदान यापुढें तरी या नम्र
सेवकावर दया करा.
या जन्मींच सगळीं नररत्नें
पदरांत पडलीं तर
पुढच्या जन्मीं आम्हीं काय
करायचें ?’

‘साहेब,’ टेबलावर रजेचा अर्ज ठेवीत त्रिविक्रमानें म्हटलें; ‘मला रजा पाहिजे.’

अं ? ’

नाहीं म्हटलं रजा, तीन महिन्यांची ! ’

‘एवढी मोठी रजा ?’ विस्फारलेल्या डोळ्यांनीं अर्जावर नजर टाकीत साहेब उद्गारले. अन् कपाळावरच्या आंठ्या जास्तच ताणत एकदम ओरडले, ‘अहो, पाहिजे तरी कशासाठीं एवढी रजा ?’

‘गरोदरपणासाठीं, साहेब.’

‘काय म्हणालांत ?’

‘गरोदरपणासाठीं रजा पाहिजे, साहेब.’

‘ऑं ?...अहो, गरोदर कोण ? तुमची बायको कां तुम्ही ?’ रागाचा पारा चढवत साहेबानें विचारलें.

परंतु तितक्याच शांतपणें हंसत हंसत त्रिविक्रमानें उत्तर दिलें, ‘साहेब, गरोदर माझी बायकोच आहे. मी निश्चित नाहीं. पण गरोदरपणाचा माझा त्रास कांहीं कमी नाहीं.’

‘असं ! असं !’

आपला साहेब पूर्णार्थानें ‘ कुटुंबवत्सल ’ असल्यामुळें ही ‘ हक्काची ’ रजा तो देणारच याची त्रिविक्रमाला खात्रीच होती.

‘ बायकोचें गरोदरपण म्हणजे एक महाभारत असतं, राजे ! ’ हें एक त्रिविक्रमाचं नेहमींचं ठराविक वाक्य आहे. ह्या महाभारतांत कृष्णासारखं ऐश्वर्य भोगायला मिळतं बायकोला. नवऱ्याला मात्र अज्ञातवासांतल्या पांडवाप्रमाणें सेवाच करावी लागते मरे मरेतो. पण ही गोष्टहि कुणाच्या ध्यानांत येत नाहीं खुद्द पुरुषांच्यासुद्धां येत नाहीं किंवा आली तरी ते त्याकडे दुर्लक्ष करतात याची मात्र त्रिविक्रमाला मनापासून चीड येते. या ‘ भानगडींत ’ आपला बायको-इतकाच वाटा नसतो काय ? हा त्याचा रोखठोक सवाल आहे. ह्याला नकारात्मक उत्तर अद्याप मिळालेलें नाहीं. भावी शास्त्रीय जगतांत काय होईल हें कांहीं सांगतां यावयाचें नाहीं. पण मध्यंतरी होकारात्मक उत्तरच ग्राह्य मानलं पाहिजे. अन् ही गोष्ट जितकी खरी आहे तितकीच खरी दुसरीहि एक गोष्ट स्वाभाविकपणें ठरतें. ती म्हणजे गरोदरपणाचा त्रास स्त्री इतकाच पुरुषालाहि होतो. ह्या नऊ महिन्यांत तिच्या इतकीच ह्यानेंहि काळजी घेतली पाहिजे. नाहींतर भावी वंशाचा दिवा पांचशें कँडल पॉवरच्या विजेच्या दिव्याप्रमाणें झळकण्याऐवजीं रॉकेलच्या जळकट चिमणीप्रमाणें धुरकत राहयाचा. राष्ट्राचा खंबीर आधारस्तंभ होण्याऐवजीं पोखरलेला कुजका बांबू व्हायचा. तेव्हां वंश आणि राष्ट्र ह्यांची हानि होऊं नये म्हणून त्रिविक्रमानें पुरुषांना कांहीं उपयुक्त सूचना केल्या आहेत. विशेषतः गरोदरपणाच्या या काळांत त्याकडे विशेष लक्ष देणें आवश्यक आहे. त्याच सूचना थोडक्यांत येथें मांडल्या आहेत.

गरोदरपणाच्या महाभारतांत एक ते तीन महिन्यांना आदिपर्वाचा काल म्हणून त्रिविक्रमानें संबोधिलें आहे. ह्या पर्वांत स्त्री जशी बेचैन असते तसाच पुरुषहि बेचैन असतो. कांहींतरी नव्या हालचाली स्त्रीला गोचर होऊं लागतात तर स्त्रीच्या नव्या हालचालीमुळें पुरुषाची संभ्रमित अवस्था होते. स्त्रीचें शरीर जरा जरा जड होऊं लागते तर पुरुषाला आधींच डोईजड झालेलें हें ओझें अधिकाधिक जड वाटूं लागते. ह्या कालखंडांत स्त्रीची अन्नावरची वासना उडून जाते. उलट्यांनीं ती बेजार होते. बिचारीला नवऱ्याकडे किंवा (पहिल्या) पोरांकडे लक्ष देण्याची शुद्ध राहिनाशी होते. नवऱ्याची अवस्थाहि विपरीत होते. बायकोच्या उलट्या पाहून त्यालाहि उलट्या यायला लागतात. बरं, बायको आपला उलटीचा प्रताप फक्त मोरींतच दाखवेल असं नाहीं. खुद्द स्त्रीप्रमाणेंच तिची उलटीहि मोठी लहरी असते. ती केव्हां आणि कुठं उफाळून येईल हें कांहीं सांगतां यावयाचें नाहीं तशीच स्त्रीप्रमाणे तीहि कांहीं काबूंत राहत नाहीं. कवीच्या प्रतिभाशक्ती-प्रमाणेंच स्थलकालाचें बंधन तिला नसतें. लाव्हारसाप्रमाणें तिचा प्रवाह उफाळून येतो. मग कधीं नवऱ्याच्या भट्टीच्या कपड्यावर रंगोटी होतें तर कधीं टेबलाला हा सुवासिक नैवेद्य मिळतो. ज्या वेळीं पुरुषानें फार दक्षता घेतली पाहिजे. गृहस्वामिनीला त्यावेळीं रागें भरूं नये. अशा वेळेस अक्षरशः मुकाट्यानें नाक दाबून नवऱ्यानें तो सारा प्रताप कपड्याच्या बोळ्यानें नाहींसा करावा. फार तर नाकांत अत्तराचा बोळा ठेवावा. तें न जमल्यास सुवासिक किंवा (पॅरीस) आवळेल किंवा खोबरेल तेलाचा ठेवावा. अगदींच अनवस्था प्रसंग येऊन चंडीमातेच्या कृपेनें तेंहि घरांत नसले तर गोड्या तेलाचा किंवा रॉकेलचाहि ठेवायला हरकत नाहीं.

हळू हळू रॉकेलचा बोळाच ठेवायची संवय करावी. कारण त्याचा वास जरासा उग्र वाटला तरी त्याच्यासारखें जंतुनाशक तेल दुसरें कोणतेंच नाहीं. बरं घ्यायलाही परवडतें कारण स्वस्तच स्वस्त ! रॉकेलच्या बोळ्याचा परिणाम मोठा आश्चर्यजनक असतो. स्त्रीच्या उलट्यांचाच काय पण इतर कशाचाहि वास म्हणून येतच नाहीं. त्यामुळें ह्या आदिपर्वांत आदिमायेचे थोडेफार दुर्लक्ष झाल्यामुळें घरांत जे अनेक भिन्न भिन्न वास दरवळत असतात, त्यांचा नवऱ्याच्या शरीरप्रकृतीवर विपरीत परिणाम होत नाहीं. उदाहरणार्थ चिरंजीवांनीं स्वयंपाक घरापासून तो दिवाणखान्यापर्यंत केलेले नाना ‘ प्रात्यक्षिकें ’ सुवासदान करीत असतातच. फोडणी करपल्याचा, भात जळाल्याचा किंवा दूध उतूं गेल्याचा खमंग वास इतस्ततः आळीपाळीनें दरवळत असतोच. पण जेवतांनासुद्धां हे वास कांहीं नाकाच्या द्वारांतून आंत प्रवेश करून मेंदूपर्यंत जाऊं शकत नाहींत. कारण मंत्र्याच्या बंगल्यावरील बहाद्दर शिपायाप्रमाणें नाकपुडींतील हे रॉकेलचे बोळे त्यांना तत्काल परतवून लावतात.


पुरुषानें ह्या पर्वांत आणखी एक काळजी घेतली पाहिजे ती म्हणजे अंग मोडून काम करायची. अनेक काय बहुतेक पुरुषांना घरकाम करायचा भारीच कंटाळा येतो. लहानपणीं आईकडून, मोठेपणीं बायकोकडून व वृद्धपणीं पोरीकडून काम करवून घेण्याची अत्यंत वाईट संवय ह्यांना असते. श्रम प्रतिष्ठेचा घोष तिकडे महान् नेते करत असतात. पण हे नादान पुरुष घरांत बायकोला थोडीसुद्धां कधीं मदत करीत नाहींत व अशा अवघडलेल्या स्थितींतसुद्धा तिच्याकडे दुर्लक्ष करतात. त्रिविक्रमाला ही गोष्ट बिलकूल पसंत नाहीं. इतिहासाच्या अध्ययनावरून त्यानें असा सिद्धांत मांडला आहे कीं येत्या फक्त दोन हजार वर्षांच्या आंत [जागतिक इतिहासाच्या दृष्टीनें हा कालखंड फारच लहान आहे ह्याची आपणांस कल्पना नाहीं] स्त्रीचा पुरुषावर पूर्ण वर्चष्मा होणार आहे. अशा वेळेस आपण जर आतां तिला कांहींच घरकामांत मदत केली नाहीं तर त्याचं उट्टं ती त्यावेळेस काढल्याखेरीज राहणार नाहीं. पुरुषाबद्दलचा तिचा द्वेष जास्त जास्त भिनत जाईल व नंतर त्याचा विपरीत स्फोट होईल. तेव्हां विशाल दृष्टि पुढें ठेवून, आपल्या भावी पुत्र-पौत्रादिकांची काळजी बाळगून गरोदरपणीं पुरुषानें मर्दपणें घरकाम करावयास पुढें आले पाहिजे. स्वतःची खोली स्वतःच झाडणें ह्यापासून प्रथम सुरवात करावी. मग हळूं हळूं चहा करणें, गरम पाणी तापवणें, कपडे धुणें, स्वयंपाक करणें व भांडी घासणें अशा एकेका क्षेत्राचा कब्जा घ्यावा. त्यामुळें बायको तुष्ट राहते व आपल्या मनासहि समाधान वाटतें. घरसल्या व्यायामहि होतो. अन् तोहि शरीराच्या सर्वांगास. आपल्या भावी नर किंवा नारी

प्रा. चंद्रकांत इंदापूरकर

रत्नास असा स्फूर्तिदायक आदर्श जन्मायच्या आधींपासूनच मिळत जातो.

ह्या महाभारतांतलें मध्य पर्व चौथ्या महिन्यापासून सुरू होतें व सहाव्या महिन्याच्या अंतापर्यंत चालतें. यामध्यें स्त्रीच्या बाबतींत एक मोठा बदल झालेला दिसून येतो. पहिल्या पर्वात तिची अन्नावरची वासना उडून जाते व तिला अग्दीं मिठाईसुद्धां नकोशी होऊन जाते. ह्या पर्वांत उलट तिची खाण्याची आवड इतकी तीव्र व विविध होते कीं माती किंवा शेणसुद्धां ती मिठाईप्रमाणेंच मिटक्या मारीत खातें. संसारी पुरुषांना त्रिविक्रमाचा सल्ला आहे कीं माती खाण्याच्या तिच्या सहजप्रवृत्तीला आपण उत्तेजन देत रहावें. या प्रवृत्तीचें उदात्तीकरण म्हणजे वाळू किंवा छोटे दगड खाणें. त्यालासुद्धां प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न प्रत्येक पुरुषानें केला पाहिजे. अशा प्रकारें आमच्या राष्ट्रहितैषिणी भगिनी माती, वाळू दगड स्वेच्छेनें खाऊं लागल्या तर राष्ट्राची अन्नसमस्या कशी चुटकीसरशी सुटेल. आणखी एक गोष्ट त्रिविक्रमानें ह्याबरोबरच सुचविली आहे. गृहदेवतेचें तंत्र बदलून गेलें असल्यामुळें भोजन वेळेवर व व्यवस्थित मिळूं शकत नाहीं. (अर्थात् गृहदेवता ही गोष्ट मान्य करत नाहीं हा प्रश्न वेगळा) तेव्हां हळूं हळूं आठवड्यांतून एक दिवस दोन दिवस उपवास करण्याची संवय पुरुषानें स्वतःला लावून घेतली पाहिजे. ह्याचें त्याच्या दृष्टीनें दोन फायदे होतात. एक तर करपट किंवा अर्धवट शिजलेलें अन्न खाऊन पोटदुखी, हगवण, यासारख्या रोगांच्या आहारीं तो पडत नाहीं. दुसरे म्हणजे, उपवासामुळें शरीर निरोगी राहून मन प्रसन्न होतें. राष्ट्रीय दृष्ट्या तर फारच मोठा फायदा होतो. राष्ट्राची आत्मिक पातळी वाढते, नैतिक प्रतिष्ठा विकसित होते व अन्नधान्य समस्या सोडविण्यास मदत होते.

त्रिविक्रमानें या बाबतींत एक राष्ट्रीय (बहुधा तो आंतरराष्ट्रीय पण असावा) विक्रम केला आहे. आपल्या पुत्रांचें पहिलें दशक पुरें करण्याच्या वेळीं त्यानें गरोदरपणांत (अर्थात् सौ. चंपाच्या) एकंदर तीन महिने पूर्ण उपवास व चार महिने अर्ध उपवास केला. सौ. चंपानेंहि पतीस योग्य साथ दिली. ती दोन महिने मातीवर



नवरा म्हणूं नये आपला—

[पुरुष म्हणजे व्यसनी प्राणी अशी आधुनिक बायकांची व्याख्या. त्याला सर्व प्रकारचीं व्यसनें असतात--(आपलें सोडून) त्यामुळें निर्व्यसनी पुरुष बायकांना फार आवडतो. नवऱ्यानें फक्त 'आपलेंच' व्यसन लावून घ्यावें अशी सर्व बायकांची इच्छा असते. त्यामुळें खालील व्यसनें तुम्ही टाळूं शकाल काय ?]

१. रमी आणि ब्रिज--हीं व्यसनें म्हणजे बायकाचे अपरंपार शत्रू. पत्त्यांचा शोध लावणारा माणूस आज जिवंत असता तर तमाम बायकांनीं त्याची जिवंतपणींच प्रेतयात्रा काढली असती यासाठीं पत्त्यांचें व्यसन सोडून द्या--वाटल्यास बायकोबरोबर कवड्या खेळा.

२. मित्राबरोबरच चकाट्या मारणें—ही पुरुषांची मेली वाईट खोड आहे. मित्रांच्यापेक्षां आपण स्वतःच्या बायकोबरोबर तासन्तास गप्पा कां मारीत नाहीं. आणि मित्रांशीं तरीं तासन्तास कसल्या विषयावर बोलत बसतां या प्रश्नांचें उत्तर बायकांना हवे असते—तेव्हां हा नाद सोड सोड—वाटल्यास रामरक्षा वाचा.

३. भटकणें—पुरुष हा जन्मजात भटक्या प्राणी आहे. तो भटकून कुटें जाईल आणि घरीं वेळेवर तरी येईल कीं नाहीं याची तमाम बायांना भीति वाटत असते. नवऱ्यानें फक्त आपल्याबरोबरच भटकावे अशी प्रत्येक आर्य स्त्रीची इच्छा असते—तेव्हां ही भ्रमंति पुरे करा. वाटल्यास शनिवारीं मारुतीला जा !

४. **सिगारेटी**—सिगारेटवर प्रत्येक बायको जळते ! स्वतः जळून पुरुषाला सुख देणारी ही सिगरेट एका परीनें बायकांच्या वर्मावरच घाव घालते म्हणून बायका सिगारेटचं नांव काढलं कीं तापतात. शिवाय 'त्या मेलीला' किती वेळ 'तोंडांत' धरायचं.

तेव्हां हिला सोडा आणि ऑफिसांत जातांना बायकोनें दिलेली बडीशेप चघळत बसा —

— नवरंग


व एक महिना• वाळूवर राहिली. खास अन्नमंत्र्यांनीं दोघांना अभिनंदनपर संदेश पाठवून म्हटलें कीं ,असे राष्ट्रीय वीर व वीरांगना जेव्हां आमच्या देशांत भरघोसपणें निर्माण होतील तेव्हांच आमची अन्नधान्याची समस्या सहजरीतीनें सुटूं शकेल. मात्र असे प्रयोग करूं इच्छिणाऱ्या पुरुपाला त्रिविक्रमाचा जरा आंतल्या आवाजांतला (बायकोला ऐकूं न जाईल इतक्या). एक संदेश आहे. कधीं कधीं उपवासाचा ताण जास्त पडूं लागला तर कोणाचें लक्ष नाहीं असें पाहून हॉटेलांत खुशाल जावें. मिसळ, पावन, आमलेट नाहीं तर कटलेट सरळ खावें. अहो, उपवास करायला तरी थोडी ताकद शरीरांत यायला पाहिजे ना ? खुद्द त्रिविक्रमाच्या प्रयोगांत त्यानें व चंपानें हा मार्ग किती वेळां अवलंबिला हें मात्र अजून उजेडांत आलेलें नाहीं.

सात ते नऊ महिन्याचा काळ म्हणजे या महाभारतांतले अंत पर्व. अद्‌भुत आणि भयानक ! वीररसपूर्ण आणि हृदयभेदक ! आणीबाणीचे समर प्रसंग येथेंच दृष्टीस पडतात. स्त्रीची शारीरिक जडता वाढत जाते त्याच प्रमाणांत कामाची गति मंदावत शून्याप्रत जाते. पण तिच्या तोंडाचा पारा मात्र वरच चढत जातो. स्वतःच्या आईबापांचा, नवऱ्याच्या साऱ्या कुळाचा व तेहतीस कोटी देवांचा उद्धार सहज लीलेनें होतो. शब्दकोशांतदेखील नसणारे कितीतरी शब्द मुखगंगोत्रींतून चटाचट बाहेर येतात. त्याबरोबर मधून मधून करुण किंचाळणें,• अनाकलनीय ओरडणें व हृदयभेदक हातवारे असतात. समुद्रमंथनांतून बाहेर येणाऱ्या हलाहलाची ती पूर्वतयारी असते. शंकराप्रमाणेंच ह्यावेळेस नवऱ्यानें शांत राहिले पाहिजे. कानांत बोळे घालावेत व डोळ्यांवर झांपडें चढवावींत. आदिमायेला प्रत्युत्तर देण्याच्या भानगडींत पडूं नये—अर्थात् आपल्या खोलींतला भूकंप साऱ्या चाळींत पसरूं देण्याची इच्छा नसेल तर ह्यावेळेस केवळ शारीरिकच नाहीं तर अपूर्व मानसिक स्थैर्य लागतें. विशेषतः पहिलेटकऱ्याला जरा जरा प्रथम त्रास होतो.• पण दुसऱ्या•गरोदरपणापासून तो कमी• कमी होत जातो. पांचव्या सहाव्या खेपेपासून उलटा प्रकार सुरू होतो.•हां अकाळविकाळ अवतार व चित्रविचित्र डरकाळ्या नसल्या तर चुकल्यासारखेंच वाटत नाहीं. ह्या किंकाळ्यांची परमावधि झाली व त्या आकाशाला जाऊन भिडल्या कीं तो स्वर्गीय दूत [आपल्या कार्याचें गोड (?) फळ] आदिमातेच्या उदरांतून आपल्याकडून सेवा करवून घेण्यासाठीं पृथ्वीतलावर दाखल होतो. अशावेळीं मनांत ईश्वराचे आभार मानावेत किंवा त्याला जोडे मारावेत व त्या वंशदीपकाची त्याच्या प्राणदातीसह सेवा करण्यास सज्ज व्हावें.

मात्र ही सेवा चालू असतांनाच हळूच नजर चुकवून बेडरूम मध्यें जावें. दार बंद करून घ्यावें आणि फडताळाचें कुलूप अलगद उघडावें. आंत एका डब्यांत जपून ठेवलेल्या संतति नियमनांच्या साधनांना बाहेर काढावें. त्यांच्यासमोर हात जोडावे आणि म्हणावें, ' बाबानो, गेल्या पाळीस तुम्ही मला दगा दिला. नम्रपणानें तुमची सेवा करूनहि जो व्हायचा तो हाःहाःकार झालाच निदान यापुढं तरी या नम्र सेवकावर दया करा. सगळींच नररत्नं या जन्मीं पदरीं पडलीं तर पुढच्या जन्मीं काय करायचं आम्ही ? तेव्हां आतां माझ्याकडे बघा कृपा करा तुमचा उतराई होईन ' अशी प्रार्थना करून परत तीं साधनें व्यवस्थित ठेवून द्यावींत. मनांत मधूनच बजरंगबली हनुमानाचेंहि नांव घ्यावें आणि परत शांत तटस्थ वृत्तीनें कमलदलजलाप्रमाणें संसार करण्यास सुरवात करावी.

घरगुती भांडणावरं

आसवें आणि अरिष्टें



बायकोचा आजार ही आजकालच्या नवऱ्यांची कायमचीच डोकेदुखी होऊन बसली आहे. आणि इतकं असूनहि 'यांच्या स्वभावाला बाई औषधच नाहीं' असा शेरा मारायला बायका नेहमींच तयार असतात ही गोष्ट वेगळी.

त्यामुळें आज अनेक पीडित नवऱ्यांच्या सूचनेला मान देऊन बायकांच्या निरनिराळ्या घरगुती रोगांवरील कांहीं अचूक गुणकारी आणि सुलभ अशा घरगुती औषधांची थोडक्यांत माहिती देण्याचें मी योजिलें आहे. बायकोचा आजार हा आधुनिक संसारांतील अवघड कूट प्रश्न आहे. सकाळीं चांगलं स्वच्छ ऊन पडलेलं असतांना संध्याकाळीं अवचित सोसाट्याचा पाऊस यावा त्याप्रमाणें सकाळीं कचेरींत जातां प्रफुल्लित आणि नटव्या गुलाबकळीप्रमाणं, हंसतमुख असणारी पतिव्रता संध्याकाळीं ऑफिसांतून दमूनभागून आल्यावर आपण पहावं तर अंथरूणांत नसून मुसमुसतेय, शेजारीं मोसंब्यांची करंडी, औषधांच्या पांचसहा बाटल्या, पाव मण बर्फ, आदि रुग्णशुश्रूषेचीं आयुधें पडलेली. अशा भयंकर अवस्थेंत आपल्या प्रियतमेला पाहून आपण धांवाधांव–डॉक्टरांची पायधरणी, अमृतांजन चोळणें, भाताला टाकणें, इत्यादि कवायती केल्या नाहींत तर 'मी मेल्यें म्हणजे सुटाल—' 'असे निर्दय काळजाचे कसे!'–वगैरे भ्रममूलक बडबड सुरू होणार हें ठरल्यासारखंच असतं. वास्तविक त्या दिवशीं एखादं पिक्चर–रमीचा–डाव असा कांहींतरी खास पुरुषी कार्यक्रम आंखलेला असतांना बायकोनें असं आजाराचं निमित्त करून तडफडावं याचा आपल्याला फार राग येतो. आज जेवणाचं खोबरं होणार हें ठरल्यासारखं असल्यामुळें आपली अवस्था त्या डेन्मार्कच्या राजपुत्राप्रमाणें 'जगूं कीं मरूं' अशी होते.

जुन्या जमान्यांत आजीबाईचा बटवा घरोघर असल्यामुळें तत्कालीन पुरुषमंडळींना घरगुती औषधोपचारांच्या माहितीची गरज नसे. पण सांप्रत बायकांच्या आजारावर कोणतेंहि ॲलोपाथी, युनानी अगर आयुर्वेदी औषध लागूं पडत नसल्यामुळें त्यांना वेगळीच 'जंगलीं जडीबुट्टी'ची गरज आहे. पुढील जडीबुट्टीचें प्रत्येक विवाहित पुरुषानें अवश्य पारायण करावें आणि वेळोवेळीं त्याचा उपयोग करावा अशी नम्र सूचना आहे.

डोकेंदुखी

बायकांची डोकेदुखी हा एक अजब रोग आहे. कुमारिका आणि अविवाहित तरुणी यांची डोकेदुखी म्हणजे एक गोड काव्य आहे. या डोकेदुखीवर 'इलाज' करायला प्रत्येक पुरुष धडपडत असतो. पण स्वतःच्या बायकोची डोकेदुखी म्हणजे एक रौद्र कादंबरी आहे या घरगुती आजारामुळें तमाम नवरे हैराण झालेले असतात. लग्नानंतर सुरवातीचे सहा ते आठ महिने कोणत्याहि विवाहित स्त्रीला या रोगाची बाधा होत नाहीं. पण आठदहा महिन्यानंतर बायकोचं

अनुक्रमणिका

डोकं इतकं हलकं झालेलं असतं कीं तें केव्हां, कुठें अन् कसं दुखेल हे कुणालाच सांगतां यायचं नाहीं. सकाळीं ९ वाजतां म्हणजे ऑफिसांत जायच्या वेळेला अगर संध्याकाळीं साडेसहा वाजतां म्हणजे आपण ऑफिसांतून परतायच्या वेळेला बायकांचं मेलं डोकं दुखूं लागतं. या डोकेदुखीवर बाम, अमृतांजनें, सुंठ, ॲस्प्रो, हातोडा—कश्शा कश्शाचाच उपयोग नाहीं. अशा आजारांत बायकोचा चेहरा उतरतो—साधारण रुसल्यासारखा दिसतो. वस्त्रप्रावरणाचें भान राहात नाहीं. रोगी वेड्यासारखे चाळे करूं लागतो. उदाहरणार्थ चहांत साखरेऐवजीं मीठ. चहाच्या पुडीऐवजीं मसाला, बाथरूममध्यें आंघोळीनंतर बदलायला धोतराऐवजीं पातळ असे प्रकार घडूं लागतात. रोगी फारच हळवा असल्यास 'मूक रुदन' करूं लागतो—

अशा प्रसंगी रोग्यास प्रेमानें थोपटावें. विसकटलेले केंस विंचरण्यासाठीं कंगवा आणून द्यावा—कॉटच्या बिछान्याखाली इस्तरीसाठीं ठेवलेलं पातळ हातीं द्यावं—रोग्याचा चेहरा किंचित् प्रफुल्लित दिसूं लागला कीं जरा सावधगिरीनें गालावर टिचकी मारावी. अशा वेळीं एक हात तिच्या गालावर आणि दुसरा हात आपल्या कोटांतील आंतल्या खिशांत चामड्याच्या पाकीटाकडे न्यावा. रोग्याला साधारण २५ ते ३० रुपयाच्या नोटा पाहून बरें वाटूं लागेल. या नोटांची

बा ळ सा मं त

परिणति पातळांत होणार आहे हें रोग्याच्या कानांत सुचवावें. रोग्याचें मन हलकें झालें असल्यामुळें रोग्यास गडबड धांदल सोसत नाहीं. त्यामुळें पातळ आणण्यासाठीं रोग्याला नेण्यासाठीं वाऱ्यापासून बचाव—कारण त्यामुळें न्यूमोनिया होण्याचा संभव असल्यामुळें टॅक्सीसारखें वाहन करावें. आपण इतक्या क्रिया करीपर्यंत रोग्याचा आजार नष्ट होण्याच्या मार्गाला लागतो. रोग्याची मुद्रा पुनरपि प्रफुल्लित होऊं लागते. तो पदर सावरतो. विसकटलेलें कुंकूं नीट करतो आणि खुदकन हंसून गळ्यांत पडतो.

आजकाल वातावरण बिघडलेलें असल्यामुळें साधारण महिन्याच्या पहिल्या सप्ताहांतच बायकांना हा डोकें दुखीचा आजार महिन्यांतून एकदां होण्याचा दाट संभव आहे. करितां या रोगनिवारणार्थ दरमहा पंचवीस रुपयें अवश्य राखून ठेवावे.

डोकें तापणें

या स्त्रैण रोगाची आजकाल प्रत्येक नवऱ्याला फारच काळजी वाटते असें अनुभवांतीं आढळून आलें आहे. विवाहानंतर वर्षाच्या आंतच प्रत्येक विवाहित स्त्रीस या भयंकर रोगाची बाधा होते असें आढळलें. हा रोग रात्रौ ११ नंतर स्त्रीच्या शरीरावर आक्रमण करतो. नवरा ऑफीसांतून परस्पर सिनेमाला गेला—'संध्याकाळीं सिनेमाला जाण्याची तयारी कर' असें सांगून गेला तो आलाच नाहीं—शनिवारीं रात्रीं रमी खेळायला बसला तो रविवारीं सकाळीं उठला—अशा क्षुद्र कारणांनीं विवाहित स्त्रियांना या भयंकर रोगाची बाधा होते. युरोप अमेरिकेंतील प्रयोग शाळांतून या रोगावर फारच मोठें संशोधन चाललें आहे पण अजून पर्यंत परिणामकारक इंजेक्शन सांपडलेलें नाहीं. या रोगांवर रोग्याची अवस्था फारच भयकारक होते. रोगाची बाधा झाल्याचें पहिलें लक्षण म्हणजे अविश्रांत बडबड. अशावेळीं आजूबाजूच्या लोकांनीं विशेषतः नवऱ्यांनीं रोग्याच्या तोंडी लागण्यांचा व्यर्थ प्रयत्न करण्याच्या भानगडींत पडूं नये. रोग्याचें भान नाहींसें होऊन घरांतील कांचपात्रांवर संक्रांत येते—रोग्याची केस फारच हाताबाहेर गेल्यास रोगी वेडेवांकडे हातवारे करायला लागतो. रोग्यास प्रत्यक्ष आपल्या मुलांचेंहि भान नाहींसें होऊन त्यांनाहि या हातवाऱ्यांचा प्रसाद मिळतो. रोगी फारच हळव्या मनाचा असल्यास मुसमुसत गॅलरींत, गच्चींत किंवा व्हरांड्यांत वाट पाहात उभा राहातो. मध्यरात्री दीड वाजेपर्यंत वाट पाहून 'आपल्या संसाराचा सत्यानाश' झाला अशा वेडगळ कल्पनेनें ओरडा ओरडा करूं लागतो. थोड्या वेळानें रोग्यास झोंप लागते व तो सकाळीं जागा होतो. जागा होऊन पाहातो तो आपल्या शेजारचें अंथरुण रिकामें. त्याबरोबर पूर्ववत काल संध्याकाळचीं लक्षणें दिसूं लागतात. साधारण नऊच्या सुमारास "आई-बाबा आले—" अशी मुलांची हांक कानीं येताच रोगाचें उग्र स्वरूप प्रकट होते. पुनरपि कांचपात्रांचा सत्यानाश—आणि परत तीच बडबडीची रेकॉर्ड सुरू होते.

अशा प्रसंगीं नवऱ्यानें काळजीनें चित्ताची शांति ढळूं देऊं नये. मुकाट घरांत येऊन एका मुलास कडेवर घ्यावें—'बाजारांत जाऊन काय आणूं' असें विचारावें. रोगी अशा प्रश्नांना उत्तरें देणारच नाहीं याची खात्री बाळगावी. मुकाट बाजारांत जाऊन भाजीपाला—दोन आण्याचे पेरू-शेंगा या वस्तु आणाव्या. नंतर शांतचित्तानें मोरी साफ करावी. फळीवरची घाण साफ करावी, कॉटमधील ढेंकूण मोजून मारावे आणि मुलांचा गणितांचा अभ्यास घेत बसावं. आपल्यांतील ही आश्चर्यजनक सुधारणा पाहून हलुहळू रोग्याच्याहि प्रकृतींत सुधारणा होते—आणि संध्याकाळपर्यंत रोगी पूर्ववत खडखडीत बरा होतो. मात्र अशा वेळीं रोग्याला पेशवेपार्कांत फिरायला नेण्याखेरीज रोगी पूर्ण सुधारणें शक्य नाहीं हें ध्यानीं ठेवावें.

पोटदुखी

स्त्रियांच्या आजारांत पोटदुखीला फारच महत्त्व आहे. पुरुषांच्या 'मूर्खपणामुळें' लग्नानंतर काहीं महिन्यांनीं ही पोटदुखी उमटायचीच. या वर्षा दीडवर्षांतून एकदा उमटणाऱ्या अल्पकाल पोटदुखीपेक्षां बायकांची दैनंदिन पोटदुखी पुरुषांना फारच हैराण करते. शेजारपाजारच्या घरांतील जंतूमुळें हा रोग स्त्रियांना नेहमीं होतो असें शास्त्रज्ञांनीं सिद्ध केलें आहे. फार पिकलेली फळें, शिळ्या भाज्या यामुळें टॉयफाईड कॉलरा सारखे रोग पसरतात. तर शेजारीपाजारीं सोन्याच्या बांगड्या, मोत्याची कुडीं, बनारसी शालू, मर्फी रेडिओ, स्टीलचें कपाट, आंब्याची करंडी इत्यादि वस्तु आणल्या कीं आपल्या





अनुक्रमणिका

घरीं वाईट जंतूचा संचार होऊन पोटदुखी उद्‌भवली म्हणून समजाच. अशावेळीं 'रोगोत्पादक वस्तु' घरांत आणणाऱ्या शेजाऱ्यांपासून सावध राहावें. कांहीं अडाणी स्त्रियांना असल्या रोगकारक वस्तु घेऊन आपल्या शेजारणींना दाखविण्याची फार वाईट संवय असते. विशेषतः सोन्याचीं कुडीं, सोन्याच्या बांगड्या आणि स्टीलचें कपाट या धातुजन्य वस्तु फारच संसर्गकारक आहेत. रोगाची तात्काळ बाधा करतात. रोगी अस्वस्थ होतो. निंदा करूं लागतो. "आमचं नशीब खोटं त्याला करणार ?" असें ताडबडतो जळफळतो त्याला कांहीं सुचत नाहीं. 'गडे आपणहि तसलं कपाट घेऊं या.' अशा प्रेमळ आग्रह करूं लागतो. कांट्यानें कांटा काढावा या न्यायानें पोटदुखीच्या या रोगाला होमिअपाथिक पद्धतीनें औषधोपचार करावा. हा रोग चटकन् दुरुस्त होण्यास पांचशें ते सहाशें रुपयाचा सहज भुर्दंड पडेल. अशा वेळीं रोग्यावर फारच प्रीति असल्यास आणि अंमळ आपल्यालाहि थोडी बाधा झाली असल्यास पांचशें रुपये कर्ज काढून अवश्य स्टीलचें कपाट आणावें. रोगी तात्काळ दुरुस्त होईल. मात्र अशी चटक लागल्यामुळें रोगजंतूंचा वारंवार प्रादुर्भाव होणें शक्य आहे त्यामुळें अशा प्रकारचा घातक उपचार करण्यापूर्वी काळजी घ्यावी. रोग प्रथमावस्थेंत असला आणि रोगी अशक्त आणि आज्ञाधारक प्रकृतीचा असला तर "आपण पुढल्या एक तारखेस घेऊंया" या पोकळ आणि प्रेमळ आश्वसनावरच रोगी दुरुस्त होईल. मात्र हें औषध वारंवार वापरलें तर रोगजंतु प्रतिकारक्षम होऊन एखाद दिवशीं रोगाचा भडका होण्याचा संभव असतो.

डोकं फिरणं

अल्लड अशा बायकांना हा रोग फार लवकर होतो. कुठलीहि खटपट न करतां छानदार नवरा मिळाला तर कोणत्याही तरुण स्त्रीचं चटकन डोकं फिरतं. लग्नानंतर 'नवऱ्याचं प्रमोशन' हें एक किंचित् काळ डोकं फिरण्याला निमित्त होतं. पण रोगाचा हा प्रकार बराच सुसह्य आहे. या रोगाची आणखी एक उलट बाजू आहे आणि ती दैनंदिन संसारांत वारंवार उद्भवते. नवरा ऑफिसांतील कारकून बाईशी फार बोलतो, हें कानांवर आलं किंवा शेजारच्या मालतीबाईशीं उगाच कांहीं कारण काढून गप्पा मारतो किंवा बायकोच्या माहेरची निंदा करतो—एवढ्या अगदीं क्षुल्लक गोष्टींनीं आजकाल बायकोचं डोकं केव्हांहि फिरतं. घरांत आपण मित्रांना बोलावून पत्त्याचा डाव मांडला आणि बायकोला सात कप चहा तीन वेळा करण्याची आज्ञा फरमावली, न सांगतां रात्रीं ९ वाजतां एखादा पाहुणा जेवायला आणला—सिनेमा ऐन रंगांत आले असतांना आपलं लाडकं अपत्य बोंबलूं लागलं कीं कोणत्याहि समंजस विचारी आणि तरुण स्त्रीला या रोगाची बाधा चटकन होते.

कोणत्याहि रोगाबाबतची बायकांची प्रतिक्रिया तोंडावाटें व्यक्त होते. त्यामुळें जसजसं डोकं फिरूं लागतं तसतसं तोंडहि फिरायला लागतं. सुरवातीला नवऱ्याचा संपूर्ण सगीत उद्धार होतो आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून माहेरी जाण्याची धमकी दिली जाते. रोग्याच्या प्रथमावस्थेंत फक्त अशा धमक्याच दिल्या जातात. प्रत्यक्ष कृति कधींच होत नाहीं हें लक्षांत ठेवावें.

या रोगावर अचूक असें औषध सांपडलेलें नाहीं. वाटल्यास रामरक्षा म्हणून पहावी. अगर गीतेचा दुसरा अध्याय वाचावा. धाडशी नवऱ्यांनीं रोगाचा जोर जास्तच वाढल्यास सरळ कोटटोपी घालून चौपाटीवर अगर अक्षरशः 'माणसांत' हिंडायला जावं. 'मी हिमालयांत जातो' 'वैरागी होतो' अशा धमक्या कांहीं नवरे देतात. पण या जालीम मात्रा नव्हेत हें लक्षांत ठेवावें. कारण आपल्याला नकाशांतसुद्धां हिमालय दाखवितां येणार नाहीं अशी रोग्याची पूर्ण खात्री असते.

कंबर धरणें

हा एक अति विचित्र रोग आहे. रोगांतील नवकाव्यच म्हणा ना ? 'कंबर धरते' म्हणजे काय होतें हें अजून कोणत्याच डॉक्टरला कळलेलं नाहीं. बायकांच्या लचकण्या मुरडण्याच्या हौसेमुळें कंबर धरण्याचा रोग होत असावा. 'कृशकटी'च्या हव्यासामुळेंहि कंबर मोडण्याची पाळी येत असावी असा कांहीं शास्त्रज्ञांचा कयास आहे. यांत रोग्याला कामाचा भारी कंटाळा येतो. स्वैपाक करण्याची फारशी आवड नसलेल्या उनाड महिलांच्या कंबरा नेहमीं लचकतात असा जाणकारांचा अनुभव.

अशा प्रसंगीं पूर्वीच्या काळीं कांहीं तामसी पण शूर पुरुषोत्तम चौदाव्या रत्नाचा यथेच्छ उपयोग करीत. आपल्या पूर्वजांचा या औषधावर फारच विश्वास होता. स्त्रियांची सारी दुखणी या जालीम औषधानें चटकन पळ काढतात अशी त्यांची बालंबाल खात्री होती. पण आज तशा धाडशी पुरुषांची संख्या रोडावली असल्यामुळें या जालीम मात्रेचा उपयोग करणारे पुरुष सांप्रत दुर्मिळ झाले आहेत.

(पान ३४ वर पुढें चालू)





विवाहोत्सुक उमेदवारासाठीं....

आय्. ॲम्. ॲस्.ची परीक्षा



[लग्न करण्यापूर्वी प्रत्येक विवाहोत्सुक तरुणानें एका लेखी परीक्षेला बसलं पाहिजे असा जर का सरकारनें कायदा केला तर आम्हां पुरुषांची फार पंचाईत होईल यांत शंकाच नाहीं. अलीकडे सरकारी नोकरींत हंगामी नोकरांना पुनरपि त्याच जागेवर कायम होण्यापूर्वी पब्लिक सर्विस कमिशनपुढें हजर व्हावें लागतें. त्याप्रमाणें हा कायदा अस्तित्वांत येण्यापूर्वी ज्यांना नवरा होण्याचें भाग्य लाभलें आहे अशा नवरेलोकांना या परीक्षेला बसावं लागलं तर माझी खात्री आहे कीं एकूण नवऱ्यांपैकीं पंचाण्णव टक्के नवरे या परीक्षेंत सपशेल नापास होतील. मग्रूर आय. सी. एस. लोक, मुजोर सुपरिंटेंडेंट, फाजील कारकून, लाचार शिपाई, बावळट लेखक, अजागळ प्राध्यापक, अडाणी संपादक, मूर्ख आमदार, शहाणे मंत्री—ही सर्व मंडळी पटापट नापास होतील.

नवऱ्यांच्या परीक्षेसाठीं प्रश्नपत्रिका कशी असावी याबाबत मी अनेक सुजाण भगिनींशी चर्चा केली, व त्यांच्या सूचना माझ्या विवाहित बांधवांच्या सर्व डिफी-कल्टीज लक्षांत घेऊन हा 'पेपर' तयार केला आहे.]

प्रश्न पत्रिका

[प्रत्येक प्रश्नास पूर्ण बारा मार्क व चार मार्क घाणेरडें अक्षर व अशुद्ध लेखनाबाबत.

प्रश्न १ ला—कोणत्याहि एका विषयावर सतरार्शे पन्नास ओळींचा निबंध.

१ बायको म्हणजे प्रतिपरमेश्वरच !
२ सुंदर स्त्रिया आणि मूर्खपणा.
३ आदर्श बायकोविषयीं माझ्या कल्पना.
४ स्त्री हाच पतीचा अलंकार !

प्रश्न २ रा—खालील विषयांवर टीपा द्या.

१ रॉकेलचा पंप. २ मेलीं कारटीं. ३ रेडियो सिलोन.
४ गंगाची बाटली. ५ केसाळ कंगवा. ६ 'वाईफ्' ची प्रकृति.

प्रश्न ३ रा—खालील प्रश्नांची खुलासेवार उत्तरें द्या.

१ बायकोशीं कडाक्याचें भांडण झाल्यावर शहाणपणाचा मार्ग कोणता ?
२ एक वेळीं चार कारटीं बोंबलूं लागली तर शांतवृत्ति कशी राखावी ?
३ गरोदरपणीं (अर्थात् आपल्या बायकोच्या) आपली प्रकृति ठणठणीत राखण्याचें कांहीं उपाय सांगा.
४ तीन आण्यांत, सहा माणसांना पुरेल एवढी भाजी, मिरचीकोथंबीर आणि दोन पेढ या वस्तु कशा आणणार
५ बायको माहेरीं गेल्यावर घर स्वच्छ कसें राखावें ?
६ आपलं सासर श्रेष्ठ कीं बायकोचें सासर श्रेष्ठ ?

प्रश्न ४ वा—तुमची बायको माहेरी गेली आहे असें समजून ती खूप होईल असं प्रेमपूर्ण, मनोरंजक आणि खुलासेवार पत्र लिहा.

किंवा

बायकोच्या आज्ञेवरून आपल्या सासऱ्यास आपली साग्रंत खुशाली कळविणारें पत्र लिहा.

किंवा

आज घरीं यायला उशीर होणार अशा अर्थाची शिपायाबरोबर घरीं पाठवायची चिठ्ठी अशा झोकांत लिहा कीं बायको बोंबलणार नाहीं.

प्रश्न ५ वा—खालील प्रश्नांची उत्तरें द्या. (कोणतेंहि एक खोडा)

१ बायका आपल्यापेक्षां अधिक शहाण्या असतात. होय/नाहीं.
२ आपलें लग्न झालें नसतें (सध्याच्या बायकोशीं) तर आपण भुकेकंगाल झालों असतो. होय/नाहीं.
३ आपला सासरा हा संत तुकारामाचा दुसरा अवतार आहे. होय/नाहीं.

४ आपल्या बायकोसारखी शहाणी, अक्कलवान्, काटकसरी, मनमिळाऊ, अबोल, हंसतमुख अशी स्त्री त्रिभुवनांत सांपडायची नाहीं. नाहीं/होय.
५ शेजारच्या चिटणीसबाई जरा फाजीलच आहेत. होय/नाहीं.
६ तुमचीं मुलें सुंदर असून आईच्याच वळणावर गेली आहेत. होय/नाहीं.
७ तुम्ही तुमच्या बायकोपेक्षां जादा खर्चिक आहांत. होय/नाहीं.
८ बायकोचें कोडकौतुक कसं करावं हें तुम्हांला मुळींच समजत नाहीं. होय/नाहीं.

प्रश्न ६ वा—खालील प्रसंग तुमच्यावर ओढवले तर तुम्ही काय कराल याचें मुद्देसूद उत्तर द्या.
१ महिन्याच्या तीस तारखेस बायकोनें सिनेमाचा हट्ट धरला.
२ ध्यानींमनीं नसतांना सासुरवाडीची मंडळी थडकली.
३ एकाएकीं रस्त्यांतच बायकोला आयस्क्रीम खाण्याची लहर आली. (खिशांत फक्त पांच आणे आहेत)
४ रात्रीं घरीं यायला विनाकारण उशीर झाला तर.
५ पातळांचे भाव बेसुमार वाढले तर.
६ मेव्हणीच्या लग्नाची खटपट करण्याची जबाबदारी पडली तर.
७ बायको अचानक ऑफिसांत आली तर.
८ पानांत भात गिच्चगोळा आणि आमटी खारट असली तर—

प्रश्न ७ वा—खालील हिशोब चटकन् सोडवा.
१ रोज १ शेर एक अदपाव याप्रमाणें एक महिन्याचे १३ आणे ३ नये पैसे या हिशोबानें दुधाचा हिशोब काय ? (त्यांत चार खाडे-दोन वेळा पावशेर दूध व तीनदां दूध खराब हुवा)
२ ११ रुपये मण इंग्लीश रद्दी व १० रुपये मण मराठी रद्दी या भावानें लोकसत्ता आणि टाईम्स यांच्यापासून महिना काय प्राप्ती सुटेल ?
३ दोन जुनीं पातळें, चार नवे शर्ट, तीन मध्यम फाटके बुशशर्ट यांवर किती किंमतीचें पातेलें येईल ?

प्रश्न ८ वा—खालील व्यावसायिकांचे गुणधर्म थोडक्यांत सांगा.
आमची मोलकरीण, रेशनचा वाणी, पोरांचा मास्तर, ह्यांचा साहेब, पोस्टमन, शिंपी, धोबी, भाजीवाली.

(पान ३२ वरून चालू)

तथापि कामगार वर्गांत आणि शेतकरी बंधूंत आमच्या पूर्वजांचें पाणी झळकत आहे याचा आनंद होतो. या रोगापासून बचाव करण्यासाठीं पुरुषांनी स्वैपाक करण्याची कला शिकून घेणें हें उत्तम. मात्र ही कला आपल्याला अवगत आहे हें रोग्यांला कळलें तर वारंवार या रोगाचा प्रादुर्भाव होण्याचा संभव आहे. विशेषतः अशक्त आणि दुबळ्या प्रकृतीच्या, नरम आणि गुळगुळीत स्वभावाच्या पुरुषांच्या स्त्रियांना हा रोग चटकन होतो. या रोगावर परिणामकारक औषध नाहीं.

स्त्रियांच्या रोगांतील कांहीं महत्त्वाच्या रोगांची चिकित्सा या ठिकाणीं केली आहे. विशेषतः दहाबारा वर्षें संसार केल्यावर यांतील बरेचसे रोग आपल्या अंगवळणी पडतात आणि नंतर त्याचें कांहींच वाटेनासें होतें. उलट असे रोग झाले नाहींत तर कसेसें वाटूं लागतें. पण विवाहाच्या प्रारंभीच्या काळांत तरुण पुरुष असल्या रोग-प्रादुर्भावामुळें बावरतो, घाबरतो. आपल्या सोन्यासारख्या संसारांत हें काय विघ्न आलें यामुळें तो हैराण होतो. पण त्यामुळें घाबरून जाण्याचें कारण नाहीं. उलट नेहमीं रोगप्रतिबंधक औषधांचा मारा केला पाहिजे. रंकापासून रावापर्यंत, शिपायापासून साहेबापर्यंत सर्वांना हे रोग छळत असतात. या रोगाशिवाय हृदयविकार, डोळे फिरणें, डोळे मोडणें, छाती धडधडणें, पोटांत गोळे येणें, इत्यादि अनेक रोग आहेत. त्या सर्वांचें स्थलाभावीं वर्णन करणें अशक्य आहे. तस्मात् होतकरू वक्त्यांसाठीं एक 'घरगुती औषधसंग्रह' मी प्रसिद्ध करणार आहे. लग्नप्रसंगीं भेट देण्यास या पुस्तकाचा खासच उपयोग होईल याची खात्री आहे. • • •

गुदगुल्या—



पुरुष स्त्रीचा जितका जास्त पाठलाग करील, तितकी ती त्याला लौकर पकडेल......

पोशाक आपणास कसा फिट्ट बसेल इकडे स्त्रीचं लक्ष; तर पोशाकांत काय घट्ट (?) आहे इकडे पुरुषांची नजर !

स्त्री हृदयापासून एखाद्यावर जेव्हां प्रेम करते; तेव्हां हृदयाच्या वरच्या कुप्यांत आणखी एका पुरुषासाठीं जागा निश्चित रिकामी असते.



१९५९ सालांतील पॉप्युलर प्रकाशनें

कथा

अनामिका
अरविन्द गोखले ५–००

निळासांवळा
जी. ए. कुलकर्णी ४–५०

चांदणें
सदानंद रेगे ५–००

काव्य

जयकेतु
सदानंद रेगे ५–००

जिप्सी (२/आ)
मंगेश पाडगांवकर ४–००

धृपद
विंदा करंदीकर ५–००

पुष्कळा
पु. शि. रेगे ३–००

नाटक

वेड्याचं घर उन्हांत (आ/२)
वसंत कानेटकर २–५०

स्वप्नीचें हें धन
शं. गो. साठे २–००

प्रवासवर्णन

उडता गालिचा
प्रभाकर पाध्ये ३–५०

ललित निबंध

ऋतुचक्र (२/आ)
दुर्गा भागवत २–५०

साहित्यविषयक

श्रीपाद कृष्ण : वाङ्मयदर्शन
वा. ल. कुळकर्णी ४–००

वाङ्मयीन दृष्टि आणि दृष्टिकोण
वा. ल. कुळकर्णी ५–००

वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी (२/आ)
वा. ल. कुळकर्णी ५–००

समाजशास्त्र, राज्यशास्त्र

इंग्रजी सत्तेविरुद्ध महाराष्ट्रांतील सशस्त्र उठाव
वि. गो. खोबरेकर ५–००

भारताची राज्यघटना
त्र्यं. कृ. टोपे २–५०

राज्योपनिषद्
न. वि. गाडगीळ ५–००

किशोर वाङ्मय

चांदोवा चांदोगा...
सदानंद रेगे १–००

विज्ञान सौंदर्य
प. म. बर्वे २–००



पॉप्युलर प्रकाशन
३५ ताडदेव रोड, मुंबई ७

आस्थेवाईक अभ्यासकांसाठीं
अक्षरशः अद्वितीय......

मुंबई राज्य उत्कृष्ट ग्रंथ
पुरस्कार : १९५८

नागपूर विश्वविद्यालय
मान्य डी. लिट् पदवी प्रबंध

साहित्य अकादेमी पुरस्कृत
१९५९ सालांतील उत्कृष्ट ग्रंथ

हिन्दी अनुवाद प्रकाशन :
मार्च १९६०

भारतीय
साहित्यशास्त्र

: लेखक :
डॉ. गणेश त्र्यंबक देशपांडे
एम्. ए. एल्एल्. बी. डी. लिट्.

पृष्ठसंख्या तीनशें बावन्न : मूल्य साडेबारा रुपये

अनुक्रमणिका

बायको माहेरीं गेल्यावर



गृहिणी, सचिवा, सखी इत्यादि पदव्या असलेली आपली पत्नी कांहीं कारणामुळें माहेरवाशीण झाली तर अशा प्रसंगीं घाबरून न जातां—

झटपट स्वयंपाक कसा करावा

बायको माहेरीं गेल्यावर स्वयंपाक कसा करावा हीच मुळीं एक मौलिक समस्या आहे; आणि उर्वरित मौलिक समस्या म्हणजे दोन वेळचें जेवण पोटांत कसें जाईल ही आहे. झटपट स्वयंपाक हा पत्नीच्या माहेरिक वास्तव्योत्पन्न अडचणीचा तिसरा टप्पा आहे. हल्लींच्या विभक्त आणि राजाराणीच्या कुटुंबसंस्थेमुळें घरांत फारच मोजकीं माणसें असल्याचें सर्वत्र—विशेषतः मुंबईसारख्या मोठमोठ्या शहरांतून आढळून येतें. राजाराणींच्या संसारांतली प्रजाहि बाल्यावस्थेंत असल्यामुळें प्रजेकडून कसलेच वेठ-बिगार करून घेतां येत नाहीं. उलट प्रजेचीच देखभाल राजाराणींना करावी लागते.

मागल्या एक दोन पिढीपर्यंत बाळंतपण करायच्या निमित्तानें का होईना गांवाहून एखादी पोक्तशी काकी, मावशी, आजी, आत्या-बाई मुंबईच्या बिऱ्हाडांत इंपोर्ट होत असे. पण हल्लीं सुतजनन आणि सूतिकाभवनें यांच्यांत संख्यावाढीची एवढी शर्यत लागली आहे कीं, कोणाच्या कर्तबगारीचें कौतुक करावें हा तिऱ्हाइतास प्रश्न पडावा. त्यांमुळें हल्लीं गांवाहून मुंबईस येणाऱ्या काकी—आत्या—आजी या संस्थाहि हळू हळू नाहींशा होत आहेत. या संस्थेचा उल्लेख करण्याचें कारण म्हणजे बायको बाळंतीण असली किंवा समजा, याच सत्कृत्यासाठीं माहेरीं गेलेली असली तरी जेवणाची आबाळ होत नाहीं. म्हणून आत्या—आजी प्रभृतींची गरज आणि महत्त्वहि.

खरें म्हणजे स्त्री ही बालपणापासून वृद्धपणापर्यंत सर्वांना उपयोगी पडणारी आहे. ती तान्हुलें बाळ असते तेव्हां ती बालक्रीडामुळें सर्वांना हवी हवीशी वाटते. जसजशी वाढते जसजशी मोठी होते तसतशीहि ती अधिक अधिकच हवीशी वाटते. ती तारुण्यांत पदार्पण करतें तेव्हां ती पत्नी या नात्यानें हवीशी वाटते. पोक्त होऊं लागली कीं, घरकामांत हेल्पिंग हँड म्हणून हवीशी वाटते. ती म्हातारी आजी झाली कीं नातवंडांना खेळवायला म्हणून तिची गरज असते. अशा प्रकारें स्त्री ही वस्तु निकामी कधींच ठरत नाहीं. तिच्या या उपयुक्ततेमुळेंच तिचा माहेरवास्तव्यजन्य विरह अधिक जाणवतो. उपयुक्त वस्तुवर आपलें प्रेम जडतें. या तत्त्वाची प्रचिती पत्नीच्या बाबतींत प्रकर्षानें येतें. आपलें स्त्रीवर फार प्रेम असतें. ते भव्य दिव्य वगैरे कांहीं नसून केवळ भौतिक उपयुक्तता वादांतून निर्माण झालेलें असतें. कोणत्याहि सामान्य गोष्टीला भव्यतेची झालर लावणें हा जो एक परंपरागत वाङ्मयीन मूर्खपणा आहे, त्याच्याच स्त्रीचें (किंवा वरील) प्रेम दिव्य असतें, हा नमुना आहे. पण तसें कांहीं नाहीं. बायको माहेरीं गेल्यावर आनंदांत असणारे सुखात्मेहि पुष्कळ आहेत आणि ती माहेरीं गेल्यावर स्वयंपाकाच्या हिसक्यानें हैराण झाल्यावर पत्नीविरहाचें व्याकुळ होणारे दुःखात्मेहि पुष्कळ आहेत.

मी स्वतः मात्र दोन्ही वर्गांत मोडत नाहीं. बायको माहेरीं गेल्यावर, स्वैर वागायला मिळेल या आनंदानें हुरळून जात नाहीं. कारण जातिवंत नवरा-बायको घरीं असतांना देखील स्वैरपणा करायला कमी करीत नाहीं. आतां दुसरा वर्ग म्हणजे, बायको माहेरीं गेल्यावर स्वयंपाक करून हैराण होणाऱ्याचा. माझें तसें कांहीं होत नाहीं. आपण बुवा मस्तपैकीं घरीं हातांनीं स्वयंपाक करतों; फर्स्टक्लासपैकीं जेवतों आणि सुखानें कालक्रमणा करतों. बायकोहि माहेरीं सुखांत आणि मीहि इकडे सुखांत. यामुळें आम्हीं दोघे 'एक आदर्श सुखी जोडपें' म्हणून चाळींत ओळखले जातो.

बायको माहेरीं गेल्यावर चारी ठाव स्वयंपाक करणें अर्थात्च शक्य नसतें. कारण साडेदहा वाजतां ऑफिसच्या कामाचा विचका

उंडवायलाहि जायचें असते. संध्याकाळींहि तीच तऱ्हा. घरीं दमून आल्यावर साग्रसंगीत स्वयंपाक करणें कोणत्या नवऱ्याला जमेल ? म्हणून संध्याकाळीहि अनुष्टुप् स्वयंपाक करतों. 'स्वयं'-पाकाचा प्रसंग माझ्यावर अनेक वेळा येत असल्यामुळें मी, बायको माहेरीं गेल्यावर झटपट स्वयंपाक कसा करावा याचे कांहीं आडाखे बसविले आहेत. वानगीदाखल थोडासा मासला खालीं देत आहें.

बायकोला माहेरीं सुपूर्द केल्यावर पहिल्या दिवशीं नेहमींप्रमाणें संपूर्ण स्वयंपाक करण्याची मला खुमखुमी असते. आपली बायको मुलखाची आळसी आहे; तिला चटणी केली तर कोशिंबीर करायचा कंटाळा असतो आणि आमटीचा डोह केला तर भाज्या करायचा कंटाळा येतो अशी एक माझी तिच्याविषयीं गाढ-समजूत आहे. या समजुतीच्या तिरमिरींत मी मंडईतून कोशिंबिरीसाठीं म्हणून लाल लाल टोमॅटो, गाजरें, काकड्या, मुळा वगैरे पदार्थ आणतो, उजवीकडेहि दोन पदार्थ असावेत म्हणून बटाटे, फ्लॉवर, कोबी या भाज्या आणतो. मिरच्या, कोथिंबीर, आलें, कढीलिंब, लिंबू हा बालचमूहि मुबलक आणतों. भाजीला विशेष चव यावी म्हणून चव करून घालण्यासाठीं नारळाची कवड आणतों. भाजी आणखी टेसदार लागावी म्हणून मटारच्या हिरव्यागार टचटचीत शेंगा आणतों. मध्येंच भज्यांचा वेतहि मनांत डोकावतो म्हणून कांदेहि विकत घेतो. तोंडीं लावयला म्हणून थोडेंसें लिंबाचें लोणचेंहि द्रोणांतून आणतों. थोडे सांडगे पापडहि पैदा करतो. या पदार्थांनीं पिशवी तुडुंब भरल्यावर मनांत निराळाच विचार येतो. ताट चटण्या, कोशिंबीर, पापड, लोणचें, भाज्या, उसळी यांनीं गच्च भरलेले असणार. अशावेळीं श्रीखंडाशिवाय जेवण्याला गंमत आणि रंगत नाहीं. हाच तो सुविचार. लगेच मी चक्का, वेलदोडे, चारोळे, केशराचा सबस्टिट्यूट असा केशरी रंग हे पदार्थ खरेदी करतों.

एवढें मस्तपैकीं जेवण झाल्यावर पानाशिवाय गंमत नाहीं म्हणून मी लगेच पानें, चुना, कात, सुपारी विकत घेतों. पण श्रीखंडाच्या खऱ्या जेवणाची गंमत विडा चघळतांना गोल्डफ्लेकचे झुरके घेतल्यावरच येते हें माहीतगारांना निराळें सांगण्याची गरज नाहीं म्हणून अर्धा पाकीट गोल्डफ्लेकहि मी घेतों.

रविवारीं सकाळच्या जनता एक्सप्रेसनें बायकोचें पार्सल पाठविल्यावर मी स्टेशनबाहेर येऊन वरीलप्रमाणें खरेदी करतों आणि अकरा वाजतां घरीं येतों. माझ्या बायकोला कामाचें प्लॅनिंग करून स्वयंपाक करतां येत नाहीं त्यामुळें तिच्या हातून झटपट स्वयंपाक होत नाहीं अशी माझी तिच्याविषयीं नेहमींची तक्रार आहे. म्हणून मी, स्वयंपाक कितीहि मोठा असला तरी माझें असें एक खास तंत्र वापरून झटपट स्वयंपाकाच्या तयारीला लागतों.

स्वयंपाक या संपूर्ण कार्याचें मी तीन प्रमुख पोटभाग पाडतों. (त्यांतला शेवटचा भाग अक्षरशः पोटासंबंधीचाच असतो.) पहिला पोटभाग म्हणजे अग्निस्थापनापूर्व अशी प्राथमिक तयारी. दुसरा पोटभाग प्रत्यक्ष अन्न शिजविणें हा होय आणि तिसरा पोटभाग म्हणजे शिजवलेल्या अन्नावर ताव मारणें. या पद्धतीनें कार्याला सुरवात करतों. 'सर्वारम्भास्तण्डुलाः' या न्यायानें भाताचे तांदूळ निवडायला म्हणून थाळींत घेतों. तांदूळ निवडणें हें वेळखाऊ आणि किचकट काम आहे हें चाणाक्ष अशा माझ्या डोक्यांत लगेच येतें आणि 'तांदळांत फारसे खडे नसणारच' अशी सोयिस्कर समजूत करून घेऊन मी एका पातेल्यांत तांदूळ आणि तांब्याभर पाणी घालतों.

लगेच मला एका महत्त्वाच्या गोष्टीची आठवण होते. एवढा मोठा स्वयंपाक करायचा म्हणजे एनर्जी येण्यासाठीं किंवा टिकण्यासाठीं चहा घेणें आवश्यक आहे असें वाटूं लागतें. लगेच मी चहा करून घेतों. पूजा करण्यापूर्वीं अगोदर शंख-घंटादि पूजाद्रव्यांची पूजा करायची असते किंवा मोठी बिल्डिंग बांधण्यापूर्वीं बिल्डिंग बांधणारे कामगार अगोदर स्वतःच्या झोपड्या बांधतात त्याप्रमाणेंच हें चहा-प्रकरण आहे.

नंतर मी भराभर कामाला लागतों. आज ठरविलेल्या 'फुल मेनू'ची संपूर्ण पूर्वतयारी करतों. कोशिंबिरीसाठीं टोमॅटो चिरून ठेवतों. तिन्ही भाज्या चिरून ठेवतों, कांदे चिरून चण्याचें पीठ भज्यांसाठीं कालवून ठेवतो. आणखी एक कोशिंबीर असावी म्हणून गाजरें आणि मुळे किसून ठेवतो. हाताबरोबर पुऱ्या करण्यासाठीं कणिक तिंबून ठेवतों. तात्पर्य, एकूण एक पदार्थांची पूर्व तयारी करून ठेवतों. आणि मगच स्टोव्हला काकडा लावतों.

एव्हांना एक वाजायला आलेला असतो. आस्ते आस्ते एक एक पदार्थ शिजूं लागतो. अडीच वाजेपर्यंत दोन भाज्या, भात, कांद्यांचीं भजीं एवढेच पदार्थ तयार होतात. पोटांत कावळेच काय परंतु त्या कावळ्यांना पिलें होऊन तींहि कावकाव करूं लागतात. मनांत वाटूं लागतें आपण उगीच या इतक्या पदार्थांचा राडा घातला. हॉटेलांत 'आजचा मेनू' या सबबीखालीं तयार नसलेल्या खाद्यपदार्थांच्या प्रदीर्घ यादीचा बोर्ड असतो ना, त्याहिपेक्षां माझा मेनू मोठा झाला आहे हें मला घड्याळांतला कांटा पावणेतीनकडे झुकतांना कळूं लागतें. पण हें वाटून उपयोग काय ? तीन पोटभागांची पद्धतशीर प्लॅनिंगची माझी खास पद्धत मला नडते. उशीर झाला म्हणून चार दोन पदार्थांना चाट मारावी तर तें शक्य नसते. चिरलेल्या टोमॅटो, गाजर, मुळे, भाज्या यांचें काय करायचें ? झक्कत सगळे पदार्थ करणें भाग पडतें.

शेवटीं पुऱ्याऐवजीं पोळ्या एवढाच शॉर्टकट शिल्लक रहातो. तवा स्टोव्हवर ठेवून पोळ्या करण्याचें मी ठरवतों. पोळ्या लाटायला घेतल्यांवर प्रत्येक पोळीला यदृच्छेनें चमत्कारिक आकार येतो. एक पोळी संकल्पित महाराष्ट्रासारखी दिसूं लागते तर दुसरी त्रिकोणी घडीची व्हायच्या ऐवजीं चक्क वेल्ससहित इंग्लंडप्रमाणें दिसूं लागते. एक चपाती ऑस्ट्रेलियासारखी तयार होते आणि चौथी चपाती डिट्टो आफ्रिकेसारखी दिसूं लागते. मी जेव्हां जेव्हां भाकरी करतों तेव्हां तेव्हांहि नकाशेच तयार होतात.



वि. आ. बुवा

विवाहितांसाठी व्यायाम



[बायकोची ' रनिंग कॉमेंटरी ' म्हणजे संसारांतील अटळ घटना. शाहाणासुरता पुरुष, त्या रनिंग कॉमेंटरी पासून आपला होईल तेवढा बचाव करतो. याकरितां किमान खालील गोष्टींत तुम्ही प्राविण्य मिळविलें पाहिजे.]

१ बायकोनें विनोद केला कीं पोट धरधरून तासभर हंसणें.
२ नया पैशांचा हिशेब तोंड पाठ म्हणून दाखविणें.
३ आज कोणत्या थेटरांत कोणतं पिक्चर लागतंय याची यादी ध्यानांत ठेवणं.
४ बायकोच्या नातेवाईकांचे पत्ते तोंडपाठ करणें.
५ मुलांना स्वतः आंघोळ घालणें.
६ रविवारीं जागा धुवायला मदत करणें.
७ उकडत असलं तरी चोराच्या भयानें सर्व खिडक्या बंद करणें.
८ ऑफीसमध्यें जातांना आज लवकर येतो म्हणून सांगणें.

—नवरंग

फरक एवढाच तिच्या कडांना असंख्य भेगा गेल्यामुळें ती नॉर्वे देशाच्या दंतुर किनाऱ्या प्रमाणें दिसूं लागते.

होतां होतां साडेतीन वाजतां कसाबसा स्वयंपाक होतो. आणि मग एकदम आठवण होते, अरेच्चा ! अजून श्रीखंड तयार व्हायचें आहे. वैतागून मी मनांतल्या मनांत श्रीखंडाला मातृकुलोद्धारक अपशब्द उच्चारतों. पण श्रीखंड करणें तर भाग आहे. जिव्हालौल्य कुणाला सुटलें आहे ! मग श्रीखंडाचा घाट घालतों. मग मी तिसऱ्या पोटभागाकडे वळतों. हाच काय तो या खटाटोपांतला रम्य भाग. ताट, ताट, पाणी घेऊन मी सर्व पदार्थ वाढून घेतों. पहिला घांस तोंडांत जातो त्यावेळीं घड्याळांत टण् टण् टण् टण् करून चाराचे टोके पडतात, आणि जेवून उठतों तेव्हां तेव्हां टण् करून साडेचारचा ठोका पडतो.

अशा प्रकारें तथाकथित प्लॅनिंग आणि तीन पोटभाग केलेला ' झटपट ' स्वयंपाक केला तरी जेवायला किमान दुपारचे चार वाजतात हें माझ्या ध्यानांत येतें. म्हणून मी दुसरे दिवसापासून एकान्नभुक्तव्रत सुरू करतो. एखाद्या दिवशीं फक्त भातच करायचा, एखादे दिवशीं नुसता पाव हाणायचा, एखाद्या दिवशीं नुसत्या पोळ्या न् दूध चापायचं असा क्रम मी सुरू करतों.

या झटपट स्वयंपाकाचे कांहीं प्रकार सांगतों. भात ग्रांवाचा माझा झटपट पदार्थ अक्षरशः प्रेक्षणीय असतो. कारण तो खाणीय आहेच असे छातीवर हात मारून सांगतां येत नाहीं. एका पातेल्यांत मी तांदूळ आणि मुगाची डाळ एकत्र घालतों आणि पातेल्यांत जास्तींत जास्त मावेल एवढें पाणी घालून स्टोव्हवर ठेवतों. स्टोव्हशेजारींच खुर्चीवर मी पेपर वाचीत बसतों. अग्रलेख, बातम्या, राजकीय लाथाळी, परस्पर शिवीगाळ, सिनेमाच्या जाहिराती वगैरे वाचतां वाचतां सगळें पाणी आटून कधीं जातें याचा पत्ता लागत नाहीं. मग मी पुनः तांब्याभर पाणी ओततो आणि त्यांत तिखट, मीठ, हळद चिंचेचें पाणी, गूळ, मसाला घालून पळीनें ढवळतों. थोड्याच वेळांत त्या मिश्रणाला उकळी येते. मग मी त्याला फोडणी देतों. आणि तो ' भात कम् आमटी ' नांवाचा सेमिफ्ल्यूइड पदार्थ जणूं कांहीं भातांत आमटी घालून कालवून खायच्या थाटांत खातों. आपणच केलेला पदार्थ असल्यामुळें झक्कत बरा लागतो.

' भात कम् आमटी ' सारखाच मी ' चपाती कम् पिठलें ' हाहि एक नामांकित झटपट पदार्थ बायको माहेरीं गेल्यावर करीत असतों. एका पातेल्यांत बेसनपीठ घ्यायचें, त्यांत तिखट, मीठ, हळद, कोथिंबीर वगैरे घालायचें, मग पाणी घालून पीठ बरेच घट्ट राहील अशी खबरदारी घ्यायची. मग तिंबलेल्या कणकेचे दोन गोळे गोल आणि चपटे करून, त्यांतील एकाचा वरील पीठाचा जाड लेप द्यायचा. मग कणकेचा दुसरा गोळा त्यावर ठेवून तें संयुक्त बाड लाटण्यानें लाटायचें. आंतील पीठहि कणकेबरोबरच—म्हणजे लाटल्या जाणाऱ्या पोळीबरोबर आंतून विस्तार पावत जातें. मग ती चपाती तव्यावर भाजायची. पोळीच्या दोन पदरांतील चण्याचें पीठहि उष्णता आणि पोळीजन्य वाफ यामुळें शिजतें. अशी पोळी खाल्ली कीं निराळे पिठलें करायला नको आणि पोळीचा एक एक तुकडा मोडून तो पिठल्याला लावून लावून खाण्याचा खटाटोपहि करायला नको. पोळीचा एक लचका दातानें तोडला कीं पिठल्यासहित पोळी तोंडांत जाते.

' पावभाजी ' हाहि एक झटपट स्वयंपाकप्रकार मी हाताळीत (तोंडाळीत) असतों. पावभाजी हा समास द्वंद्व, (पाव आणि भाजी) मध्यमपदलोपी (पाव मिश्रित भाजी) किंवा पावाची भाजी असा षष्ठी तत्पुरुष समास केला तरी चालेल. ' पावासाठीं भाजी ' असा चतुर्थी तत्पुरुष समास केला तरी हरकत नाहीं किंवा ' पाव आहे ज्या भाजीमध्यें ' असा सप्तमी बहुव्रीहि समासाचा द्राविडी प्राणाम केला तरी हरकत कां असावी ?

हा पावभाजी–नामक पदार्थ झटपट कसा करायचा तें सांगतों. ऑफिसांतून येतांना मी काय करतों, इराणि हॉटेलांतून पाव घेतो आणि हिंदु हॉटेलांतून बटाट्यांची सुकी भाजी घेतों. घरीं आल्यावर पावाचें बारीक बारीक दुधी शेवळ्याच्या तुकड्या एवढे तुकडे करतों. ते तुकडे आणि बटाट्यांची भाजी एकत्र करून स्टोव्हवर फोडणीस टाकतों. दोन मिनिटांत वंडरफुल पदार्थ तयार ! एक घास पावभाजी खायचा न् पाण्याचा घोट घ्यायचा या क्रमानें पावभाजी खाल्ली की पोट तुडुंब भरतें. आणि सगळें कसें झटपट. (वि. सू. रात्रीं पोटांत भूक लागलीच तर उशाशीं कांहीं तरी खाद्य पदार्थ ठेवून द्यावेत.)

कधीं कधीं मी काय करतों, बाजारांतून पाव आणतों. आणि शेजाऱ्याशीं गप्पा मारीत बसतों. गप्पामध्यें सर्व विषय येतात. केरळांतल्या कम्युनिस्टांच्या पराजयाच्या मीमांसेपासून ते Rich g·ts richer–टाइप कॉंग्रेसी समाजवादी पॅटर्नपर्यंत बराच वेळ गप्पा मारत बसतों. गप्पा कमी पडत आहेत असें वाटलें कीं, आगामी महाराष्ट्रांत औद्योगिक विकास आणि जात्युच्छेदनाविष्ठित नवसमाजरचना, महाराष्ट्र मागें कां? महाराष्ट्राची अस्मिता इत्यादि हुकमी विषयांवर गप्पा चालू ठेवतों. या वेळेपर्यंत शेजाऱ्याच्या सौभाग्यवती आपल्या नवऱ्यास स्वयंपाक तयार असल्याचें सांगतात. मी याच क्षणाची वाट पहात गप्पा लांबवलेल्या असतात. मी लगेच तडकाफडकी उठतों आणि म्हणतों, "अरेच्या साडे आठ (रात्रींचे) वाजले कीं, मीहि आपला रिकामटेकड्या गप्पा हाणीत बसलोंय. अजून खाना पकवायचा आहे. पाव आणले आहेत. तोंडीं लावायला थोडीशी बटाट्याची भाजी करायचीय अजून. चला, बटाटे शिजायला टाकले पाहिजेत."

माझें हें बोलणें ऐकून श्री. शेजारी म्हणतात, "आतां इथून बटाटे शिजवणार?" मग मी म्हणतों, "करणार काय? कलत्र माहेरीं पाठवून बसलोंय ती तिकडे छबकड्याला हातांत घेऊन खेळवते आणि इथं मात्र आमच्या हातांत लाटणें, झारा, पळी, सांडशी, रवी असलीं आयुधें आलींत. अच्छा! निघावं आतां—"

"अहो आतां कुठं भाजी करणार? आमच्याकडलीच वाटीभर आमटी न्या आणि टोमॅटोची कोशिंबीरहि थोडी न्या." श्री. शेजारी

गृहराज्ञी—



पायांचे पाखे करोनी पांखरापरी उडे
शेजारी बाजारी महिला जिथें तिथें सांपडे
समाजकल्याणास्तव हिंडे दारादारावरी
मुलीं न राही घरी–आज ती गृहराज्ञी हो खरी

—फोंडया

म्हणतात. याचसाठीं होता सारा अट्टाहास. अशा प्रकारचें माझें गप्पापुराण यशस्वी होतें. खोट्या भाबडेपणानें गप्पांत वेळ दवडावयाचा आणि स्वयंपाकाला लागण्याची चिंता व्यक्त करायची हीहि टेकनिक वापरून मी कधीं कधीं वेळ मारून नेतों. स्वतः कांहींच स्वयंपाक न करतांहि आमटी न् कोशिंबीर मिळविणें हीहि नाड्या





अनुक्रमणिका

मतें झटपट स्वयंपाकांत मांडायला कांहींच हरकत नाहीं. कारण, " चला स्वयंपाकाला लागावें " असें वाक्य मी उच्चारल्यापासून अवघ्यो पांच मिनिटांतच मला वाटीभर आमटी न् कोशिंबीर मिळते. उलट ही तर झटपटपणाची परमावधि आहे.

कधीं कधीं ऑफिसमधून घरीं येतांना माटुंग्याला मद्रासी पापड घेऊन दादरला वेंडेकराकडे लोणचें घेतों आणि घरीं आल्यावर एक ट्रिक करतों. एका पातेल्यांत तांदूळ आणि मुगाची डाळ घालून शेजारीं " प्लीज एवढी खिचडी करतां का ? " अशी विनंति करतों. कारण यावेळीं माझें डोकें बरेंच ' दुखत ' असतें. आयती खिचडी आली कीं, खिचडी, लोण्याच्या तुपाचे गोळे, पापड आणि लोणचें यावर, जातिवंत ब्राह्मणाप्रमाणें डाव्या मांडीवर उजवी मांडी ठेवून मस्तपैकीं ताव मारतों. हेंहि झटपट स्वयंपाकांत मोडावें.

एखाद्या रविवारीं एखाद्या मित्राला मी सपत्नीक बोलावतों. जेवायचेंच आमंत्रण असल्यामुळें दांपत्य सकाळपासूनच हजर होतें. घरीं आल्यावर त्यांना कळतें कीं माझी बायको माहेरीं गेलेली आहे. मी त्यांना (खोटें खोटें) म्हणतों, " तुम्ही पाहुण्यासारखें बसायचें. बरं का वहिनी ? तुम्हीहि. मी स्वयंपाक करणार आणि तुम्ही फक्त जेवायचें. बसा पेपर वाचीत. " असें म्हणून मी स्वयंपाकाला ' लागतों '. यावेळीं स्टोव्ह पेटविण्यापासूनच मी वेंधळेपणाचें सोंग करतों. माझी ' त्रेधातिरपीट ' पाहून वहिनी पुढें येते आणि म्हणते, " व्हा बाजूला. तुम्हां पुरुषांची ही कामें नव्हेत. मी करते सगळा स्वयंपाक. तुम्ही तोंपर्यंत ' समितीचें ऐक्य कसें टिकेल ' या विषयावर काथ्याकूट करा. "

गोळी बरोबर लागू पडते. मित्राची पत्नी सगळा स्वयंपाक करते आणि आम्ही फक्त जेवण्याचें सत्कार्य करतों माझ्या मतें हा सर्वांत श्रेष्ठ प्रकारचा झटपट स्वयंपाक आहे. मला वाटतें, तूर्त एवढे झटपट प्रकार पुरे झाले. ● ● ●

[पान ४२ वरून चालू]

किंवा ५३. किंवा ३५५३.) घालावे. यानंतर वारंवार थांबून पाठीचे टांके ढिले झाले असल्याची तक्रार करण्यास सुरूवात करावी. त्यानंतर आणखी-असेच कांहीं टांके भराभरा घालून कांखेचे टांके तोडण्याला सुरवात करावी. (कांख : भा० स्वेटरची.) ते पुढील प्रमाणें :- १, २, ३-३-४; १, २, ३-३-४; (हें करतांना नाच करण्याची आवश्यकता नाहीं. तें अपरिहार्यच ठरल्यास त्यास विणकाम न म्हणता नाचकाम म्हणावें. आणि हें खटकत असल्यास तें थांबवून पुन्हा विणूं लागावें.)

अशा तऱ्हेनें शेवटीं २३ टाके राहिल्यावर कांखेबरोबर गळ्याचेही टांके तोडूं लागावे. ते याप्रमाणें : १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२ असे आणखी पुढें. शेवटीं एक टांका उरल्यावर लोकरच तोडावी. व ती दारावाटें बाहेर उडवावी. स्मरणः-आपल्याकडे अजून लोकर शिल्लक आहे.

पुढचा डावा भाग : म्हणजे तुमचा उजवा भाग, किंवा भा. स्वेटरचा डावा भाग. उजव्याच्या डावीकडे; आणि याच्या उजवीकडे उजवा भाग. हा उजव्या भागाप्रमाणेंच विणावा. फक्त या वेळीं पाठीऐवजीं कमरेच्या टाक्यांचा उच्चार करावा आणि कांखेबरोबर गळ्याचे टांके तोडतांना कांखेचे तोडत जावे. हे उलट बाजूनें तोडवे, उलट म्हणजे उलट नव्हे, सुलटच्या उलट म्हणजेच मागच्याच्या उलट, मागचे उलट धरण्यास आतां सुलट. आणि मागचे न धरल्यासही आतां सुलटच. एकूण सुलट : क्वचित् उलट.

बाह्या : बाह्या दोन असाव्या. दोन्हीं बाह्या शक्यतों सारख्या असाव्यात आणि दोन्ही शक्यतों सारख्या बाह्यांच्या मधोमध मुख्य स्वेटर (म्ह. पाठीचा भाग, पुढचा उजवा भाग पुढचा डावा भाग इ.) यावा. यांत फरक पडल्यास नवऱ्याला टांके घालण्यावांचून व त्याचे असलेले उसवण्यावांचून गत्यंतर उरत नाहीं. यास शस्त्रकर्म असें म्हणतात.

आतां कृति—

पारव्या रंगानें ६३ टाके घालावे. नंतर उजवीकडे वळून ३६ टाके उचलून निजवावे आणि कांहीं (अवश्य वाटल्यास) तोडावे. डावीकडे वळून (टाके घालीत) कांहीं अंतर तोडून कांहीं टांकेहि गंमत म्हणून तोडावेत. यानंतर स्वतःसभोंवतीं एक फेरी मारून जागच्या जागीं बसावें. सुमारें ३६ ओळीनंतर लोकर न तोडतां पुढची बाहीदेखील तशीच विणून नंतर मधोमध कापावे म्हणजे एका बाहीच्या आपोआप दोन बाह्या होतात. इथें विणतांना नियमीतपणें कांहीं टाक्यांनंतर मध्यम आकाराची (४"×२" हा रूढ आकार; तथापि कमजास्त चालेल.) एक जांभई द्यावी आणि बाही कापतांना एक राक्षसी (जायंट-साइज) आळस. यामुळें चुकून तीन वा अधिक बाह्या विणून होण्याचा धोका उरत नाहीं.

याप्रमाणें सर्व भाग उलटीकडून नीट जोडून (किंवा सुलटीकडून जोडल्यास आणि तें कुणी नजरेस आणल्यास त्याला उलटीकडून असें आवर्जून म्हणून) मग बटन पट्टी, गळ्याची पट्टी (दोन्ही मिळून एकच पट्टी) इत्यादि मार्गास लागावें. ती कृति खालीलप्रमाणें :—

पांढऱ्या लोकरीनें ७४ साधे, दोन आंत घेऊन १ साधा, दोरा बाहेर सोडून १९ साधे, २ चा १ दोनदां, २ चा २ दोनदां आणि १ चा १ दोनदां. (सर्व खिडकींतून खालीं.)

लाल लोकरीनें ७५ साधे. १ साधा १९ साधे, ९७ साधे, ३६ साधे, २ चा २ दोनदोनदां आणि २ चा दोनदोनदा दोन दोन आणि दोनदां. (सर्व खिडकींतून खालीं.)

याप्रमाणें एकेक साधा वाढवीत लोकर संपेपर्यंत सर्व खिडकींतून खालीं.

हा स्वेटर उन्हाळ्यांत अत्यंत उपयोगी पैतो. ●

दोन बाह्यांचा स्वेटर



विजय तेंडुलकर

साहित्य :

बराचसा रिकामा वेळ, त्या वेळांत झोंप न घेण्याचा किंवा मैत्रिणी गोळा करून गप्पा न छाटण्याचा खुळा निश्चय, तितकीच खुळी हौस, पुष्कळशी लोकर (नसल्यास एकादा उसवण्यायोग्य—म्हणजे याआधीं स्वत: विणलेला—कपडा; आणि हाहि नसल्यास, एक मेंढी—ही अंगोरा जातीची उत्तम; पण त्यासाठीं तुर्कस्तानांत जाण्याची जरूर नाहीं.) कांहीं ९ नंबरच्या सुया; या न चालतील या अंदाजानें कांहीं ११ नंबरच्या सुया लागतील म्हणून ९ आणि ११ वगळून बाकी असतील तेवढ्या नंबरच्या सुया. शिवणकामाच्या सुया मात्र आसपास घेऊं नयेत; अनुभव असा कीं त्या नको तेव्हां नको तिथें टोंचतात. झालेंच तर कांहीं चापाचीं बटनें, कांहीं शो बटनें, कांहीं पांढरीं बटनें, कांहीं रंगीत बटनें, कांहीं छोटीं बटनें आणि कांहीं मोठीं बटनें; या सर्व बटनांकरितां—अर्थात् काजे; म्हणजेच पर्यायानें एक स्वेटर. तोच तर आतां आपल्याला विणायचा आहे.

मापें:—नवऱ्याकरतां असल्यास त्याचींच; घेता येतील तीं सर्व. यांतून एकूण उंची आणि ढुंगणाचा घेर बाद केल्यावर उरतात तीं सर्व मापें स्वेटरला साधारणपणें उपयुक्त. म्ह० मानेपासून बाहीची लांबी, बाहीपासून मानेची लांबी, लांबीपासून मानेची बाही आणि बाहीपासून बाहीची बाही. (हें न समजल्यास पुनः पुन्हा वाचून नीट समजावून घ्यावें, कारण हें एकदां समजलें कीं, पुढें प्रत्यक्ष मापें चुकलीं तरी हरकत नाहीं. तीं चुकतातच. सर्वांचीं चुकतात. आमचींही चुकतात. विणकामांत उत्स्फूर्त निर्मितीला यामुळेंच वाव रहातो.)

टाक्यांचें प्रमाण:—एका इंचांत बसतील तेवढे टाके. म्हणजे कधीं सात; तर कधीं दहा; कधीं आठही. आणि कधीं कधीं साडे-आठसुद्धां. मात्र कोणत्याही परिस्थितींत नऊ नकोत. नऊ इंचांचा पाऊण फूट होतो आणि एक फुटाला मग फक्त तीनच इंच किंवा टाके बाकी उरतात. इंचांकडून अंदाज जमत नसल्यास टाक्याकडून प्रमाण असें : एक टाक्याला बरा दिसेल तितका इंच. आमच्या एका वाचक भगिनीनें एक टाक्याला अडीच इंच हें सरासरी प्रमाण धरून शिवलेला तिच्या नवऱ्याचा स्वेटर हिममानवाचा पायजामा म्हणून लंडनच्या म्युझिअममध्यें आज मांडण्यांत आला आहे (हिममानवाच्या पायजम्याची कृति पुढील अंकीं.)

कृति

पाठीचा भाग : (छातीच्या भागाच्या साधारणपणें मा.. पाठीशीं येतो तो. छातीच्या भागाची कृति चुकल्यास हाच छातीचा भाग ठरवून छातीचा भाग हा पाठीचा भाग करता येतो. आणि दोन्ही चुकल्यास पाठीचा भाग हा पाठीचा किंवा छातीचा भाग आणि छातीचा भाग हा छातीचा किंवा पाठीचा भाग म्हणून वापरता येतो.)

कोणत्या तरी एका लोकरीनें (मेंढी असल्यास ती सुईंत वारंवार येऊं देऊं नये; एरवीं काम खोळंबतें. शिवाय बिचाऱ्या मेंढीला त्रास

होतोच. त्या दृष्टीनें मेंढी दोन पायांत धरून एक हातांत स्वेटर (म्ह० तयार होऊं घातलेला किंवा भावी) अशी व्यवस्था सोयिस्कर. टंड्रा प्रदेशांतल्या कांहीं कलाप्रिय महिलांमध्यें एक उलट व्यवस्थाही प्रचलित आहे. म्ह. एक हातांत मेंढी, दुसऱ्या हातांत पहिला हात, आणि दोन पायांत (मेंढीच्या; आपल्या नव्हे) सुया. यांत भावी स्वेटरला सोयिस्कर जागा रहात नाहीं असा कांहीं बालबुद्धि टंड्रा महिलांचा उतावळा आक्षेप. परंतु आपले दोन पाय रहातात ते भावी स्वेटरसाठीं, किंवा मेंढीस लाथा मारण्यासाठीं, कसेही वापरता येतात असें या आक्षेपाला पहिल्या टंड्रा महिलांचें अत्यंत समर्पक उत्तर हा सविस्तर वाद 'जागतिक महिला चळवळीची वाटचाल' या सदरांत पृष्ठ ७२ वर पहा) ९९ टाके घालावे आणि चुकून ते १०० झाले असल्यास (तसे ते झालेच असणार.) हे सर्व उसवून पुन्हा ९९ टाके घालावेत. अशा तऱ्हेनें १०० नव्हे तर ९९ च टाके घालावेत आणि मग ६ साध्या ओळी (एक कागद आणि फुटपट्टी घेऊन जीभ बाहेर न काढता शाईनें कागदावर) काढाव्या. यानंतर पुन्हा ९९ टाके (कागदाला) घालावेत. यानंतर आंखलेल्या ओळी (कागदासह) चुरगाळून खिडकीबाहेर नेमक्या फेकून पुन्हा ९९ टाके घालावेत. हे मात्र भावी स्वेटरला. हे शेवटचे. यानंतर घातलेल्या टाक्यांच्या सुबक लडी बांधून पुढील स्वतंत्र विणीला आरंभ करावा—

१ ली ओळ:—हिरव्या किंवा पिवळ्या लोकरीनें पहिले तीन टाके साधे विणावे आणि चौथा बिघडवावा. याप्रमाणें चारही टाके बिघडूं लागेपर्यंत केल्यावर अखेर शेवटीं चार बिघडवलेले येतात. हेच पहिले चार साधे टाके. कारण यांत अधिक वेळ घालवण्यांत हंशील नाहीं.

२ री ओळ:—साधे विणलेले टाके पुन्हा साधे विणावे आणि बिघडवलेले जास्त बिघडवावे. नंतरचा एक टाका उचलावा. (पण फार उंच नको. नाकास दुखापत शक्य.) यानंतर उचललेला खालीं निजवून बिघडलेल्या टाक्यांची एक स्वतंत्र ओळ विणावी. टाका निजवतांना लोकर (अथवा स्वेटर अथवा मेंढी इ०) आपल्या बाजूस घेण्याची कृपा करावी, एरवीं मध्यें टाके आल्यानें पलिकडची लोकर (अथवा मेंढी) घेता येत नाहीं सबब विणकाम कायमचें थांबल्याचीं दुर्दैवी उदाहरणें आहेत.

३ री ओळ:—तांबड्या किंवा निळ्या (किंवा हिरव्या आणि पिवळ्या सोडून दुसऱ्या कोणत्याही) लोकरीनें पहिला टाका विणावा आणि लागलींच तो उचलून घ्यावा. अशा तऱ्हेनें दर एक टाका विणावा आणि लागलींच तो उचलून घ्यावा. असे बरेच टाके उचलून घेतल्यावर अखेर त्यांचें काय करावें असा प्रश्न सहाजिकच पडेल. यांचा एक गोल गुंडा तयार करून तो मुलांना (अथवा कुत्र्याला, मांजराला; किंवा नवऱ्याला; जसें असेल तसें.) खेळण्यास द्यावा. हा चेंडू म्हणून उत्तम.

४ थी ओळ:—दुसऱ्या ओळीप्रमाणें विणलेले टाके विणावे, उचललेले उचलावे, निजवलेले निजूं द्यावे; बिघडलेले जास्त बिघडवावेत. यानंतर उचललेले, लोकर दांतांत धरून आणखी उचलावेत. आणि दांत लोकरींतून प्रथम नीट सोडवून एक गांठ मारावी—इथें चौथी ओळ संपते. (इथें थांबून सुपारी चघळण्याला वा विडा खाण्याला हरकत नाहीं.)

५ वी व ६ वी ओळ:—(आतां कामाला वेग येतो.) पहिल्या व तिसऱ्या ओळीप्रमाणेंच. फक्त बिघडवलेले टाके इथें उचलावेत; आणि उचललेले बिघडवावेत. बाकी सर्व तेंच—फरक काय तो ओळींचा. परंतु तो असून नसून सारलाच.

७ वी व ८ वी ओळ:—दुसऱ्या व चौथ्या ओळींप्रमाणेंच. तोंडांत सुपारी किंवा विडा, एवढाच फरक. सुपारी शक्य तों चिकणी न घेतां खड्या घ्यावी.

९ वी व १० वी ओळ:—तिसऱ्या व दुसऱ्या ओळीप्रमाणें. या गालफडांतला विडा अथवा सुपारी त्या गालफडात न्यावी आणि कांहींतरी गुणगुणावें इतकाच फरक. (इथें थुंकूं नये. तें १३ व्या ओळींत आवश्यक.)

११ वी १२ वी ओळ:—पहिल्या व चौथ्या ओळीप्रमाणें. (थुंकूं नये)

१३ वी व १४ वी ओळ:—थुंकावें, बाकी ११ व्या व १२ व्या ओळीप्रमाणें.

या १४ ओळी यानंतर नेटकी घडी करून खिडकीबाहेर सोडाव्या आणि त्या रस्त्यावर पडण्याची वाट न पहातां पुढच्या चार ओळी त्यापुढल्या चार ओळींबरहुकूम विणून सर्व आठ ओळी तोडून चहा घ्यावा (सरबत चालेल) यानंतरचा भाग फक्त चॉकलेट वा चुइंग गम चघळीत पार पाडायचा आहे.

३७ वी ओळ :—सर्व साधी.

३८ वी ओळ :—सर्व उलटी.

याप्रमाणें हव्या तर आणखी चार दोन ओळी विणाव्यात. (हा भाग ऐच्छिक राहील) पुढच्या ओळीला प्रत्येक बाजूला एक एक टाका वाढवावा आणि उलट बाजूला तो कमी करावा. नंतरच्या ८ व्या, १६ व्या व २४ व्या ओळींना प्रत्येक बाजूला दोन दोन टाके वाढवावेत आणि अर्थात् उलट बाजूला तेवढें आठवणीनें कमी करावेत. यांत चुकतें असें वाटल्यास सर्व कमी करावेत आणि पुन्हां सर्व वाढवावेत. अशा तऱ्हेनें चुकतील तेवढ्या वेळा वाढवून कमी करावेत आणि कमी करून वाढवावेत. मात्र हें सर्व करड्या लोकरीनें. सुईवर आतां कांहीं टांके दिसूं लागल्यास या टाक्यांचें महत्त्व फार मोठें—जवळ जवळ ऐतिहासिक—आहे. तुम्हांला विणकाम येतें याचे हे निर्विवाद पुरावे. हे काळजीपूर्वक एकत्र करून तुमच्या पतिराजांना दाखवण्याकरतां जपून ठेवा. आणि पुढें—

पुढचा उजवा भाग : हा खरें म्हणजे तुमचा उजवा म्हटल्यास स्वेटरचा डावा आणि तुमचा डावा म्हटल्यास स्वेटरचा उजवा भाग होय. कोणत्याही परिस्थितींत एक निश्चित कीं हा डाव्या भागाच्या उजवीकडे येईल आणि यांच्या डावीकडे डावा भाग असेल. यावरून पुरेशा बुद्धिमान् भगिनींना अंधुक कल्पना येण्याला हरकत नाहीं.

पांढऱ्या लोकरीनें (आणि चॉकोलेटची लाळ वर न गळेल या काळजीनें; एरवीं ती चॉकलेटी होईल.) कांहीं टांके (उदा० ३५;

(पान ४० वर मागें चालू)

अनादि कालापासून 'स्त्री' ही सर्व ललितकलांची, पुरुषांच्या पराक्रमाची स्फूर्तिदेवता बनली आहे. आधुनिक युगांतील मिस्किल पुरुषांनीं स्त्रियांना विनोदविषयहि करून टाकलें आहे. 'तुझं नी माझं जमेना––परि तुझ्यावांचून करमेना' असं एका नाटककारानें स्त्री पुरुष कलहाचं यथार्थ वर्णन केलं आहे. त्यामुळें पुरुषी विनोदाची जाणत्या स्त्रियांच्यावर काय प्रतिक्रिया झाली आहे हें जाणून घेण्यासाठीं आम्ही महाराष्ट्रांतील कांहीं प्रमुख लेखिकांना या सदरांत पुरुषांचा यथेच्छ 'मूड' घेण्याची पूर्ण मुभा दिली––पण आमच्या कल्पनेप्रमाणें हा मूड जितका प्रखर आणि संतापी असावा तितका झालेला नाहीं कारण अखेर......

बीबी की है सारी माया
कहीं धूप, कहीं छाया !!

डॉ. सौ. दमयंति सरपटवार ❋ शांता शेळके ❋ सौ. इंद्रायणी सावकार
विजया राजाध्यक्ष ❋ नलिनी सुखठणकर

सुभगा वात्स्यायनींचे अष्टनायक

प्रस्ताविका : डॉ. सौ. **दमयंती सरपटवार**, पी. एच्. डी.

[महर्षि मल्लनाग-वात्स्यायन इ. सनाच्या चौथ्या शतकांत जन्मले. त्यांचे गुरू श्वेतकेतु, बाभ्रव्य, दत्तक, चारायण, घोटकमुख, गोनर्दीय, गोणिकापुत्र व कुचुमार यांच्यापाशीं कामशास्त्राचा विशेष अभ्यास करून तद्नंतर आपला कामशास्त्रावरचा प्रबंध सुवर्णभूमींतील प्रत्यक्ष अनुभवान्ती आडाखे बांधून त्यांनीं गुरुकुलास सादर केला. शिष्याची वैषयिक पारंगतता व अनुभवसिद्ध अनुमानें पाहून कुलपतींनी वात्स्यायनास महर्षि ही पदवी देऊन त्याचा गौरव केला. प्रस्तुत हस्तलिखित पिढ्यान्‌पिढ्या प्रथम मौखिक व तदनंतर लिखित साधनांद्वारा विसाव्या शतकापर्यंत आणून पोंचवण्याचें श्रेय महर्षि वात्स्यायनांच्या अगणित शिष्यपरिवाराला आहे. आजहि नवनवीन संशोधन व साधनें यांची भर ह्या शास्त्रांत पडून त्याची लोकप्रियता वृद्धिंगत होत असली तरी ह्या जीवनोपयोगी व्यवहाराच्या शास्त्रबद्धतेचें खरें श्रेय मुनिवर्यांनाच देणें प्राप्त आहे.

प्रस्तुत मुनिवर्यांची पत्नी सुभगा वात्स्यायनी हिचें नांव मात्र इतिहासाच्या उदरांत गडप झालेलें आढळतें. गुरुवर्यांची तनमनधनेंकरून अष्टौप्रहर सेवा करणारी, त्यांच्या लेखनांत सहकार्य करणारी मातोश्री वात्स्यायनी ही स्वतंत्रप्रज्ञेची सुशिक्षित स्त्री होती. महर्षींशी तिचे अनेक वेळां वादविवाद होत. महर्षींच्या ग्रंथामुळें आधींच दास्यत्व पावलेल्या स्त्रीवर्गाची आणखी दुर्दशा होण्याचा संभव आहे, तसेंच या ग्रंथाच्या परिशीलनामुळें पुरुषजात कायमची वरचढ होऊन स्त्रीच्या भोळ्या स्वभावामुळें तिच्या सकृतदर्शनी उन्नतीवरच तिला संतुष्ट ठेवून पुरुष मात्र पुरोगामीत्वाची बिरूदें मिरवतील असा तिचा युक्तिवाद होता. पण महर्षि तिला बधले नाहींत. म्हणून गुरुपत्नी वात्स्यायनीनें स्त्रीवर्गाच्या उद्धारासाठीं स्वतंत्र प्रयत्न करण्याचा निश्चय करून गुप्तपणें आपणहि प्रात्यक्षिकें करून मुनिवर्यांच्या तोडीसतोड असा खास स्त्रीवर्गासाठीं ग्रंथ निर्माण केला. त्या ग्रंथाचें वाचन व चर्चा तत्कालिन महिलामंडळांत गुप्तपणें होत असा उल्लेख सूत्रकालीन इतिहासाच्या दप्तरीं आढळतो. स्त्रीस्वातंत्र्याची आद्य पुरस्कर्ती म्हणून सुभगा वात्स्यायनी हिचा गौरव होणें इष्ट आहे. आज कैक शतकें होऊन गेलीं तरी ह्या ग्रंथाचा प्रसार गुप्तपणें पिढ्यान्‌पिढ्या चालत राहून आजहि महिला मंडळांत त्याचे पडसाद घुमत आहेत.


अंधारांतील ‘अस्पृश्योद्धारक’

सुभगा वात्स्यायनीचा ‘कामकुसल’ हा ग्रंथ मूळ प्राकृत भाषेंत लिहिला गेला आहे. ह्यांत एकंदर चौदा प्रकरणें दिलीं असून प्रत्येक प्रकरणांत ह्या शास्त्राच्या विविध अंगांचा मूलभूत विचार करून क्लिष्ट भागांची सोदाहरण चर्चा केलेली आढळते. ग्रंथाच्या शेवटीं टिप्पणी व सूचि देऊन तत्कालिक संदर्भाची व्यवस्था केलेली आढळते. ‘कामकुसल’ हा ग्रंथ मुनिवर्य वात्स्यायनांच्या सहवासांत प्राप्त झालेल्या ज्ञानावर आधारित असला तरीसुद्धां तापसी सुभगा वात्स्यायनी हिचे स्वतंत्र परिश्रम प्रज्ञा व स्वभावज्ञान ह्या ग्रंथांत पर्णोपर्णी प्रतीत होतें.

प्राचीन हस्तलिखितें तपासतांना एका अग्निहोत्री घराण्यांत एका प्रकरणाचा शोध लागला त्यावरून नजर फिरवितांना ह्या आर्ष ग्रंथाची माहिती मिळाली. त्यानंतर सतत तीन वर्षे कृष्णाकाठीं दऱ्याखोऱ्यांत झाडाझुडपांत प्रदीर्घ संशोधन करून ‘कामकुसल’ ग्रंथाची जुळवणी आतां पूर्ण झाली आहे. ह्या ग्रंथाचे शुद्धीकरण करून त्याचा सुबोध भाषेंत अनुवाद करून रसिक वाचकांना त्याचा लाभ देण्याची मनीषा आहे. प्रस्तुत ग्रंथांतील एक प्रकरण पुढें उद्धृत करण्यांत आलें आहे त्यावरून या ग्रंथाची महति पटावी.]

अष्टनायक

पुरुषवर्ग हा सकृद्दर्शनी उदारमनस्क वाटला तरी तो स्त्रीवर्गाचा गुप्त रिपु आहे हें माझ्या भोळ्या भगिनींनीं नित्य स्मरणांत ठेवून त्याच्याशीं सामना देतांना जागरूक राहावें. स्त्रीचें अबलत्व ओळखून तिचे विनीत अबोलत्व हीच तिची मूक संमति असें गृहित धरून पुरुष आपला कार्यभाग साधतो. इष्टानिष्टता, नीतिअनीति, कार्यकारण इत्यादि स्वरचित मतप्रणालीचे पाश तिच्याभोंवतीं जखडून आपल्या स्वैरसंचाराला तो निमित्त शोधत असतो. निसर्गनिर्मितीच्या वैश्विक व्यवहारांत पशुपक्ष्यांमध्यें नरमादी एकत्र येऊन सहकार्य करतात पण त्यांचे व्यक्तिनिष्ठ जीवन मात्र स्वायत्त राहातें. उलटपक्षीं मनुष्यप्राण्यांत मात्र ह्या संबंधाला नैतिक पाठबळाचा आधार देऊन लिंगभेदात वर्गविग्रह निर्माण केलेले आढळतात. स्त्री ही आपली अर्धांगी आहे असे वरवर बोलून दाखवण्यांत येतें पण व्यवहारांत मात्र स्त्री ही पुरुषदेहाला सर्वकालीं चिकटून न राहूं देतां तिला सूत्रानें बद्ध करून दास्यत्व स्वीकारण्याची तिला सक्ती करण्यांत येते. निसर्गानें स्त्रीपुरुषांत भेद निर्माण केले पण ते विग्रहासाठीं नसून संधीसाठीं; पण जीवनांत


स्त्री सहवासाभिलाषी

अनुक्रमणिका

पुरुषानें आपला मोठा वांटा उचलून स्त्रीला अन्यायच केला आहे. बहुपत्नीकत्व आपल्या सोयीसाठीं अबाधित ठेवून बहुपतीत्वाची सवलत मात्र स्त्रीला दिली जात नाहीं. सामायिक व्यवहारांत आपलें भांडवल सुरक्षित राखून स्त्रीचें मात्र तन-मन-धनेंकरून अपहरण करण्याचा कुटिल डाव योजण्यास तो सदैव सिद्ध असतो. अशा ह्या पुरुषवर्गानें गोड भाषणानें, फसव्या उपहारानें अनुनय करण्याची प्रवृत्ति दाखविली तरीसुद्धां केतकीवनांत डुलणारा हा मुग्ध नाग अखेरीस स्वाभाविकपणें वळणावर जाऊन डंख केल्याशिवाय सोडणार नाहीं हें भगिनींनीं जाणून घ्यावें. व्यावहारिक वृत्तीच्या ह्या पुरुषवर्गानें स्त्रीच्या उद्धाराचें श्रेय आपल्या त्यागी वृत्तीकडे ओढून घेतलें तरीसुद्धां आपल्या उन्नतींत आपलाहि हिस्सा आहे हें स्त्रीनें विसरतां कामा नये.

वात्स्यायनमहर्षींनीं आपल्या कामशास्त्रांत वर्णन केलेल्या नायिकाप्रकारामुळें स्त्रीस्वभावाचें गुह्य उघडें झालें आहे. मागील प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें शत्रूची बाजू समजावून घेण्यासाठीं ह्या ग्रंथाचा अभ्यास प्रत्येक उपवर मदालसेनें करणें प्रथम आवश्यक ठरतें. पण एवढ्याच परिशीलनानें संपूर्ण कार्यभाग साधला जाणार नाहीं. एतदर्थी प्रस्तुत प्रकरणामध्यें पुरुषवर्गाचा विचार करण्यांत आला आहे. पुरुषवर्ग कामातुर झाल्यानें त्याच्या ठायीं भय वा लज्जेचा अवलेशहि राहात नाहीं. आणि म्हणून निर्लज्ज इतरेजनांची उपाधि कशी टाळावी व आपला इच्छित पुरुष स्त्रीवर्गानें कसा निवडावा ह्याचें दिग्दर्शन प्रस्तुत प्रकरणांत आढळेल. अर्थात् जीवनशास्त्राच्या अबाधित नियमांप्रमाणें आपापला प्रकृतिधर्म व्यवहारचतुर पुरंध्रीनें अगोदर जाणून घेतल्यास नायकाची निवड अनुरूप करणें सुलभ होईल.

स्वाभाविक प्रकृतिधर्म, मनःप्रवृत्ति व जीवनवृत्ति ह्यांचे साकल्यानें परिशीलन केल्यास पुरुषवर्गाचे मुख्यतः तीन विभाग पडतात. ते म्हणजे उत्तम, मध्यम, व कनिष्ठ, ह्याशिवाय अनिष्ट व एकनिष्ट असे दोन प्रकारहि कधी कधीं आढळतात. ह्यापैकीं अनिष्ट जाती उत्तरप्रदेशांमध्यें प्रामुख्यानें आढळते तर एकनिष्ठ ही जाती दाक्षिणात्यामध्यें अधिकश: संभवते.

उत्तम पुरुष हा कामव्यवहारांत जरि अधम ठरत असला तरी त्याच्या सुसंस्कृति धर्मावरच त्याचें साकल्यानें मूल्यमापन करणें सयुक्तिक ठरणार नाही. व्यवहारकाण्डाच्या नियमाप्रमाणें मानलेले " **उत्तमं स्वार्जितं भुक्तं, मध्यमं च परार्जितम् । कनिष्ठं याचितं प्राप्तं, अधमं त्यक्तसेवनम् ॥** " हे दण्डक काम व्यवहारालाहि लागू होतात. जो स्वतः प्रयत्न करून आपले इप्सित मिळवतो तो उत्तम गणावा, जो दुसऱ्या अधिकृत वस्तुचा मालकाच्या गैरहजिरींत फसवणूक करून उपभोग घेतो तो मध्यम, जो भिक्षा मागून आपली वासनापूर्ति करतो तो कनिष्ट व जो दुसऱ्यानें टाकलेल्या उच्छिष्टाचें सेवन करण्यास उद्युक्त होतो तो अधम समजावा. कुचुमाराच्या निर्णयाप्रमाणें क्षणिक सुखाच्यासाठीं त्याग करणाऱ्या वीरापेक्षा, अगर निरपेक्ष व नीरसवृत्तीनें



टायपिस्ट कशी सुंदर असावी !

व्यवहारप्रवण होणाऱ्या पुरुषापेक्षां, आत्मसंतुष्ठेसाठीं सहेतुक पण सतत झटणारा पुरुष निस्संशय उत्तम गणावा. मागील प्रकरणांत अनेक ठिकाणीं ह्या पौरुषेयाचा विचार झाला आहेच तेव्हां पुनरुक्ति करण्यापेक्षां प्रकरणाच्या विषयाकडेच वळणें प्राप्त आहे.

पुरुषांचे सामान्यवर्ग वर उल्लेखिले आहेत त्यानें त्यांच्या सर्वांगीण वैशिष्ट्याचा खुलासा स्पष्ट होत नाहीं. यासाठीं त्यांच्या उपजाति व वर्ण ह्याचें स्पष्टीकरण करणें प्रस्तुत ठरेल. दैहिक रचना, स्थूल स्वभाव, व वैचारिक संस्कार ह्यांचा परिणाम पुरुषाच्या कामव्यवहारावर व तदनुषंगिक पूर्वोत्तरवृत्तीवर होत असल्यामुळें त्या घटकांच्या प्रमाणान्वयें पुरुषवर्गाचे अष्ट प्रकार गणले गेले आहेत.



भलताच राकट !

(१) **ग्रामहस्ती** : ज्याची देहधारणा स्थूल स्वरूपाची असते, बुद्धीनें जो मंद असतो, व आचारांत जो तारतम्य बाळगत नाहीं असा पुरुष प्रामुख्यानें ग्रामहस्ती जातीचा मानावा. ह्याचा वर्ण बहुशः पळशी असून व्यवसाय कर्मकांडाशी निगडित असतो. उदरंभरण हें त्याचें मुख्य उद्दिष्ट असल्यामुळें ग्रामभोजनांत व समारंभांत ह्याची उपस्थिति विशेषत्वानें संभवते. ह्याचें घ्राणेंद्रिय फारच तीक्ष्ण असल्यामुळें कुकर्माचा वास ह्याला तत्काळ उमगतो. सौन्दर्यपुष्पापेक्षां ह्याला पंकज अधिक प्रिय असतें. आणि हा ब्राह्मण असल्यास दैवतास अर्पण केलेलें पुष्प सोवळेपणाच्या सोग्याआड दैवताचे सर्वाधिकारी म्हणून प्रथम आपण हुंगण्यास कचरत नाहीं. षड्रिपूंचा हा अनभिषिक्त राजा असें मानून भ्रष्ट होतांहि श्रेष्ठ समजला जातो. ह्याला विशेष गोडधोड रम्य वाटलें



एकदम किरकोळ !

तरी ह्याचा मुखचंद्र बहुधा आंबटच असतो. उदरभागाच्या विस्तारानें हा सहजच ओळखिला जावा. ह्यास उष्मा सहन होत नाहीं ह्यास्तव गृहीं, कृषिवास्तुवर व भोजनप्रसंगीं हा उत्तरदेह विवस्त्र राखतो. त्याच्या गलथान प्रकृतीमुळें व उदरविस्ताराच्या अवास्तव व्याप्तीमुळें ह्याची गति स्वभावतांच मंद असते. त्याला काळ, काम, वेगाची लवहि तमा वाटत नाहीं. भूकशमन हेंच त्याचे मुख्य साध्य असल्यामुळें त्यासाठीं स्थान व साधनें ह्यांची वास्तपुस्त त्याला महत्वाची वाटत नाहीं. वर्णानें हा जरी श्रेष्ठ वाटला तरी ह्याची मनप्रवृत्ती शृगालाची असते. स्त्री ही आपल्या मालकीची उपभोग्य वस्तु असें मानून तिला वश करण्यासाठीं हा आतुर असला तरी सोंवळेपणाची भूमिका अबाधित राखण्यासाठीं



देह गोरा – मन काळं !

हा डोळ्यांचा अधूपणा भासवीत आपल्या तीक्ष्ण कानानें सावजें हेरित असतो. दिवाभीताप्रमाणें हा आपलें इप्सित अंधारांतच संचित असतो. तसेंच वृत्तीनें निशाचर असूनहि हा शास्त्राधार दाखवून स्वतःला संयमी म्हणवतो. उजेडांत स्पर्शास्पर्शाचें बंधन मानण्याचे सोंग पटवून देखील अंधारांत अस्पृश्योद्धार करण्यास हा कचरत नाहीं. माझ्या अननुभवी भगिनीनों, ह्या ग्रामहस्ती पुरुषवर्गाला चार हात दूरच ठेवा कारण ह्याच्या आहारीं गेल्यास त्यापासून अर्थाअर्थी कांहीं लाभ न होतां उलट आपलें स्वत्व गमावण्याची पाळी तुमच्यावर येईल. धर्मार्थ वृत्तीच्या ह्या नरवराला चारी पुरुषार्थांत श्रेष्ठ असा जो काम पुरुषार्थ तोहि धर्मार्थच हवा असतो. अशा वर्गापासून आपले तनमनधनें-करून रक्षण करणें हे व्यावहारिक वा शारिरीक दृष्टया सयुक्तिकच ठरते. कारण महामुनि गोणिका पुत्रांच्या तत्वप्रणालीप्रमाणें 'असंगाशीं संग म्हणजे आसूंचा उत्सर्ग.'

(२) **पद्मश्री :** पुरुषश्रेष्ठांच्या जातींत पद्मश्री ही जाती विशेषत्वानें उच्च मानली जाते. स्त्रीवर्गाच्या सान्निध्यानें ह्याला स्फूर्ति मिळून तो आपलें कार्य हिरीरीनें करण्यास उद्युक्त होत असतो. ह्याला वस्त्रप्रावरणाची व सुवासांची अभिजात आवड असते. ऋतुमानाप्रमाणें वेष बदलणें प्रकृतिधर्मान्वयें जरी इष्ट ठरलें तरी गौरवाच्या महत्त्वाकांक्षेमुळें हा प्रकृतिधर्माला गौण मानून अनिष्ट वेषभूषेचा पिसारा मिरवत सदैव वावरत राहतो. स्त्रीसहवासाची अभिलाषा ह्याच्या ठायीं सदैव जागृत असल्यामुळें समारंभांत, वाहनांत व पदस्थ असतांनाहि स्त्रीवर्गाचें अस्तित्व हा चाणाक्षपणानें संशोधित तिच्या निकटवर्ति राहण्याचा प्रयत्न करीत असतो. ह्याला चौदा विद्या व चौसष्ट कलांची आवड असली तरी त्याचें अंतिम ध्येय फक्त एकाच कलेकडे केंद्रित असतें. कलेच्या माध्यमाची चतुर परीक्षा करून त्याद्वारें भावनांचे हेलावे निर्माण करून नादसाधन करणें ह्यांतच पद्मश्रीचें खरें कौशल्य असतें. पद्मश्रीला आकृष्ट करणें सुलभ होण्यासाठीं अंगानुराग, कृत्रिम पण चित्ताकर्षक वेषभूषा, नेत्राभिनय व अंगप्रत्यंगाची उठाठेव करणें



दास/सुदास !

स्त्रीवर्गास साध्य करावें लागतें. हा पुरुष एकदां आकृष्ट झाला कीं तो सदैव आश्लिष्टच राहण्यांत सुख मानतो. अपमान, विरह अथवा त्याग ह्याला विरक्त न करतां उलट त्यामुळें इष्ट नायिकेप्रत त्याची रति अधिकच वृद्धिंगत होते. आपल्या प्रियरमणीबरोबर जनसमुदायांत प्रेमालाप करणें जरी संयुक्तिक ठरत नसलें तरी उपजत राजकारणी मनःप्रवृत्तीमुळें जनसंमर्दाच्या अनवधानाच्या क्षणीं पद्मश्री आपल्या सुप्त भावनांचें प्रदर्शन करण्याचें धैर्य दाखवतो. सरकार दरबारीं ह्याला गौरवाचें स्थान प्राप्त असल्याकारणानें ह्याच्या अनुनयानें स्त्रीवर्गास गौरवाचें सहजीवन साध्य होते. माझ्या प्रेमळ भगिनींनो, जीवनांत अष्टांग सौख्य व गौरवपद प्राप्त करून घेण्याची तुमची मनीषा असेल तर पद्मश्रीच्या साहचर्याची महत्वाकांक्षा उरीं बाळगून



बिनधोक !

त्याच्यासाठीं अहोरात्र यत्न करणें प्राप्तच आहे.

(३) **शंख :** देवाना प्रिय ठरल्यामुळें ज्याच्यावर भूतलावर देखील त्यांची कृपादृष्टी असते असे समाजधुरीण व संपन्न नरपति शंख ह्या पुरुषवर्गांत सामावले जातात. संपन्नतेमुळें व दानशूरत्वानें हे जनपदांत प्रिय ठरले तरी स्त्रीवर्गाच्या बाबतींतली ह्यांची पक्षपाती वृत्ति ओळखून त्यांच्याकडून कार्यभाग साधण्यासाठीं चाणाक्ष जनसेवक स्त्रीवर्गाची योजना करतात. राजकुलांत जन्म असला तर शंख पुरुष एकोत्तर विवाह करतात. धनपति असल्यास

आपल्या गुप्त कारभाराच्या व्यवस्थापनासाठीं स्त्रीवर्गास सचिवालयांत अगर कार्यवाहींत नियुक्त करून त्यांचा हक्कानें सहवास प्राप्त करून घेतात. समाजधुरीण असल्यास दैनंदिन व्यवस्थेसाठीं आपल्या विजनवासांत स्त्रीस्वयंसेविका बरोबर बाळगतात. अष्टांगमर्दन, गोपीचंदी स्नान व फलाहार हे ह्यांचें स्वभाववैशिष्ट्य असल्यामुळें ह्यांचा अधिकांश काल ह्या व तत्सम नित्यनैमित्तिक कार्यासाठीं खर्च होतो. हे शंखजन बहुतेक काल चिंतनांत मग्न असतात त्यामुळें त्यांचा स्वभाव मितभाषी असतो. ह्यांच्या ह्या सद्गुणामुळें समारोह, उद्घाटन, शीलान्यास, अतिथिस्वागत इत्यादि भव्य समारंभांत ह्यांच्या दातृत्वामुळें ह्यांना मानाचें स्थान देण्यांत येऊन व पुरोगामी स्त्रीकार्यकर्त्रीकडून ह्यांच्या कंठी पुष्पमाला घालून त्यांचा गौरव केला जातो. शंखजन कार्यरत होणें स्वाभाविकतः असंभवनीय असल्यामुळें महिलासम्मेलनांत ह्यांना प्रमुखपद वा आमंत्रण दिल्यास चतुर व सुंदर स्त्रीसमुदायानें ह्यांचा अधिकतर बुद्धिभ्रंश होतो व त्यांच्यापासून व्यक्तिशः कार्यप्रवण उपद्रव न पोंचतांहि अधिकांश लाभ प्राप्त करून घेतां येतो. माझ्या चतुर भगिनींनीं शंखजनांची ही वृत्ति ओळखून आपापल्या गरजेप्रमाणें व त्यांच्या कुवतीच्या अनुरोधानें त्यांना उत्तेजन दिल्यास व्यक्तिशः आणि सामाजिक असा दुहेरी लाभ प्राप्त करणें त्यांना सुलभ जाईल.

(४) **व्याघ्र** : ह्या जातीला त्यांच्या क्रूर स्वभावामुळें व्याघ्र, पुरुषव्याघ्र अथवा व्याघ्रपुरुष असें अभिधान दिलें जातें. ह्याच्या ठायीं मालकीहक्काचा प्रादुर्भाव अधिकांशानें असल्यामुळें स्त्रीवर्गास ह्याच्यापासून पीडाच जास्त संभवनीय आहे. देहानें हा बळकट असून, आपल्या पौरुषत्वाचें विरुद्ध म्हणून हा ओष्ठकेशसंभार निपजत असतो व वीरश्रीच्या प्रसंगीं त्यास कुरवाळून स्फूर्तीस आवाहन करतो. तारुण्यांत हा ब्रह्मचर्यास वाहून घेऊन वीर्यरक्षणासाठीं व्यायाम, सकस आहार व संयमित व्यवहार ह्यांचें कटाक्षानें पालन करतो. स्त्रीची सन्निधि गुरूपदेशामुळें ह्याला घृणास्पद वाटत असते व त्यामुळें हा जनपथावर नेत्र मिटून चालतांना दिसतो. स्त्रीपुरुषसंबंध हा गर्ह्य मानीत असल्यामुळें मामनीतिपालनाचा मक्ता हा आपल्या राखीव हक्कांत गणून त्याचें रक्षण करण्यास हा अनाहूतपणें सिद्ध असतो. पुरेसें शारिरीक बल प्राप्त करून घेतल्यानंतर हा गृहस्थाश्रम स्वीकारतो व हनुमानस्मरण करून ब्रह्मचर्याची समारंभपूर्व सांगता करतो, हा नामाभिदानदर्शक व्याघ्रवृत्तीचा असल्यामुळें हा आपल्या सावजावर एकदम झडप घालून क्रूरपणें आपली भूक शमवितो. भोजनाचा कार्यक्रम यथास्थित झाल्यानंतर मात्र हा कांहीं काळ निरुपद्रवी राहतो. सात्विक आहाराची ह्याची विवाहपूर्व रति मध्यंतर जीवनानंतर लोप पावून चमचमीत रसवत् पदार्थांची लालसा ह्यांच्या ठायीं प्रादुर्भूत होते. त्यामुळें उत्तर कालांत कौटुंबिक भोजनाची गृहस्थवृत्ति त्यजून हा बहुधा बाहेरच आपली आकंठ इच्छातृप्ति करून घेतो. अशा व्याघ्रपुरुषाशीं चतुर स्त्रीनें सावधानतेनें वागावें कारण ह्याच्या शरीरबलाच्या आधिक्यानें सहवासांत सुखप्राप्तीपेक्षां निर्जीव अथवा यांत्रिक जीवनच कंठण्याची पाळी अखेरीस येते.

(५) **वृश्चिक** : स्त्रीवर्गाला ज्या पुरुषजातीपासून अकारण उपद्रव पोंचण्याची शक्यता असते, त्या जातींतील नीचतम जात·

अनुक्रमणिका

वृश्चिकजनांची असते. देहयष्टीनें किरकोळ भासणाऱ्या या जीवमात्राच्या नांगीमध्यें फारच बळ असतें व त्यामुळें हा डसल्यास वेदना फारच होतात. अन्यांना उपद्रव देणें ह्यांतच हा सार्थक मानतो. ह्याला वश झालें तरि मूळस्वभावामुळें हा डंख करतो आणि नच वश झालें तर आपल्या वक्र वर्तनानें हा मार्गोत उपद्रव करूं लागतो. आपल्या कृश देहयष्टीमुळें हा आडमार्गानें, अंधारांत व लपून छपून हल्ला करण्यास सज्ज असतो. मात्र याची ताकद अजमावलेल्या अबलेला केवळ पादत्राणाच्या सहाय्यानें याचा पाडाव करणें शक्य होतें. हा हतबल झाला तरी याची वळवळ चालू राहाते, आणि एकदां पराभूत होऊनसुद्धां हा हस्तें परहस्तें दंश करण्याची मनीषा बाळगून असतो. निंदा, नालस्ती व काल्पनिक अनाचाराच्या कथा ह्यांच्या द्वारें अप्राप्त अबलेच्या जीवनांत हा गरळ ओकू पहातो. आपल्याला जें प्राप्त होत नाहीं त्याचा लाभ दुसऱ्यास होऊं घातला तर ह्यास सहन न होऊन हा नांगी आपटत तडफडत राहतो. बलवान्, नशीबवान् अगर यशस्वीं इतरेजनांच्या चारित्र्यांत कसें गरळ टाकावें ह्याची खंत ह्याला पडलेली असते. वृश्चिक हा एकाकी जरी वाटला तरी समरप्रसंगीं यांचा समुदाय चहूंबाजूनें हल्ला करण्यासाठीं उद्युक्त असतो. अशा प्रसंगीं एकाकी अबलेनें प्रसंगावधान राखून कांगावा करावा म्हणजे हे कीटक पुच्छ सांवरीत पलायमान होतात.

(६) **वृषभ :** आपल्याला फुटल्या शिंगामुळें आपल्या सुप्त सामर्थ्याची अवास्तव जाणीव असणारे पुरुष ह्या वृषभवर्गांत गणले जातात. हे मार्गानें जातांना बेपर्वाई वृत्तीनें इतरेजनांचा मार्ग रोखतात व चुकून अंगावर आलेल्या व्यक्तीला शिंगावर घेण्यास कचरत नाहींत. ह्यांना बुद्धि असते पण तिचा उपयोग फक्त उपद्रवासाठींच ते करतात. ह्या वृषभवरांच्या मार्गी निकटवर्ती असल्यास ते लत्ताप्रहार करतात, सहवर्ति असल्यास ढुशी मारतात व पुरोगामी झाल्यास पार्श्वभागीं शृंग प्रहाराचें भय असतें. रस्ता निर्जन असला आणि अबला एकाकी दिसली कीं वृषभ जास्तच बलवान् होतो आणि बेमुर्वतपणें धडक देण्यास सरसावतो, एकांतांतल्या ह्या वीरश्रीप्रमाणं अनेकान्तामध्यें देखील हा नरपुंगव स्त्रीदेहाला घसटून आपल्या उत्तान व्यक्तिमत्वाचा उपद्रव देण्याची संधि सोडत नाहीं. आपल्या जिव्हेनें आपलें उत्तमांग स्वच्छ करूं पाहणारा हा वृषभ तुकतुकित दिसला तरी त्याचे अंतर्मन मलिनच असतें. वेळींच ह्याला चोपला नाहीं तर हा उन्मत्त होण्याचाहि संभव असतो ह्यासाठीं आपली दुर्दशा वेळींच टाळण्यासाठीं ह्या वृषभपुरुषापासून सावध राहावे ही मत्प्रिय भगिनींस माझी सूचना आहे.

(७) **शशश्वानक :** शशकाचा चपल भ्याडपणा व श्वानाची गोंडा घोळण्याची वृत्ति एकसमयावच्छेदेंकरून ज्याच्या प्रकृतिधर्मांत आढळतो असा पुरुष शशश्वानक समजावा. उंचीनें हा ठेंगू असून याची देहयष्टिही किरकोळ असते. आपल्या किरकोळ व्यक्तिमत्वाची उणीव भरून काढण्यासाठीं हा वेषभूषा, अंगराग व इतर कृत्रिम उपाय अवलंबून तुरतुर चालत व पुच्छ हालवित मिरवण्याची पराकाष्ठा करतो. आपला प्रतिस्पर्धी सामर्थ्यवान दिसल्यास हा त्याच्यापासून आपलें रक्षण करून दूर जाऊन गुरगुरत राहातो. ह्याची कुशाग्र बुद्धि कामव्यवहारांत प्रकर्षानें चालते. आपलें गोंडस कुलुंगेपण प्रेमळ स्त्रीवर्गाच्या नजरेस आणण्यासाठीं व्याकुल दृष्टीनें त्यांच्याकडे पाहतो. साहजिकच भोळी स्त्री त्याच्या विव्हल नजरेमुळें आकृष्ट होते, ममत्वानें त्याला गोंजारू इच्छिते आणि मग मात्र हा जिभल्या चाटीत प्रगटपणें अनुराग व्यक्त करण्यास सिद्ध होतो. स्त्री वश झालेली पाहतांच मालकी हक्काची जाणीव ठेवून हा दुसऱ्या कुणास तिच्या सन्निध जाऊं देत नाहीं. जवळ गेल्यास वस्कन् आंगावर जातो. आणि मग स्त्रीच्या सौम्य समजावणीनंतर तिच्या पायाशीं अधोनिमिलित नेत्रांनीं व तीक्ष्ण कानांनीं आगंतुकाच्या हालचाली न्याहळत राहातो. स्त्रीनें विशेष ममत्व दाखवलें तर या अनासक्त भूमिकेचें नाटक करीत निर्लज्जपणें जनसमुदायांत देखील तिच्या मांडीवर चढून बसण्याचें धैर्य दाखवतो. सुखासीन मदालसेला आपल्या स्वामित्वाचे प्रदर्शन करण्यासाठीं शशश्वानकाचा चांगलाच उपयोग करून घेतां येतो. कुवतीनें कमजोर असणाऱ्या ह्या शशश्वानकालीं दास्यत्वाची इतकी संवय झालेली असतें कीं पायांत घोटाळण्याच्या ह्याच्या प्रवृत्तीला अगर प्रकट प्रेमदर्शनाला कंटाळून त्याला दूर राखण्याचा प्रयत्न करणें स्त्रीला कष्टप्रद होतें. हा त्याचा विशेष जाणून घेतला तर शरीर रक्षणासाठीं अगर इतर अनिवार्य देहपीडा टाळण्यासाठीं शशश्वानक स्त्रीवर्गाला उपयुक्त असतो हें माझ्या भगिनींस ध्यानांत यावें.

(८) **किंचित्पुंध्वज**—शारिरीकतः पुरुषवर्गाशीं साम्य असणाऱ्या पण प्रकृतयः स्त्रीसुलभ वृत्तीनें वागणाऱ्या ह्या जातीच्या पुरुषाला किंचित्पुंध्वज असें म्हणतात. काव्य, संगीत, चित्रकला, नाट्य, वक्तृत्व इत्यादि कलांमध्यें ह्याचें पटुत्व असतें. स्त्रीसंमर्दामध्यें हा बिचकून पुष्कळदां लज्जित होतो. व त्यामुळें चतुर स्त्रियांना ह्याचें सान्निध्य उपकारक ठरतें. जनसमुदायांत हा सहसा चित्तचलित वृत्तीमुळें नम्रपणें व नतमस्तक वावरतो. भावनागीतगायनांत ह्याच्या कोमल व आर्त स्वरामुळें त्याला लोकप्रियता मिळते. ह्याच्या शिष्यवर्गांत बहुसंख्य स्त्रीसमाजच असतो कारण ह्याच्या स्त्रीसुलभ हावभावांमुळें पुरुषवर्गांत हा चेष्टेचा विषय होऊन राहतो. राजकारणांत अथवा समाजकारणांत ह्याचा प्रवेश झाला तर स्वयंसेविका दलाच्या आसपास अगर अग्रभागीं मिरविण्यांत ह्याला कृतार्थ वाटत असतो. स्त्रीत्वाला कांहीही धोका पोंचण्याचा संभव नसल्यामुळें चतुर स्त्रिया किंचित्पुंध्वजाचा उपयोग आपल्या मनरंजनासाठीं करून घेतात.

आतांपर्यंत पुरुषजातींतल्या अष्टवर्गाची माहिती मी विदित केली. साकल्यानें विचार करतां ह्यापैकीं पद्मश्री हा उत्तम नायक समजावा, शंख, व्याघ्र व वृषभ हे मध्यमपदीं गणावे, ग्रामहस्ती शशश्वानक व किंचित्पुंध्वज हे कनिष्ट मानावे व वृश्चिक हा अधममात्र समजावा.

पुढील प्रकरणांत ह्या विशिष्ट जातींची अनुनय पद्धती, त्यांची शाररिक वैशिष्ट्यें आणि वैगुण्यें ह्यांची तपशीलवार माहिती देण्यांत येईल.

कुठें गेले ते 'पुरुषोत्तम' नवरे



शांता ज. शेळके

खरेंच. कुठें गेले ते 'पुरुषोत्तम' नवरे? घरांत पाऊल पडल्याबरोबर वाघासारख्या डरकाळ्या फोडून सर्वांच्या—विशेषतः बायकोच्या—काळजाचा थरकांप उडवणारे, हाताला लागतील त्या वस्तु आसमन्तात भिरकावून देत गृहांगणाला रणांगणाची कळा आणून देणारे, जेवणाचें ताट पुढें आल्यावर आमटींत मीठ कमी झालें आहे किंवा पोळीचा कांठ थोडा कच्चा राहिला आहे अशा क्षुल्लक निमित्तानेंहि खवळून ताट दूर भिरकावून घरभर भाताचीं शितें पसरवणारे, पत्नीचे नाजुक गाल करकचून पिळून ते वेगळ्याच अर्थानें लाल करणारे, पावलोंपावलीं तिच्या माहेरच्या सात पिढ्यांचा उद्धार करणारे नि डोळ्यांच्या जरबेंत तिला अखंड ठेवून तिचे डोळे अष्टौप्रहर वाहते ठेवणारे ते पराक्रमी पुरुषसिंह आज गेले तरी कुठें? सिंह कितीहि रोड झाला तरी तो गवत खात नाहीं असें म्हणतात. पण आपल्याकडे पुरुषरूपी वाघसिंह गवतच काय, दूधभात खाऊं लागल्याचें अद्भुत दृश्य आज सर्वत्र दिसूं लागलें आहे. हे वाघसिंह दूधभात खातात, इतकेंच नव्हे तर जेवण झाल्यावर खरकटें ताट मोरींत उचलून ठेवून (जमिनीवर शेणगोळा नव्हे तर) फरशीवर पाण्याचा बोळा फिरवून घेण्याचा आगळा समंजसपणाहि दाखवितात!

परिस्थितींत हा जो जमीनअस्मानाचा फरक पडला आहे याचें कारण काय असेल बरे! गेल्या कित्येक वर्षांत स्त्रीशिक्षणाचा झालेला प्रसार, ज्योतिबा फुल्यांपासून तों धोंडो केशव कर्व्यांपर्यंत अनेकांनी केलेले स्त्रीदास्यविमोचनाचे विविध प्रयत्न, इंग्रजांच्या सहवासानें आपणांकडे आलेला युक्तिवाद नि स्त्रीपुरुषसमानतेच्या नव्या कल्पना, स्त्रीला 'भूपृष्ठस्थित आद्यदैवत' म्हणणाऱ्या केशवसुतांपासून तों 'लावण्यलता तूं ललिता यौवनमत्ता, कांहीं कर तूं मना तुला तूं अधिकारी' अशी सदर परवानगी तिला देऊन टाकणाऱ्या माधव ज्यूलियनांपर्यंत अनेक आधुनिक मराठी कवींनीं स्वप्नाळू वृत्तीनें तिचे केलेले फाजील लाड, (त्यापेक्षां 'स्त्रियांचा तो संग नको नारायणा। काष्ठी वा पाषाणा मृत्तिकेच्या') असें म्हणणारे तुकाराम किंवा 'नितंबिनी वागुरा पसरिल्या कामिकुरंगाला' असे म्हणणारे जुने नाटककार यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन केवढा वास्तव म्हटला पाहिजे!) मध्यमवर्गापुढची आर्थिक समस्या दिवसेंदिवस अधिकाधिक विकट होत चालल्यामुळें नाइलाजानें कां होईना, स्त्रियांच्या अर्थार्जनाला पुरुषांनीं दिलेली संमति—या सर्व गोष्टींचें पर्यवसान आजचा पुरुष हा स्त्रीपुढें गोंधळलेला, घाबरलेला, भित्रा नि लाचार होण्यांत झालें आहे. पूर्वीच्या काळच्या सिंहानें आज गाईचें कातडें नि सशाचें काळीज धारण केलें आहे. तो पावलोंपावलीं तडजोड करावयाला शिकला आहे. आज्ञार्थी शब्दांत बोलण्याची त्याची संवय जाऊन आज तो विध्यर्थी भाषेंत बोलूं लागला आहे. उदाहरणार्थ: 'मला घरीं यायला, जेवायला उशीर होईल. तरी पण बारापर्यंत सैंपाक तयार झाला पाहिजे. सांगून ठेवतों.' या पूर्वीच्या कडक वाक्याचा आजचा सौजन्यपूर्ण पाठभेद असा: 'नाहीं, म्हणजे मी माझ्याकडून लौकर यायची शक्य तेवढी खटपट करतों. पण नाहींच जमलं तर तूं थांबूं नकोस बरं का, आपली जेवून घे. फार तर माझं ताट झांकून ठेव!' ज्याप्रमाणें पुरुषांचीं हीं वाक्यें कालमानानें बदललीं आहेत त्याप्रमाणें स्त्रियांच्या उत्तरांतहि आश्चर्यकारक बदल झाला आहे. उदाहरणार्थ वर दिलेल्या पहिल्या वाक्याला तत्कालीन. आज्ञाधारक आर्यपतिव्रतेचें उत्तर म्हणजे पतिराजांकडे तिरपा कटाक्ष टाकून सुचविलेडी मूक संमति तर दुसऱ्या वाक्याला आजच्या स्वतंत्र, तडफदार महिलेचें उत्तर असें 'इश्श! तसं कशाला? तूं ('तुम्ही' नाहीं बरे का! 'आपण' तर नाहींच नाहीं!) आलास म्हणजे दोघेही जण जाऊं या कीं समोरच्या इराण्याकडेच. नाहींतरी ऑम्लेट मला फार आवडतं बाई!'

—हें सारें होत आहे तें ठीकच आहे. एके काळीं चार भिंतींच्या आंत कोंडलेली, 'चूल नि मूल' हेंच आपलें सारसर्वस्व समजणारी, 'रांधा, वाढा, उष्टीं काढा' या ध्रुवपदानें युक्त असलेलें जीवनगीत जन्मभर गाणारी, बालपणीं बापाच्या, तरुणपणीं नवऱ्याच्या, वृद्धपणीं मुलाच्या अधिकाराखालीं निमूटपणें दिवस काढणारी, गळ्यांत मंगळसूत्राचा फांस, हातांत पाळण्याची दोरी अशा थाटांत सैंपाकघरांतून माजघरांत अन् माजघरांतून शेजघरांत वावरणारी तेव्हांची ती अबला, दुर्बला स्त्री आज घरांतून ओटीवर, ओटीवरून अंगणांत आली आहे. बहुधा स्त्रीच्या स्वतंत्र वृत्तीचा फायदा घेऊन स्त्रीदाक्षिण्याच्या नांवाखालीं तिच्याशीं फाजील सलगी करूं पाहणाऱ्या ऑफिसांतल्या सहकाऱ्यांपासून तों तिनें कष्टानें कमावलेल्या पैशाच्या उबेंत हातपाय शेकीत आर्थिक टंचाईची हुडहुडी दूर करूं बघणाऱ्या पतीपर्यंत अनेक पुरुष आजच्या स्त्रीला भल्याबुऱ्या मार्गांनीं नाडीत आहेत. ज्या ज्या स्पर्धेच्या क्षेत्रांत ती उतरत आहे तेथें तेथें निर्मळ कौतुकापेक्षां हेवेखोरपणाची क्षुद्र बोटमोड तिच्या वांट्याला येत आहे. 'विनाश्रयं न शोभन्ते पंडिताः वनिता लता' हें सुभाषित आतां शोभेच्या जुन्या वस्तूंच्या दुकानांत मांडण्याच्या लायकीचें झालेलें पाहून कांहीं हळवे जीव उसासे टाकीत आहेत. नि या साऱ्या प्रतिकूल परिस्थितीवर विजय मिळविल्याच्या आनंदांत आजची स्त्री जमिनीवर पाय घट्ट रोवण्याची धडपड करीत उभी आहे. तोल सांवरीत ती एकदां मागे


अनुक्रमणिका






तर एकदां पुढें बघत आहे. जें मिळविलें आहे त्याचा तिला रास्त अभिमान वाटत आहे व अजूनहि जे मिळवायचें आहे त्याचीं सोनेरी स्वप्नें क्षितिजावर झळकतांना तिला दिसत आहेत—

पण या साऱ्या आत्मतृप्त अवस्थेंतून आजची स्त्री जेव्हां बाहेर येते आणि अन्तर्मुख होऊन आपल्या परिस्थितीचा ती तेव्हां विचार करूं लागते त्यावेळीं तिचे मन खिन्न झाल्यावांचून राहात नाहीं. या स्त्रीनें बरेच कांहीं मिळविलें असलें तरी त्याबरोबर तेवढेंच कांहीं मूल्यवान् ती घालवूनहि बसली आहे. आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्याचा 'गड' तिनें आज सर केला असला तरी त्याबरोबर घरांतला लाडका 'सिंह' ती गमावून बसली आहे. समान भूमिकेवरून तिच्याशीं वागणारा, खेळकर नि समंजस सवंगड्याची तिची भूक भागविणारा आजचा पति तिला कितीहि आवडत असला तरी डोळ्याच्या जरबेंत आपल्याला ठेवण्याची धमक तो गमावून बसल्यामुळें तिला मनांतून चुकल्या-चुकल्यागत वाटत आहे. आजची स्त्री पुरुषाला भीत नाहीं असें नाहीं. (प्रत्येक स्त्री पतीला मनांतून भीतच असते.) पण आपण पतीला किती भितों हें अधून मधून दाखवण्याची संधि तो आपल्याला देत नाहीं ही तिची खरी तक्रार आहे. पूर्वीचे पुरुष स्त्रियांना कठोर शिस्तींत ठेवीत. पण शिस्तीच्या अंगीं एक अत्यंत मोठा गुण आहे. तो हा कीं शिस्तींत ठेवल्या जाणाऱ्या व्यक्तीला शिस्तपालनामुळें सुरक्षिततेची एक विलक्षण समाधानकारक जाणीव (Feeling of Security) होत असते. लहान मुलांना शिस्त लावावी असें शिक्षणशास्त्र सांगतें तें यासाठींच. आणि जी गोष्ट मुलांच्या तीच स्त्रियांच्या बाबतींतहि खरी आहे. पूर्वीची स्त्री नवऱ्याच्या धाकांत राही, जरबेंत राही, वेळप्रसंगीं त्याचा मारही खाई. पण आपल्या घरांत नि संसारांत ती अत्यंत सुरक्षित सुस्थिर अशी असे. माझ्या स्थानावरून मला कोणी बाजूला करील हें भय तिला केव्हांही वाटत नसे. पण आजच्या स्त्रीला पतीकडून सर्व तऱ्हेचें स्वातंत्र्य नि साऱ्या सवलती मिळत असतांना देखील अशी सुरक्षितता वा असें स्थैर्य तिला आपल्या संसारांत वाटत नाहीं. पूर्वीची स्त्री जेवढी मारली जाई, छळली जाई तेवढाच तिच्यावर पतिकडून प्रेमाचाहि वर्षाव होत असे. आणि म्हणूनच नवऱ्याचा मार खातांना देखील ती तो अभिमानानें खात असे. अन् कोणी तिला सोडवायला आलें तर 'माझा नवरा मला मारील नाहींतर उभी जाळील. तुम्हाला आमच्यामध्यें पडायचें कारण काय?' असें ती त्या परक्या माणसाला उलट दरडावून विचारीत असे, व संतापाचा भर ओसरल्यानंतर मारानें सुजलेलें तिचें अंग पश्चात्तप्त पतीनें प्रेमाने कुरवाळलें म्हणजे तिच्या शरीराच्या नि मनाच्याहि साऱ्या जखमांचीं फुलें होऊन जात. आजच्या स्त्रीला तो मारहि नाहीं. नि तें प्रेमहि नाहीं. आज सारेंच मुळीं मोजके, माफक, मिळमिळीत झालें आहे. सारा तडजोडीचा मामला आहे. दीर्घकाळ कुमारिका राहिलेली स्त्री आपल्या सौंदर्याच्या नि तारुण्याच्या उतरत्या कलेनुसार लग्नाच्या बाजारांतली स्वतःची किंमत उतरवितें नि कमावत्या बायकोच्या पगाराचा हिशेब करून नवरा आपल्या अधिकार क्षेत्राला समंजसपणें मर्यादा घालून घेतो. दोघे एकत्र येतात, संसार करतात. परस्परांच्या ठायीं निष्ठा व प्रेम राखून दिवस काढतात पण बाह्यतः सुखी, स्वतंत्र आणि समाधानी दिसणारी आजची स्त्री मनांतल्या मनांत मात्र कुचंबलेली असते. आपल्या समंजस पतीकडे पाहून ती त्याचें कौतुक करते. पण त्याचवेळीं पीळ, वेडा आग्रह, तर्काला गुंडाळून ठेवणारा पुरुषी अहंकार नि पराकाष्ठेचा मत्सर अशा अनेक गोष्टी मनांतल्या मनांत कां होईना, ती त्याच्याकडून अपेक्षित असते. आणि मग त्या अपेक्षा पुऱ्या होईनाशा झाल्या म्हणजे एकादे वेळीं उदासपणें ती स्वतःच स्वतःला विचारते, "पूर्वीचे ते 'पुरुषोत्तम' नवरे आज गेले तरी कुठें!"



डॉज
डीझल



प्रगतिशील कारखानदार
दी प्रीमीअर ऑटोमोबाइल्स लि.
मुंबई

आपल्या नजीकच्या
डीलर्सला भेटा अगर लिहा.

★



नवरा— एक सिंहावलोकन

सौ. इंद्रायणी सावकार

लग्न होतांत स्त्रीचा नवरा या प्राणीविशेषाशीं संबंध येतां, लग्नपूर्व आयुष्यांत गोळा केलेल्या पुरुषजातिविषयक कसोट्या ती त्याला लावू पहाते—आणि संसारांत अपेशी ठरते. कारण नवरेतर पुरुष आणि नवरा यांमध्यें ऊन-साक्नीइतका भेद आहे. नवरा होण्यापूर्वी त्याला स्त्रीजातीबद्दल —विशेषतः आपल्या बायकोबद्दल जी आपुलकी असते ती डोक्यावर चार रंगीत तांदूळ पडतांच नष्ट होते. या संदर्भात सौ. चिवटेची दर्दभरी हकीकत सांगितल्याखेरीज रहावत नाहीं. सौ. चिवटे लग्न होण्यापूर्वी त्यांच्या कॉलेजच्या 'ब्यूटी' होत्या. श्री. चिवट्यांनीं त्यांच्यावर अनेक 'लायनी' मारून व इतरही हजारों लांड्यालबाड्या करून सौ. चिवट्यांचं मन विवाहानुकूल करण्यांत यश मिळवलं होतं. सौ. चिवट्यांनीं श्री. चिवट्यांना माळ घालण्याचं मुख्य कारण एकच होतं—श्री. चिवट्यांचं हळवं मन. पेन्सिल तासतांना सौ. चिवट्यांच्या (त्या कु. असतांना अर्थात्) तर्जनीचं सालपट निघालं तेव्हां श्री. चिवटे दोन मैलांवर असलेल्या केमिस्टकडे आयुडीन आणण्यासाठीं अनवाणी धांवत गेले, आणि दुसऱ्याच दिवशीं ब्लेडसच्या कारखानदारांना उद्देशून एक ज्वलंत पत्र त्यांनीं वाचकांच्या पत्रव्यवहार' मध्यें लिहून टाकलं. 'टेबल् टेनिस' मॅच चालू असतांना प्रतिपक्षाचा चेंडू सौ. चिवट्यांच्या केसांना घासून गेला म्हणून श्री. चिवट्यांनीं असं अकांडतांडव केलं कीं टेबलटेनिस ऐवजीं मुष्टियुद्धांचेच सामने पहाण्याची प्रेक्षकांना संधि मिळाली. परंतु लग्न होतांच हा जमाना पालटला. उंदीर मारण्याच्या खटपटींत असतांना सौ. चिवट्यांनी स्वतःच्या हातांत धरलेली काठी पायावर पाडून पाय सुजवून घेतला त्यावेळीं 'हे नसते उपद्व्याप सांगितले होते कोणी? उंदीर काय तुला चावत होता?' अशा तऱ्हेचे रुक्ष उद्गार श्री. चिवट्यांनीं काढले. असंच एकदां माठांत पाणी भरत असतांना सौ. चिवट्यांचा पाय घसरल्यामुळें डोकं माठावर आपटून मोठें टेंगूळ आलं तेव्हां-'पाणी प्यायला मिळालं नसतें तर मी कांहीं मेलों नसतों पण आतां माठ फोडलास तो फोडलास आणि वर डोक्याला आयूडेक्स् चोळा म्हणतेस...'' अशा तऱ्हेची कांहीं नृशंस पाषाणहृदयी वटवट श्री. चिवट्यांनी केली. पण सर्वांत कळस झाला, श्री. सौ. चिवट्यांच्या संसारांत नवी भर पडली तेव्हां. नेहमीप्रमाणें श्री. चिवटे आठ पन्नासला उठून आठ पंचावन्नची लोकल गांठण्याच्या प्रयत्नांत होते. एवढ्यांत सौ. चिवटे त्यांना म्हणाल्या-

"मला कसंसंच होतंय्. मला वाटतं तुम्ही मला हॉस्पिटलमध्यें पोचवावं."

"हॉस्पिटल्मध्यें? आणि आतां? अग तुला कांहीं काळ वेळ समजते का? कां माझी जहागिरी आहे असं वाटतंय तुला? आठ-पंचावन्न चुकली म्हणजे, माझा बाप तिकडे शंख करील ना. नेहमीं असं कांहीं तरी काढतेस आणि मला उशीर होतो—'' श्री. चिवट्यांनीं तोंडचा पट्टा फिरविला. त्यामुळें सौ. चिवट्यांना आणखीनच कसंसं होऊं लागलं. त्या एकट्याच बाहेर पडल्या आणि टॅक्सी करून हॉस्पिटलमध्यें दाखल झाल्या. वास्तविक पहातां श्री. चिवटे सरळ ऑफिसांतच जायचे; पण सौ. चिवट्यांनीं त्यांचं पैशाचं पाकीट नेल्यामुळें त्यांना हॉस्पिटलची वारी करणं भाग पडलं. हॉस्पिटलमध्यें सौ. चिवट्यांची चौकशी करतात न करतात एवढ्यांत एका नर्सनं घाईघाईनें बाहेर येऊन सांगितलं—

"अभिनंदन. तुम्हांला एक मूल झालं आहे. दुसरं होण्यांत आहे."

"एवढंच ना." श्री. चिवटे खवळून ओरडले "ही सकाळपासून असा आरडा-ओरडा करत होती कीं जशीं कांहीं पांचसहा मुलं होणार आहेत. तिच्याकडून माझं पाकीट मागून घ्या बरं नाहींतर माझी नऊपंधरा चुकेल!"

थोडक्यांत काय प्रेमानं जिंकलेला, दुसरीचा चोरलेला, आईवडिलांनीं पाहून दिलेला किंवा माथीं मारलेला—कशाही प्रकारचा नवरा असला तरी लग्नानंतर तो इतर चार नवऱ्यांप्रमाणें म्हणजे नाठाळपणानं वागूं लागतो. बायकोनं अहोरात्र आपल्या आणि आपल्या एकट्याच्याच तैनातींत रहावं अशी प्रत्येक नवऱ्याची अपेक्षा असते. सकाळच्या चहापासून पत्नीच्या सेवाधर्माला जी सुरवात होते ती वर्तमानपत्रं देणें, दाढीचं पाणी ठेवणें, शर्टाचीं बटणं शोधणें किंवा लावणें, किंवा दोन्ही, टाय् बाहेर काढणें, कंगवा हातांत देणें अशा क्रमानं भराभरा पुढें सरकूं लागते. नवऱ्याच्या गैरहजेरींतही डबा तयार करणें, बटणं शिवणें, संध्याकाळचं खायला करणें वगैरे उपाधि चालू असतातच. लग्नानंतरही खास स्वतःसाठीं थोडा फार वेळ राखून ठेवण्याची इच्छा धरणाऱ्या माझ्या एका मैत्रिणीनं नवऱ्याला 'सुधारण्याचं' ठरवलं. "सकाळीं बरोबर सात वाजतां चहा मी तयार ठेवीन, फार तर उशाशीं ठेवीन, पण सात म्हणजे सातच्या ठोक्याला तुम्हीं उठलं पाहिजे." असं तिनं त्याला बजावलं. सात वाजले तरी नवरा गाढ झोपेंत असल्याचं पाहून उशालगत कप ठेवून ती भाजी चिरायला निघून गेली. अर्ध्या तासानं बराचसा धडपडाट व एक दोन किंचाळ्या ऐकूं आल्यामुळें ती खोलींत डोकावली तेव्हां कपावर डोकं आपटल्यामुळें खोलीभर चहाच चहा झाला आहे आणि नवरोबा डोक्याला चटका बसल्यामुळें झोपमोड झाल्याची तक्रार करीत आहेत असं दृश्य तिला दिसलं. दुसऱ्या दिवशीं सात वाजतां चहा तिनं तयार ठेवला पण स्वयंपाकघरांत. आठ वाजतां नवऱ्यानं गरम. चहाची

अनुक्रमणिका





मागणी करतांच तिनं सुनावलं--"आतां चहा चार वाजतां. मी स्वयंपाकाला लागलेंय्" यावर तिचा नवरा पुन्हां बिछान्यांत शिरला आणि चार वाजेपर्यंत त्यानं एक झोप काढली–कसंही करून उठल्यानंतर गरम चहा प्यायल्याखेरीज त्याचं भागत नव्हतं म्हणे.

इतर बाबतींतही माझ्या मैत्रिणीचा प्रयोग असाच फिसकटला. पांच पांच मिनिटांनीं आपल्याला फणी, बटण इत्यादि वस्तु देण्यासाठीं उठावं लागूं नये म्हणून आदल्या रात्रींच ती त्या ठराविक जागीं ठेवूं लागली व 'कंगवा आरशासमोर आहे' 'बटणं शर्टाला आहेत' असं ती रात्रीपासूनच नवऱ्याच्या मनावर ठसवूं लागली. पण तिच्या मदतीखेरीज तिच्या नवऱ्याला या वस्तु कधीही सांपडल्या नाहींत, चुकून समजा सांपडल्या तर "'कंगवा आरशासमोर कां? इतके दिवस खिडकीवर होता ना? बटणं शर्टाला कां लावलीं? मी आज दुसरा शर्ट घालायचं ठरवलं असतं तर?' असे प्रश्न विचारण्यासाठीं तरी त्याला तिची गरज लागत असे. कंटाळून माझ्या मैत्रिणीनं एक लहानसं शेल्फ् खरेदी केलं आणि त्यावर त्याच्या गरजेच्या वस्तु रचून ठेवाव्या. तेंहि त्याला पसंत पडेना.

"शीः आपल्या घरांत हें शेल्फ् कसंतरीच दिसतं." तो म्हणाला.

माझ्या मैत्रिणीनं आणखी एक क्लृप्ति काढली. सर्व वस्तु हातांत घेऊन ती मोरीबाहेर उभी राहूं लागली, हेतु हा कीं त्याची अंघोळ होतांच या वस्तु त्याच्या स्वाधीन करायच्या. यामुळें तो फारच खवळला -

"विनाकारण इथं उभं रहाण्यांत वेळ कशाला घालवतेस? मी काय लहान मूल आहे काय? ठेव तें सर्व जागच्याजागीं. मला सांपडलं नाहीं तर मागेन मी तुझ्याकडे." तो म्हणाला आणि गाडं पुन्हां मूळपदावर आलं.

खाण्यांपिण्याच्या बाबतींतहि नवरा असाच लहरी असतो. ज्या दिवशीं संध्याकाळीं तुम्ही त्याची आवडती साबुदाण्याची खिचडी कराल त्यादिवशीं त्याला वालाची उसळ खावीशी वाटत असेल! ज्यादिवशीं वालाची उसळ कराल त्यादिवशीं ऑफिसांत चहापाणी झाल्यामुळें त्याला भूक नसेल, भूक असल्यास तुम्ही केलेली उसळ त्याच्या आईच्या उसळीसारखी झाली नसेल!

जोंवर नवरा आणि बायको अशीं दोनच माणसं संसारांत असतील तोंवर नवऱ्याच्या या खोडी संभाळणं बायकोला विशेष जड जात नाहीं. पण संसार वर्धनशील आहे; मुलंबाळं आणि पाहुणे (कायम, हंगामी व अकस्मात् आलेले) यांची त्यांत भर पडत जाते, तसतशी या लोकांपेक्षां आपण वेगळे आहोंत, आणि आपले हक्कही विस्तृत आहेत हें दर्शवण्यासाठीं नवरा नवनवीन उपाय योजूं लागतो. वर्षानुवर्षं पिठलं भुरकणारा नवरा पाहुण्याला पिठलं आवडत असल्याचं समजतांच—

'त्यांना वाटलं तर पिठलं कर. पण माझ्यासाठीं आमटी केलीच पाहिजे' असं बायकोला बजावूं लागतो. मुलांना आपल्याप्रमाणें कांद्याची भजी आवडूं लागलीं आहेत हें नवऱ्याच्या ज्यादिवशीं लक्षांत येतं त्यादिवशीं तो कांद्याच्या भज्यांचं नांव टाकतो, स्वतःसाठीं तो बटाट्याची भजी मागूं लागतो. निदान मुलांसाठीं केलेल्या भज्यांपेक्षां कमीअधिक खारट किंवा तिखट भजीं 'ऑर्डर' केल्याशिवाय त्याला चैन पडत नाहीं.

लग्नबंधनाच्या दृष्टीनं नवऱ्यांचे दोन गट पडतात—पळपुटे आणि चिकटे. पैकीं श्री. गटाणे पळपुट्या नवऱ्यांचे कॅप्टन आहेत असं आमचं भगिनी मंडळ समजतं.

स्वतःच्या पत्नीखेरीज इतर कोणतीही स्त्री पाहिली कीं श्री. गटाणे अक्षरशः वेडे होतात, मग ती स्त्री लहान असो, आंधळी असो, कुरूप असो किंवा झांटिपी असो. अमुक एक स्त्री म्हणजे सौ. भीमाताई गटाणे नाहीं एवढं समीकरण एकदां श्री. गटाण्यांच्या डोक्यांत शिरलं कीं ते आपल्या बुशकोटावर बसलेली धूळ झाडूं लागतात, सुटलेलं पोट आंत ओढून धरतात आणि मिशा वाढवण्याचे विचार मनांत घोळवूं लागतात. वास्तविक पहातां स्त्रीजात श्री. गटाण्यांची दखल घेत नाहीं, घेणं शक्य नाहीं, सौ. भीमाताई गटाण्यांना तरी त्यांचा कां मोह पडला हें एक न उकलेलं कोडं आहे. पण श्री. गटाण्यांच्या हें खिजगणतींत नसतं. पत्नीतर स्त्री दिसली कीं ते पाघळतात.

श्री. गटाण्यांची ही खोड जावी म्हणून सौ. भीमाताईनीं नवससायासांपासून सर्व उपाय योजले. कुठल्याहि सीबण किंवा स्नो कंपनीनं 'तुमची त्वचा गुळगुळीत व मुलायम बनवण्याचं' जाहीर केलं कीं भीमाताई दिवसांतून दहादहादां तें आंगभर चोळूं लागतात. 'कुठल्याही प्रसंगीं शोभणारी व सौन्दर्य खुलविणारी' साडी बाजारांत आली कीं, भीमाताईंच्या घरीं ती प्रथम येणार हें निश्चित. अत्यंत लहानांत लहान कपड्यांत

रंग कसं कोंबावं ही कला भीमाताईइतकी दुसऱ्या कोणालाही अवगत नाहीं. त्यांनीं साधं राहून पाहिलंय, रंग लावून पाहिलंय, नऊवारी नेसून पाहिलंय, स्लॅक्स् घालून पाहिलय्, एकदां त्या उपास करून वाळक झाल्या, मग लठ्ठ झाल्या, मग त्यांनीं केस कापले - पण व्यर्थ ! श्री. गटाण्यांची दृष्टि त्यांच्याकडे चुकूनहि वळली नाहीं. निराश होऊन भीमाताईंनीं एका मासिकाला पत्र पाठवून सल्ला विचारला—

सौ. मावशींस,

स. न. वि. वि.

लग्न झाल्यापासून गेलीं पंधरा वर्षें माझे पति नियम धरल्याप्रमाणें इतर स्त्रियांच्या मागं लागत आले आहेत ! तर मी काय करूं ? —एक संत्रस्ता.

भीमाताईंना उत्तर मिळालं—

"कांहीं करूं नका. माझा कुत्रादेखील रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येक मोटारीच्या मागें लागतो. पण आजवर त्यानं एकही मोटर पकडली नाहीं."

पळपुट्या नवऱ्यापेक्षां चिकट्या नवऱ्याबरोबर संसार करणं अधिक कठीण आहे. बायकोनं भाजीला फोडणी दिली कीं चिकट नवरा भांड्यांत डोकावलाच. घरीं हळदीकुंकू झालं तरी या जातीचा नवरा बायकोला दृष्टिआड करायला तयार होणार नाहीं. बायकोकडे मैत्रिणी आल्या असतांनाहि त्यांच्याशीं कानगोष्टी करणारा मेघदूताचा यक्ष चिकट नवऱ्यांचा म्होरक्याच !

प्राचीनकाळापासून स्त्रीजात एकच प्रश्न हाताळीत आली आहे-नवऱ्याला माणसाळवायचं कसं ? या एकाच विवंचनेभोंवतीं सर्व देशांतलं आणि समाजांतलं स्त्रीजीवन केंद्रित झालं आहे. डोकं खाजवून हुशार स्त्रियांनीं कांहीं उपायही शोधून काढले. चविष्ट स्वयंपाक, मेरिलिन् मन्रो सारखी फिगर, अश्रू, बौद्धिक कायसंसं, पण यापैकीं कुठल्याच उपायांना नवऱ्यानं दाद दिल्याचं ऐकिवांत नाहीं. जसजसा एकेक उपाय योजावा तसतसा नवरा माणसांत येण्याऐवजीं बायकोबद्दलच्या आपल्या अपेक्षा वाढवीत जातो. हल्लींची स्त्री पहा ना, फिगर राखण्यासाठीं ती व्यायाम करते, दररोज नवीन खाद्यपदार्थ करते, रसेल आणि हेमिंग्वे वाचते, नवकथेवर बोलते, चेहऱ्यावर हास्य ठेवते, घर झाडते पुसते आणि मुलांना सांभाळते—

पण तिचा नवरा मात्र आहे तसाच आहे. •••



गेले ते दिवस

विजया राजाध्यक्ष

गेले ते दिवस ! अलीकडे बऱ्याच पुरुषांकडून ऐकूं येणारे हे शब्द. या पुरुषांचे वय : तीस ते चाळीस या दशकाच्या दरम्यानचा कोणताहि आकडा—म्हणजे ते नुकतेच संसाराला लागलेले असतात; अजून त्या कर्दमांत गळ्यापर्यंत रुतलेले नसतात; 'उद्धारा'ची आशा असते. ज्यांनीं हें दशक ओलांडलें, त्यांनीं ती आशा कधींच सोडलेली असते—आणि तिशीच्या अलीकडचे बिचारे अजून अज्ञानाच्या तिमिरांत असतात. भविष्यकाळची स्वप्नें वगैरे फुलवीत असतात; कोणावर तरी प्रेमहि करीत असतात हे. 'कोणी तरी' त्यांना लडिक, नाजुक आश्वासनें देत असतें : मी (किनई) तुम्हाला जिवापाड जपते... तुम्ही परतायची वेळ झाली कीं तुमची चातकासारखी वाट पाहीन इत्यादि, पण भविष्यकाळाच्या पोटांत लपलेली असते ती चातकासारखी प्रतीक्षा नव्हे. तर परत यायला उशीर झाल्याबद्दल काढलेली खरडपट्टी हें जेव्हां त्यांना कळून चुकतें, तेव्हां तेंहि 'गेले ते दिवस' या कोरसात आपले सूर मिळवतात—आणि तो कोरस अधिकाधिक खडा होत जातो... हे शब्द क्वचित् चेष्टेच्या सुरांत उच्चारले गेले तरी प्रत्येकालाच त्या सुराआड आपली सारी कौटुंबिक परिस्थिति लपविण्याचें कसब साधतेंच असें नाहीं. !

ते दिवस म्हणजे कोणते दिवस ? ज्या दिवसांत स्त्रिया अबला होत्या, 'न स्त्री स्वातंत्र्य मर्हति' हें वाक्य पुरुषाच्या तोंडी सुभाषिताप्रमाणें खेळत होतें; पुढें काय चमत्कार घडला कोण जाणे, याच पुरुषाला स्त्रीचा उद्धार करण्याची बुद्धी झाली आणि त्यानें विचारानें तो इतक्या सचोटीनें केला कीं नंतर त्यालाच आपल्या 'उद्धारा'ची वाट पहात बसावें लागले ! ती अबला चांगली हिंडती फिरती झाली. आणि तिनें पुरुषाबरोबर शर्यत सुरू केली. आतां ती 'स्वावलंबी' झाली आहे—तिला उजव्या हाताचीं नखें काढण्यासाठींसुद्धां कोणाची मदत घ्यावी लागत नाहीं ! स्वावलंबन एवढें पराकोटीला पोंचल्यावर तिनें चूल व मूल यांच्या राज्यांत का घुरफटावें ?—निदान एकट्या तिनें कां घुरफटावें ? साहजिकच पुरुषाला तिच्या या जबाबदारींतला निम्मा वाटा उचलावा लागला...त्यानें तो उचललाहि—प्रथम कौतुकानें, नंतर नाइलाजानें—एखाद्या दुबळ्या क्षणीं त्यानें आपल्या दमल्या भागलेल्या बायकोला 'तुला scrambled egg करून देऊं का ?' म्हणून विचारलें. त्याला तोपर्यंत तो एकच पदार्थ करता येत होता—पण त्यानंतर त्याला करतां येणाऱ्या पदार्थांची यादी वाढत चालली...! बायको जरा मनाविरुद्ध वागली तरी पाठीत हाणण्यासाठीं हातीं धरलेली काठी गेली आणि बायकोनें फोडणीला टाकलेली भाजी ढवळण्यासाठीं झारा हातीं आला ! जेवल्यानंतर पत्नीकडून 'गोविंदविडा' मिळण्याचे दिवस गेले, तोच तिला मसाल्याची पट्टी आणण्यासाठीं धांवूं लागला ! आतां आपल्या किती गोधड्या भिजल्या याचा हिशेब बायकोपेक्षां त्याला अधिक अचूक सांगता

येतो. आणि 'अंगाईगीत' हि सहसा त्याच्याच तोंडून ऐकू येते !

जीवनांतील या स्थित्यंतराचें प्रतिबिंब साहित्यांत पडल्याखेरीज कसें राहणार ? 'यमुनापर्यटन'च्या काळातील त्या अबला तर केव्हांच दृष्टिआड झाल्या–वा. म. जोशांच्या कादंबऱ्यांतून स्त्रिया पुरुषांबरोबर वादविवाद करतांना दिसूं लागल्या...पण त्यांनी खाली घातलेली मान अजून पूर्णपणें वर झाली नव्हती, तें फडके–माडखोलकरांच्या काळांत. या लेखकांच्या कादंबऱ्यांतून 'अधो-मुख' या शब्दाचा वापर त्या शब्दाच्या सौंदर्यासाठींच अधिक झाला, खरी परिस्थिति वेगळीच होती. पण फडके-माडखोलकरांचे नायकहि आतांच्या नायकांच्या मानानें सुखी म्हणायचे ! फडक्यांचे नायक सहसा ब्रह्मचारीच-आणि माडखोलकरांचे नायक मधून मधून विवाहित असले तरी ब्रह्मचाऱ्या-सारखेच वागणारे ! 'भ्रमरा'सारखे या फुलावरून त्या फुलावर उडणारे. गोखले-गाडगीळांच्या कथांतून हे 'भ्रमर' कुठून सांपडणार ? परिस्थितीच तशी बिकट होत चालली ना...त्यांचा नायक हा es en-tially नवरा असतो अर्थात् बापहि... साहजिकच आजच्या पुरुषाची खरी परि-स्थिति त्याच्या रूपानें प्रकट होते. त्यावर पडलेल्या जबाबदाऱ्या, त्यामुळें त्याची होणारी ओढगस्त याची जाणीव होऊं लागते... अरविंद गोखल्यांच्या एका नायकाला तर बायको हेंहि आपलें एक अपत्यच वाटूं लागतें (अर्थात् लग्नानंतर कांहीं वर्षांनीं !) परिस्थितीचें गांभीर्य यावरून लक्षांत यावें !. ...एकूण, पुरुषावर 'स्त्रीपार्ट' करण्याचा प्रसंग येऊन ठेपला !

म्हणजे स्त्रीकडे 'पुरुषपार्ट' हें ओघानेंच आलें. तो तिनें चांगला वठवलाहि. माज-घराच्या उंबऱ्याच्याहि अलीकडे उभे राहून 'ऐकलं का ?' असें अत्यंत हळू आवाजांत, खालच्या मानेनें विचारणारी स्त्री आतां कुठें सांपडणार तुम्हांला ? ती स्त्री वर्षाकाठीं दोन लुगडीं फाडायची–आणि लग्नकार्य, हळदी कुंकू वगैरे समारंभांना आपले वासन सोडा-यची कचित् स्वतःच्या लग्नांतले लुगडें मुलाच्या लग्नांत नेसायचाहि योग यायचा. दागिने सासरच्या ऐपतीप्रमाणें कमी-अधिक तोळ्यांचे असायचे : तन्मणी, पेट्या, मोहनमाळ, एकदाणी, चंद्रहार इत्यादि. खास प्रसंगीं ते अंगावर घातले कीं गळा कसा भरलेला दिसे. त्याचप्रमाणें हातहि; पण तिला हे दागिने हवेसे वाटत ते सामाजिक प्रतिष्ठेखातर-स्वतःच्या हौशीसाठीं नव्हे, तिचा अलंकार एकच, पतिदेव-आणि त्याचे द्योतक म्हणून मंगळसूत्र तो सौभाग्यालंकार. त्या काळीं कुठेंच फॅशन शिरली नव्हती तर त्या सौभाग्यालंकारांत कुठून शिरणार ? वाळलेल्या दोऱ्यांत ओवलेले दुपदरी काळ्या मण्याचे सर हें त्याचे स्वरूप–मधोमध दोन सोन्याच्या वाट्या व मणी; कधी तें 'तुटलें' म्हणायचे नाहीं, 'वाढवलें' म्हणायचें-आणि त्याला एक क्षणहि अंतरायचें नाहीं. त्या तुटलेल्या स्थितींत ते निदान पदराच्या गांठीला तरी बांधून ठेवायचेच...हें सगळें काळाच्या नदींत वाहून गेलें...आतां विवाहित स्त्रीजवळ Spar · T. re प्रमाणें 'Spar ·' मंगळसूत्र असू शकतें–त्यांतहि नाना तऱ्हा: घरांत घालायचे निराळे, बाहेर घालायचे निराळे; एकपदरी, दुपदरी; रुद्रगाठीचे, वाट्यांवर हिरे जडविलेले. एक काळा मणी आणि एक मोती अशा पद्धतीनें गुंफलेले इतकें असूनहि त्या सौभाग्यालंकाराविषयीं जुन्या स्त्रीला वाटणारी निष्ठा नाहींच...तें गळ्यांतून निरनिराळ्या सबबीखातर उतरून ठेवलें जातें. कधीं उकडतें म्हणून कधीं गांवढळ दिसतें म्हणून. कधीं पांढऱ्या शुभ्र कांची-वरम् साडीवर 'फिलग्री वर्क'चा एखादा दागिनाच अधिक शोभतो म्हणून...आणि केव्हां केव्हां तें लपविलेंहि जातें : आखूड असेल तर ब्लाउझच्या हायनेकमध्यें–लांब असेल तर 'लो व्ही' मध्यें ..

तस्मात् स्त्रीला आपल्या 'स्त्रीपार्ट'चीं ही बाह्य चिन्हेंहि नकोशी झालीं आहेत : मग विचार असा येतो : इतर जबाब-दाऱ्यांप्रमाणें ही सौभाग्य मिरविण्याची जबाबदारीहि पुरुषानें कां घेऊं नये ? मला वाटतें, स्त्री या कल्पनेला हरकत घेणार नाहीं. पण ज्याच्या गळ्यांत ही 'दावण' बांधली जाणार त्या पुरुषाचें काय ? त्याला ही कल्पना कितपत रुचेल ? बाकी न रुचण्याचें तरी काय कारण ? त्याच्यांत मर्दपणाचे अवशेष आतां राहिले आहेत कोठे ? ज्या पिळदार, झुपकेदार मिशांमुळें बायकांना पुरुषांची भीति वाटायची त्या





आतां क्वचितच दृष्टीस पडतात (पर्यायाने ही मीतीहि) नुकतीच दाढी केलेले त्याचे गाल मुलायमपणाबाबत एखाद्या तरुणीच्या गालाशी स्पर्धा करतात, तो तोंडावरून पावडरचा हात फिरवतो. सुगंधी पोमेड लावून केसांचा कसून भांग पडतो, क्वचित् डोळ्यांत सुरमाहि घालतो; लेडीज सायकलवर बसतो. रंगी बेरंगी कपडे घालतो, नाजुक चपला घालतो; आणि चालतोहि एखाद्या षोडशीच्या पावलांनीं-नखरेलपणें बोलतोहि तसाच लाडिक सुरांत, माना वेळवत. पुरुषाच्या वाणीचे भूषण असणाऱ्या शिव्या आणि कांहीं खास शब्द तो पार विसरून गेला आहे!-- अशा या स्त्रीवत् पुरुषदेहावर मंगळसूत्र शोभून दिसणार नाहीं का ?-- आणि त्या अलंकाराविषयीं त्याच्या मनांत अढी असावी असें वाटत नाहीं--जशी बांगड्यांविषयीं आहे : कारण " लेका, बांगड्या भर हातांत " हा तुच्छतापूर्ण उद्गार ऐकूं येतो, तसा " लेका, मंगळसूत्र घाल गळ्यांत ! " हा कांहीं ऐकूं येत नाहीं !


मग मंगळसूत्र घातलेल्या वेगवेगळ्या थाटाच्या पुरुषांचीं चित्रें डोळ्यासमोर तरळूं लागतात : एखादा उंचनिंच धिप्पाड पुरुष आणि त्याच्या गळ्यांत मंगळसूत्र एखाद्या सुटाबुटांतील पुरुषाच्या नेकटायवर रुळणारे मंगळसूत्र; मंगळसूत्र घातलेला एखादा दाढीवाला; यांना वेळावत, मंगळसूत्र दातांत धरून बोलणारा एखादा तरुण... आणि विवाहित पुरुषांनीं मंगळसूत्र घालायचें तर 'तसें' नसलेल्यांनीं—म्हणजे कुमारांनीं, कुमारिकांप्रमाणें हिरव्या मण्यांची दूड गळ्यांत कां बांधूं नये ? वयाचा हिरवेपणा ती दूड अधिकच गडद करेल !...आणि मग नजरेसमोर येते ती सराफाच्या दुकानांत मंगळसूत्राच्या विविध तऱ्हा न्याहाळत असलेल्या पुरुषांची. गर्दी आतांहि ते तेथें दिसतात पण त्यांचे चेहरे केविलवाणे, भयभीत असतात. स्वतः-साठीं कांहीं घेत असतांना त्यांच्या चेहऱ्यावर केवढा उत्साह खेळेल !—मग एखादी नायका ती ज्या तरुणावर प्रेम करते त्या तरुणाला सराफाकडे मंगळसूत्र निवडत असतांना पाहते आणि प्रेमनिराशेनें विव्हल होते अशी एखादी कथाहि पुढें-मागे वाचायला मिळणें कठीण नाहीं !

कथेवरून आठवलें, पुरुषांनी मंगळसूत्र घालायला सुरवात केल्यावर त्याची विवाहित अवस्था साहजिकच डोळ्यात भरणार मग आपल्या 'तशा' कथांचे काय होणार ! 'तशा' म्हणजे ज्यांत नायक आपली ही अशी अवस्था गुलदस्तांत ठेवून नायिकेबरोबर रोमान्स करीत असतो ! विवाहित पुरुष म्हणजे कोणी वेगळा प्राणी आहे हें मग लक्षांत येऊ लागेल-आणि त्याचें एखादें प्रेमप्रकरण उघडें झालें कीं त्यालाहि समाजाचा रोष म्हणतात, तो अनुभवाला येईल !-आतांपर्यंत तरी नीति या शब्दाशीं फक्त स्त्रीचाच संबंध आहे ! या नव्या प्रथेनंतर पुरुषाच्या बाबतींतहि नीति-अनीतीचा प्रश्न उपस्थित होऊं लागला तर स्त्रीजातीवरील केवढा अन्याय दूर होईल !

अर्थात् मंगळसूत्राची लपवाछपवीहि मग अस्तित्वांत येणारच !...तो तर पुरुषजातीचा जुनापुराणा गुण ! कोणी तें सरकारी कोर्टाच्या बदिस्तपणाआड लपवेल तर कोणी जानव्यासारखें अडकवून...कांकीं ज्या पुरुषाला स्वतःला बायको असण्याची घटना लपविनां येते, त्याला मंगळसूत्र लपविणें कठीण आहे कां ?

●●●

स्त्रियांच्या मार्गांतील धोंडा–पुरुष !



— नलिनी सुखठण कर

पुरुषांसारखी 'लबाड' प्राण्याची जात अलम् दुनियेंत सांपडायची नाहीं. पुरुषांच्या साऱ्या पराक्रमाचा इतिहास म्हणजे बायकांना सपशेल फसवणं. पुरुषप्रणीत नाटक कादंबऱ्यांचा एकमेव विषय म्हणजे स्त्रियांना फूस लावण्याच्या कलेची सार्वजनिक जाहिरात. प्रेम. नायक एका गोंडस शब्दाभोंवतीं रुंजी घालून वक्तृत्वकलेत, लेखनकलेंत आणि अभिनयकलेंत पारंगत असणाऱ्या मेल्या पुरुषांनीं (अगदीं कपटी खल पुरुषांनीं) आदिपासून बायकांच्या शिकारीचा पणच उचलला आहे.

आणि त्यामुळें आम्हा बायकांची शिकार पूर्णपणें ताब्यांत- गवसेपर्यंत स्त्रिया म्हणजे 'ललना, देवता जगाच्या !' विधात्याचें गोड काव्य—अशी खोटी नाटीं विशेषणें पुरुषांच्या शब्दकोशांत तयार.

पण लग्नापूर्वी तारका भासणारी स्त्री लग्नानंतर पुरुषांना आपल्या मार्गांतील धोंड वाटायला लागते—

आणि याच न्यायानें (जशास तसे) लग्नापूर्वीं 'देवजी बुवा' वाटणारे हें नवरे लग्नानंतर धोंडोपंत वाटूं लागले तर बायकांचं काय चुकलं ?

पुरुषांच्या लबाडीची मखलाशी अशी कीं, बायकांची यथेच्छ चेष्टा करायची आणि नंतर बायकांना विनोदबुद्धि नाहीं असा शेरा बहाल करायचा.



गुदगुल्या—

ज्या मुलीची पुरुषांना प्रीति वाटते त्याच मुलीची स्त्रियांना भीति वाटते !

तरुणीचा हात ओठांवर धरणारा तरूण पोळ्याचं वेळांत तिच्या मुठींत ठेवतो.

प्रेम म्हणजे दारूची धुंदी. लग्न म्हणजे त्या धुंदींतील डोकेदुखी आणि घटस्फोट म्हणजे 'अस्पीन !'

आतां आम्हांला विनोदबुद्धि नाहींच, नसतेच-(हिला डोकं कमी आहे-हा शेरा कायमचा ऐकूं येणार)-जणूं काय डोक्याचा मक्ता ईश्वरानें 'यांनाच' दिलाय! डोक्याचा नसला तरी 'डोकीं करण्याचा' मक्ता मात्र पुरुषांनाच! मग अशा आम्हा बिनडोक लोकांच्या मागें तुम्ही कां लागतां? नुसतें मागेंच लागत नाहीं, तर आमच्या मार्गांत आडवे पडतां. लग्नापूर्वी आमच्या पायां पडतां-अक्षरशः ओंगळे होतां — आणि लग्ना-नंतरहि आमच्या 'मार्गांत' येतां-अगदीं अडखळून पडूं अशा धोंड्याप्रमाणें.

• म्हणून आम्हा बायकांच्या मार्गांत पुरुष म्हणजे धोंडा-अगदीं खडबडीत (नर्मदेतील शाळीग्राम असला तर वाटेंत थोडा 'हाता-ळला' तरी असता) पण हा अगदीं फत्तर. वाटेंत आला तर दूर कसा करायचा ही पंचाईत.

मला वाटतं धोंडोपंत हें पुराणीं नांव याचमुळें प्रचारांत आलं असावं. सुंदर स्त्रियांना खडे मारायची (डोळे आहेतच) संवय पुरुषांना फार प्राचीन काळापासून असावी. (पुरावा खाडिलकरकृत स्वयंवर) इतकंच काय पण गोकुळांतला कृष्ण (म्हणे पुरुषोत्तम) त्यालाहि गोपींच्या घागरी खडे मारून फोडायची वाईट सवय होती. पुण्यशील रामचंद्र चालतांना अडखळला तो एका दगडावरच पण अखेर जातीवर जाऊन त्यानें त्याची अहिल्या बनवून टाकली. या पुरुषांच्या कोशांत पाषाणाला फार प्रेमाचं स्थान आहे. प्रणयाच्या ऐन खोट्या भरांत प्रत्येक लबाड-पुरुष प्रत्येक स्त्रीचा तुझं हृदय पाषाणाच आहे असं म्हणून तिच्या नांवानं अक्षरशः 'खडे' फोडीत असतो.—

त्यामुळें आज खडे नाहीं पण पुरुषांच्या नांवानें भले मोठे धोंडे फोडायची ही संधि आलीय ती मी वांया घालवणार नाहीं—

आमचे हे (पुरुषच ते) म्हणतात कीं आम्ही पुरुष दगड असलो तर ते, तुमची मार्गातील प्रगती दर्शवून, मार्गदर्शन करणारे मैलाचे दगड आहोंत. ह्या दगडांतून निर्मळ निर्झर वाहतो. नाहींतरं तुमच्या सुखी संसाराचे ताजमहाली इमले, कटोखांचावर बहा-णाऱ्या आम्ही कोनशिला आहोंत. खरें असेल तें, कारण एवढा मोठा समारंभ होऊन, सरतेशेवटीं हा 'कोन-स्टोन' भटजींच्या शुभ हस्तें आमच्या जीवनांत बसतो. पण मग हे भटजी लोक, 'सावधान.' म्हणून शंख करून आम्हांस सावध कां करत असतात? चोराचीं पाऊलें चोराला माहित म्हणून!

आमच्या पुराण स्त्रियांना नी सुप्रसिद्ध पतिव्रतांना पुरुषाची चांगलीच प्रचिती आली आहे. द्रौपदीनें तर पांच पुरुषांचा अनुभव घेऊन पाहिला. सीतेच्या कपाळीं वनवास आला नी तिची राजसिंहासनावरून रामाच्या हृदयसिंहासनावरून नी एकंदर राज्यांतून उचलबांगडी होऊन, हकालपट्टी झाली. राणीपदाचें सुख कांहीं बिचारीला ह्या पुरुषांनीं उपभोगूं दिलें नाहीं. मेनकेला तर विश्वामित्रानें डोळ्यांसमोर आडवा धरलेला हात, लवकर तेवढाच आड, ...





दिल्ली

दिल्लीमधल्या बिल्ली तडक
फिरती गल्लोगल्ली
बोके त्यांचे घरीं येउनी
शोधित बसले किल्ली!

मुंबई

मुंबईच्या बंदरांत
उंदिर खातात खवा;
लोक मात्र 'आ' वासुनि;
खात बसति फक्त हवा!

मद्रास

मद्रासेंतिल इडली खाउन,
भद्रा काळी झाली;
भय्यालाही 'अय्या' म्हणुनी,
निद्रा तिजला आली!

कलकत्ता

कलकत्ता, कलकत्ता,
तेथ नसे अडकित्ता!
रसगुल्ला चावुनि मग,
देइल बाबू पत्ता!

पुणें

शहर पुणें, शहर पुणें,
'त्यांत असे काय उणें?'
वरळत चोव्यांत बहुत,
चघळित तोंडांत चणे!

सातारा

साताऱ्यांतील सतार सुंदर,
नसता तिजला तारा;
अजिंक्यतारा म्हणुनी चढतो,
कोणीही म्हातारा!

अलिबाग

अलिबागेच्या बागेमध्यें,
हल्लीं नाहीं अल्ली;
गल्लोगल्ली म्हणुनी त्याचीं,
फिरती चिल्लींपल्लीं!

— अनंत काणेकर

आजकालच्या, सिनेमाने टाळकीं फिरलेल्या टारगट टोणग्यांप्रमाणें, जेव्हां तीन देव अनुसयेचें सत्व पहायला गेले, तेव्हां तिनें त्यांचीं एकाचीं, तीन मुस्कटें करून टाकलीं.

दुष्यंतानें शकुंतलेशी काय प्रकार केला, नी त्यांतून निष्पन्न काय निघालें तें जगजाहीरच आहे. त्याकाळीं जर आपल्या पुराणस्त्रिया इतक्या बाळकल्या नसत्या, तर पुरुष इतके चढून बसले नसते! ह्या त्यांच्या लीनपणाचे परिणाम, आम्ही आतां भोगतों आहोंत!

पुरुषरूपी धोंड्यांना आम्ही पदोपदीं अडखळून ठेंचा खातो. माहेरी बाप-भाऊ-काका, नी सासरीं नवरा दीर-सासरा नी मुलगा हे आमचे सूडकरी आहेत. लहानपणीं बरोबरीचे भाऊ कसे अगदीं, तांदळांतील छोट्याछोट्या खड्यांप्रमाणें असतात! ते जसे भात खाल्ल्याचें सुख अनभवू देत नाहींत, त्याप्रमाणें हे जीवनाचें! ह्या सगळ्या पुरुषांकरतां स्त्रियांनीं स्वार्थत्याग करायचा, नी मनें मारायचीं! सगळ्यांचा छळ सोसायचा. त्यांतले कुणी ठेंचाळायला लावणारे खडबडीत खडक, तर कुणी टोचणारे अणकुचीदार दगड, कांहीं तर शुद्ध नर्मदेंतील गुळगुळीत गोटे! ह्यांच्या एकदोन दिवसाच्या खडबडीत दाढ्या, खुपणारे दाढीचे खुंट नी तुळतुळीत गोटे, त्यांच्या दगडी मनोवृत्तींच्या निशाण्या आहेत! लहानपणीं भावा बापाचा संसार, तरुणपणीं नवऱ्याचा संसार, नी म्हातारपणीं मुलाचा, नी दुर्दैवं असली तर, तर आणखी कुणाचा तरी संसार, ह्या संसाराच्या जंजाळांतच तिनें स्वतःला गुरफटून घ्यायचें, नी पुरुष तेव्हढे उधळलेल्या घोडाप्रमाणें, बाहेर उडाणटप्पूपणा करायला मोकळे ते मोकळेच. एखाद्या मुलीनें विचारानें 'करिअर' ची आकांक्षा धरली, तर हे मेले पुरुष, मोहिनी टाकून तिला संसाराचीं सुखस्वप्नें दाखवायला [illegible]! तीं पुढें स्वप्नेंच ठरतात म्हणा, नी डोळ्यांपुढें तारे चमकतात!


विवाहीत पुरुष ही एक प्रश्नचिन्हांकित समस्या आहे. ही जात फारच धाईट. 'साप म्हणू नये धाकला, आणि नवरा म्हणू नये आपला' ही म्हण निर्माण करणाऱ्याला काय वेड लागलें होतें? कांहीं सापांच्या विखारावर उपचार केल्यास, उतारही पडतो. पण पुरुष हा फुरशाप्रमाणें आहे. डुख धरून [illegible]णाऱ्या फुरशाचें वीष, अंगावर जन्मभर उठतें म्हणतात! पुरुष ही तसाच! धोंडा म्हणा, नाहींतर धोंड्याखालून निघालेलें फुरसें म्हणा, एकच तें! 'सोडलं तरी धरतंय, नी धरलं तरी चावतंय?' अशी कायशीशी म्हण आहे ना, ती पुरुषांनाच बरोबर लागूं पडते. ह्या पुरुषांमुळेंच लोकसंख्येची समस्या उत्पन्न झाली आहे. नि पंचवार्षिक योजनेंत, कुटुंब नियोजन नि संततिनियमन ह्या गोष्टी ठाण मांडून बसल्या आहेत. आतां ह्याहि गोष्टी काय सरकारनें पहायच्या? उद्यां म्हणाल, आमच्या तोंडांत सरकारनेंच घास घालायला हवा, नि परवां म्हणाल—तेव्हां देशांतल्या उदीम उद्योगधंद्यांना चालना देण्यासाठीं पुरुषांनी हें उद्योग करायचें आणि त्याची जबाबदारी उचलायची स्त्रियांनी नि शारिरीक-मानसिकरित्या हैराण व्हायचें! हा काय न्याय झाला?

सर्वच विवाहीत पुरुष, हे पुरुष असतीलच असें नाहीं! माझ्या म्हणण्याचा अर्थ, ते बायले, म्हणजे ताटाखालील मांजरें बनलेले असतील; पण हीं मांजरें, बोके म्हणा ना, कधीं नखें बाहेर काढतील नि खच्याचा गोळा लांबवतील, सांगतां येत नाहीं. इंग्रज लोकांत, अगर मुंबईच्या हायसोसायटींत, 'घरांत पॅन्ट कोण घालतं? Who wears the trousers in the house?' असें विचारण्याचा प्रघात आहे. हे गोगलगाई पुरुष, स्त्रियांच्या पोटांत शिरून त्यांना फसवतात, नि त्या भोळ्याभाबड्यांना वात्सल्याचा पुळका येतो. असे कांहीं पुरुष, तर कांहीं जमदग्नीचे अवतार!

पुरुषांच्या नानाप्रकारच्या छंदांमुळें स्त्रियांचे पाय संसाराला जखडले जातात. विडीकाडीचा, पत्त्यांचा, शेजारीपाजारी गोळा करून राजकारण लढवण्याचा, मित्रांचा मेळा जमवून चहा-चिवड्याचो चंगळ करण्याचा, तासन्तास पेपर वाचण्याचा वगैरे नाद भगिनींच्या त्रासास कारणीभूत होतात. सुख्यासुद्धां जणुं काय ह्या पुरुषांना, आपल्या बायकांनांच छळायला मिळतात. सदा बाहेर नि कचेरीच्या कामांत ह्याचें लक्ष! मैत्रणींना ह्यांच्या हजेरीत, घरीं आणण्याची सोय नाहीं! कांहीं करायचें असलें, तर आधीं ह्यांच्या वेळा संभाळायला हव्यात. लुगडे आम्ही नेसणार, पण निवडायचें यानीं! आम्हीं चेहऱ्याला रंगरंगोटी करण्यांत वेळ गमावायचा, नि ह्यांनीं दुसऱ्यांच्या बायकांचे चेहरे न्याहाळायचे आणि त्यांची स्तुति करायची! कधीं घरकाम करून अगर मुलांना संभाळून, स्त्रियांना करमणुकीकरतां, मंडळांत करायच्या समाजकार्याकरतां मोकळें सोडायचें नाहीं! घरची मोटर असली, तर ती सबंध दिवस कचेरींत अडकवायची! यांना बरें दिसावें म्हणून करायच्या रंगरंगोटीकरतां सुद्धां, ह्यांच्या खिशातूनच पैसे चोरून घ्यायला हवेत! नी स्वतःची कमाई स्वच्छंदानें उपभोगण्याचीही स्वतंत्रता नाहीं! पुरुषवाचकांनों, कळल्या कां महिलावर्गाच्या तुमच्याकडून काय अपेक्षा आहेत त्या? कान खोलून ऐका, नी डोळे फाडून वाचा!

कॉलेजांत कॉलेजकार्ट्यांचा, रस्त्यांवर रोडसाईड रोमिओचा, घरांत पुरुषनातेवाईकांचा, कचेरींत कारकुनांचा नी त्या इरसाल मेल्या फाजिल बॉसांचा, आणि सिनेगृहांत शिट्या मारणाऱ्या, मागील सिट्यांचा त्रास नी उच्छाद संपायचा तरी कधीं? ही पुरुषांची पीडा टळून पृथ्वी निर्पुरुष व्हायची तरी कधीं? तरी बरें हल्ली स्त्रिया पुरुषांसारख्या पॅण्ट घालून वावरायला लागल्यात, आणि पुरुषी कटचे केस कापून घेताहेत!

पुरुष आम्हांला अक्कलहुशारीनें कमी लेखतात. आमची टिंगल करतात, आणि आमचे मार्ग बंद करून टाकतात. पण आमचें आपलें कर्तबगारीचें काम पुढें चालू रहाणारच! त्यांच्या रोखण्याला आम्ही डरणार नाहीं! पुरुषांमुळें आम्हांस अनेक प्रांत पादाक्रांत करता येत नाहींत, अनेक क्षेत्रांत पदक्षेप करतां येत नाहीं, सांस्कृतिक संवर्धन नाहीं आणि उच्च पदांवर प्रस्थापित होतां येत नाहीं रात्रींबेरात्रीं ह्या पुरुषांमुळें बाहेर पडण्याची भीति, नी वाटेल त्या जागीं संचारबंदी! घरधन्यापासून रामागड्यापर्यंत सर्व पुरुषांना भ्यायला पाहिजे, नी त्यांची मर्जी राखायला पाहिजे! कां म्हणून? या पुरुषीपणाचा आम्ही धिक्कार करायला पाहिजे. मी नेहमी म्हणते त्याप्रमाणें 'पुरुषशाही मुर्दाबाद, 'डाऊन वीथ पुरुषीझम' अशासारख्या नेहमीच घसघशीत घोषणा करायला हव्यात आणि माझ्या म्हणण्याला, पुरुषांनीं जरी नाहीं, तरी स्त्रियांनीं मजबूत टेकू देऊन पुरुषीपणा नेस्तनाबूत करण्याचा विडा उचलला पाहिजे! स्त्रियांच्या हजारों पहारी जेव्हां कामाला लागतील, तेव्हांच हे मार्गातले धोंड हलतील, स्थानभ्रष्ट होतील, उचलले जातील!



कौटुंबिक विनोद

— मधु कर्णिक

शतगुणी तांबुल

— य. व. शास्त्री

कौटुंबिक विनोद—

मस्करी

[लेखक : बाळ सामंत, नवभारत प्रकाशन संस्था. किंमत ३ रुपये.]

'हंस,' मोहिनी' आदि मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या निवडक लेखांचा हा संग्रह मस्करी या नांवानें श्री. बाळ सामंत यांनी सादर केला आहे. मराठी मासिकांतून श्री. सामंत हे सातत्यानें विनोदी लेखन करीत आहेत. विनोदी लेखन करणें ही एक अवघड कला आहे. तें सर्वांनाच साधतें असें नाहीं. आणि त्यामानानें श्री. सामंत यांचा अशा तऱ्हेच्या मनमोकळ्या व आणि मिस्किल लिखाणावर चांगलाच हात बसला आहे.

मस्करी या लेखसंग्रहाचा सर्वांत मोठा गुण आणि कांहीं अंशानें दोष म्हणजे त्यांतील सोपेपणा. अर्थात् एक गोष्ट कबूल केली पाहिजे कीं या सोपेपणानें आचरटपणाची मजल गांठलेली नाहीं. मस्करीची भाषाशैली प्रसन्न खेळकर आणि कित्येक प्रसंगी चावा घेणारी आहे. सामंतांच्या विनोदाचें विश्व थोडें मर्यादित. 'कुटुंब संस्थेचा' मनमुराद उपहास हा मस्करीचा स्थायीभाव आहे. या पुस्तकांतील 'लग्नाला जातों मी' हा पहिलाच लेख शैली, मिस्किलता, खेळकरपणा आणि उपहास या सर्वच दृष्टीनें उत्कृष्ट आहे. आजकाल 'लग्न समारंभ' हा एक कसा फार्स झाला आहे याचें हें धावतें आणि विनोदी चित्रण वाचकांना अनेकवेळां हंसवील. या संग्रहांतील आमचा पहिला पाळणा, रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग हे लेखहि गंमतीदार आहेत. बायकांची मस्करी करण्यांत सामंत फार कुशल आहेत. आणि ती वाचून पुरुषांप्रमाणें बायकांनाहि खासच हंसूं येईल. विशेषतः मध्यमवर्गीय कुटुंब संस्थेचा लेखकानें केलेला उपहास आणि त्याच्या स्वयं-केंद्रित वृत्तीची केलेली मनमुराद थट्टा म्हणजे 'मस्करी'

हे लेख वाचीत असतांना वाचकाला हंसूं येतें केव्हां केव्हां गालाला खळ्या पडतात. अर्थात् ओक्साबोक्शीं हंसायला लावणारा विनोद यांत नाहीं. आचार्य अत्रे सोडल्यास असा तुफानी लेखक आज मराठींत नाहींच. पु. ल. देशपांडे, मं. वि. राजाध्यक्ष, वसंत सबनीस यांच्याहि लिखाणांत असा तुफानी विनोद नाहीं. आजचे विनोदी लेखक वाङ्मयीन प्रवृत्तीचे आहे. पु. ल. देशपांड्यांच्या विनोदांतील कांहीं भाग सर्वसामान्य वाचकांच्या डोक्यावरून जातो. वाङ्मयीन संकेतांचा उपहास ते संकेत जाणणाऱ्या वाचकांनाच समजतात आणि असें लिखाण मर्यादित वाचकांनाच समजतें. या संग्रहांत अशा तऱ्हेचे लेख नाहींत. कांहीं निवडक लेखनक्रिया हा एकच लेख वाङ्मयीन संकेतांचें विडंबन करणारा आहे. अर्थात् हें विडंबनहि कळायला फारसें अवघड नाहीं इतकें सोपें झालें आहे.

मस्करी या संग्रहांतील लेख एका विशिष्ट दृष्टिकोनांतून निवडले कीं काय याचा खुलासा लेखकाच्या निवेदनांत नाहीं. कारण नाहींतर मस्करी म्हणजे आजचे संसारचित्र—संसाराचें कठोर विडंबन आहे. अर्थात् त्यामुळें क्वचित् प्रसंगीं कांहीं लेखांत कल्पनांची पुनरुक्ति आढळते. आणि लेखक एकाच विषयाभोवतीं सारखा फिरतोय कीं काय असें वाटतें. सामंतांना विनोदी लेखनाची कला चांगलीच साधली आहे हें निर्विवाद. पण क्वचित्प्रसंगीं ते घाई करतात. लिहिलेल्या लिखाणावर परत हात फिरवित नसावेत कीं काय अशी शंका येते. शिवाय त्यांनीं आतां बायकांची मस्करी पुरे करावी. आपल्या विनोदाचा एक छाप बनवूं नये. विनोदी लेखकांचें छाप लवकरच बनतात आणि थोड्याच वेळांत ते वाङ्मयांतून 'औट' होतात. याचें उत्तम उदाहरण म्हणजे चि. वि. जोशी आणि कॅ. लिमये. एखाद्या कथालेखकाचें विश्व ठरतें आणि तो विषय संपला कीं तो कथाक्षेत्रांतून बाद होतो. हें भय विनोदी लेखकाला फारच जाणवतें. आणि यासाठीं विनोदी लेखकांनीं आपली मिस्किल नजर चौफेर वळवली पाहिजे. श्री. सामंत हे असेच चौफेर पाहातील तर त्यांच्या लेखणीला अजून पुष्कळ खाद्य आहे. वाचकांना हंसवण्याची ताकद त्यांच्या लेखणींत जरूर आहे. पण त्याचा पाहिजे तेवढा उपयोग त्यांनीं करून घेतलेला नाहीं. तो घ्यावा आणि आपलें लिखाण अधिकाधिक समृद्ध करावें यासाठीं एवढें विस्तारानें लिहिलें. आजकाल 'विनोदी' या छाप्या खालीं प्रसिद्ध होणाऱ्या बऱ्याच फुटकळ वाङ्मयापेक्षां मस्करीचा दर्जा कितीतरी पटीनें चांगला आहे हें निश्चित!

— मधु कर्णिक

शतगुणी तांबुल—

पानदान

[लेखक :—वसंत सबनीस]

मराठी वाङ्मयांतील विनोदी साहित्याचें दालन आकारमानानें फारसें मोठें नसलें तरी गुणमानानें महान् आणि समृद्ध आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांपासून तों अगदीं आजतागायताच्या निरनिराळ्या मराठी साहित्यिकांनी हें दालन समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. दरम्यानच्या काळांत विनोदी साहित्याचे निरनिराळे प्रकार मराठी वाङ्मयांतून [illegible] ळले गेले. त्या दृष्टीनें विनोदी साहित्या[illegible] आणि साहित्यिकांच्या कांहीं परंपराहि निर्माण होऊं शकल्या. [illegible] कोल्हटकरांची परंपरा आजपर्यंत अतुलनीय [illegible] त्यानंतर 'संपूर्ण बाळकरा[illegible]' रूपानें राम गणेश गडकरी यांनीहि [illegible] नव्या धर्तीचा विनोदी ललित वाङ्मय[illegible] प्रकार [illegible] केला. नंतर बरीच वर्षे विनोदी साहित्याच्या निर्मितीस खंड पडला होता आणि ती उणीव आचार्य अत्रे [illegible] लेख-

अनुक्रमणिका

ग्रीनें भरून काढली. आचार्य अत्रे यांनी विनोदी वाङ्मयाचा नवा पायंडा पाडला. त्यांचें हें साहित्य, पूर्वींच्या विनोदी साहित्यापेक्षां निराळें होतें. त्यांच्या पाठोपाठ चिं. वि. जोशी, कॅ. लिमये, शामराव ओक, प्रे. श्री. कोल्हटकर, 'R. W. D.' (दाते) पु. ल. देशपांडे, प्रभृतींनीं विनोदी वाङ्मयांत खूपच भर टाकली. त्यांच्याच जोडीला आज आणखी एक साहित्यिक मराठी वाङ्मयाच्या दालनांत उभे झाले आहेत आणि ते म्हणजे वसंत सबनीस ! श्री. सबनीस हे कवि ह्या नात्यानें मराठी वाचकांना पूर्वपरिचयाचे असले, तरी विनोदपूर्ण ललित साहित्य लिहिणारे लेखक म्हणून, गेल्या दोन-अडीच वर्षांतच ते वाचकांच्या निकट परिचयाचे झाले आहेत. ह्या अवधींत त्यांनी विनोदी वाङ्मयाची जी निर्मिति केली, ती निःसंशय स्पृहणीय ठरणारी आहे.

श्री. सबनीस यांच्या विनोदी लेखांचा संग्रह 'पानदान' ह्या नांवानें नुकताच प्रसिद्ध झाला आहे, 'पान स्वतः रंगते आणि खाणाऱ्यांनाहि रंगवितें' असें जें 'सुभाषित' श्री. सबनीस यांनी आपल्या पहिल्याच लेखांत रंगविलें आहे, तें अगदीं यथायोग्य असल्याची साक्ष, ह्या संग्रहांतील पुढील लेख वाचतांना मनाला पटते. 'पानदानांत' ठेवलेले त्यांचे हे विडे खरोखरीच शतगुणी तांबुलाची लज्जत आणणारे ठरले आहेत. ह्या सर्व लेखांतून त्यांची विनोदी वृत्ति इतक्या प्रखरतेनें प्रकट झाली आहे कीं, ते कवीहि होते आणि आहेत ह्याचा विसर वाचकाला पडावा ! मराठी साहित्यांतील विनोदी वाङ्मयाच्या सर्व परंपरा श्री. सबनीस यांनी आत्मसात केल्या, त्या त्यांनी आपल्या लिखाणांत उतरविण्याचा कौशल्यानें प्रयत्न केला आहे.

आजकालच्या जीवनाकडे पाहण्याची श्री. सबनीस यांची दृष्टि मोठी रोचक आहे जीवनांत प्रत्यहि घडणाऱ्या प्रत्येक लहानमोठ्या गोष्टींचा शोध ते कटाक्षानें घेत असलेले दिसतात. यंत्रयुगांतील आजचें मानवी जीवन अक्षरशः यंत्रासारखे झालें आहे. कृत्रिमताहि ह्या जीवनांत अमाप झालेली आहे. ह्या जीवनाचें चित्र 'अनिवार असा रविवार हवा' ह्या लेखांत श्री. सबनीस यांनी रंगविलें आहे. नित्याच्या जीवनातील घटनांना अशा रीतीनें श्री. सबनीस यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं चातुर्यानें रंगविलें आहे. 'मी तो गुलाम भारवाही' आहे हें स्पष्ट करतांना 'बायको' संबंधी ते म्हणतात—"नुसतं बायकोबद्दल बोलायचं म्हटलं तरी हिमालयाएवढं धैर्य लागतं. मग खरं बोलायचं म्हणजे केवढं धैर्य लागेल, हें तुम्हीच सांगायला पाहिजे शिल्लक नाहीं ! बायको म्हणजे आपलेंच ओंठ ! कोणत्या ओठानं सांगायचं ? परंतु बायकोबद्दल खरं बोलायची संधि माणसाच्या आयुष्यांत येते, यावर आजपर्यंत माझा विश्वास नव्हता; पण इंग्रजी म्हणींतील कुत्र्याप्रमाणें प्रत्येक नवऱ्यालाहि एकादा दिवस सोन्याचा होऊन भेटायला येतो. आयुष्यांत एकदांच येणारी ही पर्वणी आहे."—आणि मग 'बायको' संबंधीचें पुढील वर्णनें डोळ्याखालून घालीत असतांना हंसू आवरत नाहीं. 'ईश्वरसाक्ष खरं सांगतों' ह्या निबंधांतील साक्षीदाराच्या बाणीनें त्यांनी 'बायको' च्या बुटकेपणाचें वर्णन पुढील नेटक्या शब्दांत केलें आहे—"घरांतील कुठलीहि वस्तु चार फुटापेक्षां अधिक उंच जाऊं नये अशी मी खबरदारी घेत असतो. बायकोच्या बुटकेपणामुळेंच माझ्या संसाराची उंची निदान एक फुटानें तरी खालीं आली आहे. बऱ्याच वेळा मी बोललेलं बायकोच्या डोक्यावरून जातं याचं कारणहि हेंच आहे."

साहित्यांत विनोदाची निर्मिति करणें हें अवघड कार्य आहे. विनोदांतून समाजांतील व्यंगें अचूक करून दाखविण्याचें एक शास्त्र आहे. हें शास्त्र आत्मसात करण्यास अवघड आहे. मार्क ट्वेन अथवा जेरोम के जेरोम यांच्यासारख्या साहित्यिकांनीं हें शास्त्र फार पूर्वी निर्माण करून ठेवलें. 'मर्दांचें शिरोभूषण' ह्या लेखांत माणसाच्या डोक्यावरील टकलाचा महती वाचीत असताना हास्याच्या गुदगुल्या होतात. ते म्हणतात—"टक्कल हें सहसा स्त्रियांना पडत नसल्यामुळें टक्कल पडणें हे मर्दाचें काम आहे. शिवाय असंख्य पापें डोक्यावर घेऊन उजळ माथ्यानें फिरणारे लोक ज्या जगांत आहेत त्या जगांत निष्पाप टक्कल उघडें टाकून फिरण्यास मुळीच हरकत नाहीं." काटकसरीचें विनोदी मानसशास्त्रहि 'माझे पाकिट' ह्या लेखांत जसें रंगलें आहे, तसें आजारपण आणि वैद्य यांच्यावरील विनोदहि 'यावर उपाय नाहीं' ह्या लेखांत रामबाण ठरला आहे !


बहुरंगी महामुंबई—शांततापूर्ण सहजीवनांत व्यत्यय.

'पानदान' मधील एकंदर १३ लेखांतील 'माझे गुणी शेजारी', 'तापदायक तापहरणी' ह्या दोन लेखांतील विनोद, इतर लेखांतील विनोदाच्या मानानें प्रभावी वाटत नाहीं. त्याचप्रमाणें 'असा हा कन्हाडा' ह्या लेखांचीहि उपयुक्तता ह्या संग्रहांत साधूं शकत नाहीं. ह्या लेखांतील विनोदाचें माप थोडें कमी पडलें आहे आणि त्यांतील विनोदबुद्धीची प्रखरताहि थोडीशी ओसरली आहे.

एकंदरीत 'पानदान' म्हणजे साहित्याच्या मंगणातील कष्टाळू कलचा एक सुंदर नमुना आहे, असें म्हटल्यास हरकत होणार नाहीं.

य. बा. शास्त्री

अनुक्रमणिका

(पान १० वरून चालू)

चेहऱ्यावरची घडी बिघडूं न देतां शामदेवराव म्हणाले, " काल जरा जास्त झाली..."

" काय जास्त झाली ? "

ह्या प्रश्नाचें उत्तर ताठ आंगठा तोंडाकडे नेऊन मिटालें.

" नामू तुझ्या आईबापांनीं तुला कांहीं लाजलज्जा शरम ह्या गोष्टी असतात म्हणून सांगितलं नाहीं कारे ? "

" सायब पाण्डी नव्हा शिवा. पुढल्या धुन्याला चाळन होनार–"

" तीन तीन महिन्यांत पॅण्टच्या चाळणी कशा होतात ? "

" पाण्टची शीट पार उंचडगी–" पाण्टला दोन्ही बाजूनें टांगून दाखवीत नामूनें आपल्या विधानाला पुरावा जोडला.

" तुला काय करायचय त्याच्याशीं ? "

करड्यांचा हिशेब तो कधींच ठेवत नाहीं. नामू आला कीं, सुमारें अर्धा तास अशा कापडे की तेरा ह्याबद्दल त्याची आणि माझ्या पत्नीची हुज्जत चालते. दरवेळीं हरवलेल्या कपड्यांचे पैसे धुलाईत वळते करून घेण्याच्या धमक्या दिल्या जातात. मग पुढल्या खेपेला हरवलेल्या चादरी पलंगपोस हजर होतात.

" मग गेल्या खेपेला नाहीं काय म्हणालास ? "

" मानूस म्हणजे चूक हा व्हायचीच–शेवटी माणस हा अपूर्न "

" पुरे ! " पुढलें वाक्य मला ठाऊक आहे. कारण मीच लिहिलेल्या एका चित्रपटातला तो संवाद आहे. नामूला असे असंख्य संवाद व गाणीं पाठ आहेत. तो चित्रपटांची सगळी परिभाषा जाणतो आणि कुठेहि वापरतो.

" साहेब-यम्. डी. साहबांचं नवं पिक्चर पाह्यलं ? "

" नाहीं. "

" यकदम फॉग हाय. "

" काय आहे ? "

फॉग !..." कुठें तरी कॅमेरामनच्या तोंडून निघाला स्टॉक 'फॉग' निघाल्याचे त्यानें ऐकलेलें असतें. तेव्हांपासून 'वाईट' यासाठी इंग्रजी शब्द 'फॉग' आहे अशी त्याची समजूत आहे. " ऑक्टिंग फाग्–गानी तर आजिबाद फॉग्..."

" असं –"

" पहिल्या वीकलाच होल्डोर फिगरच्या खालीं गेलं साहेब ! "

" तुला काय ठाऊक होल्डओवर फिगर काय आहे तें ? "

" मिनर्व्हाच्या मॅनेजरचे कपडे आपल्याचकडे आहेत ना साहेब. त्यांणींच सांगि-लं. "

" मिनर्व्हाचे मॅनेजर पिक्चरचा बिजनेस काय झाला ते तुलाहि सांगतात वाटतं ? "

" त्याच्या डिस्ट्रिब्यूटरला सांगत होते आपण चोरून ऐकलं. "

" चोरून ऐकणें–" 'कपडे चोरणें'—दारू पिऊन 'जास्ती होऊन पडणें'...दिल्या शब्दाला न जागणें...वारंवार उसने पैसे मागणें...ते परत न करणें . ह्यांत कांहीं किमान 'लाज' वाटणारी लागते हें त्या इसमाच्या गांवीच नाहीं ! हा परोट कशानेंच मळत नाहीं. सदैव स्वच्छ ! चित्रपटाच्या मुहूर्ताला अत्यंत आगाऊपणानें सगळ्यांत पुढें नामू ! कचेरींत कांहीं कथेचा चर्चा अगर इतर व्यवहाराची बोलणी चालू असतांना आपण तिथे उभे रहाण्याचे कांहींहि कारण नाहीं याची त्याला जाणीवच नाहीं. बरें प्रतिष्ठितपणाची हौस नाहीं. पाठीवर



असं कां !

गेला लोटुनिया ऋतू तरि असा अंबा कशा मोहरे
कां तो कोकिळ या अवेळिं कुहतो निष्कारणें फालतू
लाव्हा कां उफळोनि येइ वरती या रुक्ष भूमितुनी
(तंबोरा जरि आडवा तरि कशा राहेच खुंटी उभी)

कपड्याचा गठ्ठा घेऊन गांवभर हिंडेल. आपण 'परीट' नाहीं याचा कुठे तरी न्यूनगंड आहे. म्हणून परीटघडीच्या संभावित लोकांत मिमळण्याचा प्रयत्न आहे म्हणावं तर तसंहि नाहीं. हा विधिनिषेधांच्या पलीकडे गेला आहे. त्याच्या त्या लोकविलक्षण सहजतेचा मला हेवा वाटतो. पाठीवरच्या कपड्याच्या ओझ्याखेरीज त्याला इतर कसल्याहि दडपणाची जाणीव नाहीं.

कुठल्यातरी एका इंग्रजी चित्रपटाला मी आणि माझी पत्नी गेलों होतों. कुठल्याहि मध्यमवर्गीयाच्या डरपोकपणाला साजेल असे वरच्या वर्गाचें तिकीट काढून बसलों होतों. काळोखांत कांही वेळानें माझ्या मांडीवर कुणीतरी थापटल्याचा मला भास झाला. अंधारांत मीं चमकून बाजूला पाहिलें.

"पी. एल. साहेब पान खानार ?" आवाज ओळखीचा वाटला. चित्रपटांतल्या अंधारांत कांहीं वेळानें आपल्याला दिसूं लागते. शेजारीं बुशशर्ट आणि पॅन्ट (अर्थात् दुसऱ्याची) घालून नामूराव बसले होते. मी निमूटपणें पान घेतलें.

"तंबाकू देऊं ?"

"नको—थुंकायची पंचाइत होते."

"खुर्चीखालीं मारा पिचकारी..." नामूचा सल्ला.

"चूप !"

"शू शू शू." समोरून कुणी तरी आवाज दिला.

"[illegible]ला—डाकुमेंट्रीत काय बघायचं असतं ? मेन पिचर [illegible]ल पडल्यावर सुरू होतं."

[illegible]नें इंटर्वल झाला. नामूच्या शेजारीं आमच्याच चित्र-[illegible] करणारी मध्यम वयाची एक्स्ट्रांतली बाई पदरविदर [illegible]मुरे एखाद्या सरदारकन्येसारखी बसली होती. मला पाहिल्यावर [illegible] मोठ्या थाटांत नमस्कारहि ठोकला.

"[illegible]नें [illegible]ची फ्यामिली !" नामूनें आमच्या कुटुंबाशीं तिची [illegible] करून दिली. कोल्हापूरला एका [illegible] आम्हांला [illegible]नारायणाशीं बोलावलं होतें त्यावेळीं [illegible] त्याची 'फ्यामिली' [illegible]

"हो कोल्हापूरला भेटलों होतों." आमची बायकोहि नामूला नको त्या सभ्य पातळीवर आणीत म्हणाली.

"ती निराळी—ही ष्टेपनी—" कुठेंहि संकोचाचा लवलेश स्पर्श नाहीं. मी आणि माझी पत्नी मात्र जागच्याजागीं संकोचलों.

"नामू" मी उगीच विषय बदलीत म्हटलें—"इंग्लिश पिक्चर ध्यें काय समजतं रे तुला ?"

"फुकट पास आहे !"

"ह्याहि मॅनेजरचे कपडे तूंच फाडतोस वाटतं ?"

"नाहीं डोरकीपरचे ! साहेब पण पिक्चर झकास आहे. लवशीन काय काय घातले आहेत. ट्राली निस्ती गार गार गार फिरवली आहे."

माझ्या सुदैवानें अंधार झाला आणि चित्रपट सुरू झाला. अधून मधून त्या अंधारांत नामू मला कोपरखळ्या मारून 'लांगशाट' 'क्लोजप' समजावून देत होता.

नामूचा ग्रहयोग काय आहे समजत नाहीं पण त्याला त्याची गिऱ्हाइकें सरावतात. परीट घराण्याचे सारे दोष त्याच्या अंगीं एक-वटले आहेत. पण आयुष्यांत त्याची चाल भलतीच सहज आहे. अगदीं गुरुवारी संध्याकाळीं काका हलवायापुढच्या दत्तमंदिराच्या भाऊगर्दीतून एखादा तेलाचा उघडा बुधला डोक्यावर घेऊन सायकलवरून शीळ घालीत वाट काढीत चालला तर पहाणाराचें जें होईल तें या नामूकडे पहातांना होतें. ह्याच्या खात्यांत कोठेंहि कसल्याहि तक्रारीची नोंद नाहीं. इतक्या वर्षांच्या त्याच्या परिचयांत त्यानें कुणाहिबद्दल चिडून बोलल्याचें आठवत नाहीं. किंवा आनंदानें फुलून गेल्याचे स्मरत नाहीं. तार ऑफिसांतलें कडकट्ट करणारे यंत्र जसें मृत्यूच्या आणि वाढदिवसांच्या तारा एकाच सुरांत निर्विकार-पणानें कडकड्वीत असते तसा हा नामू बोलतो. सिनेमाचे स्टुडिओ म्हणजे खऱ्याखोट्या खाजगी कहाण्यांचें आगर ! नामूच्या तोंडून कुठलीहि कहाणी ऐकतांना गोखल्यांच्या अंकगणितांतल्या उदाहरणां-इतकी ती 'साफ' होऊन येते.

"साहेब, काल अन्नासायबाला हातकड्या पडल्या !"

"कोण अण्णासाहेब ?"

"आपले नौग्रगचे !"

"कां ?" मी आश्चर्यानें विचारलें. वास्तविक ह्या 'अन्नानां' कधीं तरी हा सोहाळा भोगावा लागणार असा मला अंदाज होताच. पण तो मुहूर्त इतका लवकर धरला जाईल अशी कल्पना नव्हती. दुसऱ्या प्रोड्युसरच्या मालकीचे डबे चोरुन विकणें, त्याच्या जागीं स्टोअर्स-मधें रिकामें डबे ठेवणें—कुणाचे 'काळे' पैसे पांढरे करून देतो म्हणून सांगून देणाराचे डोळे पांढरे करणें, खोटे हिशेब मांडणें, एक्स्ट्रा लोकांचे पैसे हातोहात उडवणें वगैरे त्याचे बरेचसे पराक्रम होते. कपाळाला दत्ताचा अंगारा लावून-पदोपदीं 'विट्ठला पांडुरंगा' असें गळ्यांत विलक्षण कळवळा आणून म्हणणाऱ्या अण्णासाहेबांच्या हातांत हातकड्या पडल्याचें दृश्य माझ्या डोळ्यापुढें आल्यावर मला हंसूंच आलें.

“ सा म्हैनें जातील जास्तीत जास्त ! ” नामू माझ्या शर्टाची बटनें काढीत म्हणाला.

‘ कशावरून ? ’

“ आनखी किती जानार ?—दारु पिल्याबद्दल काय फांशी हाय ? ”

‘ आँ ? अण्णासाहेबांना दारु पिण्याबद्दल पकडलं ? ”

“ वैनी चादर फाटली आहे. आत्तांच दाखवून ठेवतो—”

“ तूंच फाडली असशील ” आंतून वैनीचा जबाब आला.

“ नामू चादर जाऊं दे--पण आण्णासाहेब दारु पीत होते—”

“ रोज !—कापडं मांडा. ”

“ आपल्याला पत्ता नाहीं !—कोण पुरवत होतारे दारु त्यांना–”

“ ल्याब्रोट्रींतला गणपत—दोन इजारी, सा न्हेरु शर्ट—” सगळी वाक्यें एकाच सुरांत.

“ नामू कपडे बाजूला ठेव—लॅबोरेटरींतला गणपत तो—”

“ यक डोळा काचेचा असल्याला-पायजम्याला नाडी नाहीं, धवून घ्या—”

“ अरे पण गणपत दारु कशी पुरवत होता—”

“ स्टुडिओच्या मागल्या बाजूला भट्टी लावल्यात...”

“ तुला काय ठाऊक ? ”

“ मी बी थितलीच पितो—”

यापुढें आमचे बोलणें खुंटलें. मनाची ही समतानता मी मी म्हणणाऱ्या संतांत मला आढळली नाहीं. तीन चार अक्षरांत याची वाक्यें संपतात. ज्या कथा स्टुडिओत माणसे चघळत चघळत बोलतात त्या नामू तीन चार वाक्यांत संपवतो.

“ साहेब कुरकळणी म्येला ! ” तीन शब्दांत नामूनें एका सकाळीं कपड्यांच्या घड्या मांडतांना कुलकर्ण्याला उडवला. वास्तविक कुलकर्ण्याची कथा अतिशय हृदयद्रावक होती. अशी बांसरी वाजवणारा चतूर कलावंत चित्रपट धंद्यांत माझ्या पहाण्यांत नाहीं. संगीत दिग्दर्शकांनीं एकदा चाल ऐकवली की श्यामू कुलकर्णीनें उचललीच. असे अचूक स्वर टिपायचा-नाजूक बुटकेलासा असणारा श्यामू अनेक वर्षे चित्रपटात बांसरी वाजवीत होता. अत्यंत अबोल--हंसरा; एखादी चाल चांगली झालेली असली की श्यामूचा चेहरा पहावा. त्याचे डोळे लखलखत—ओठ थरथरल्यासारखे होत. एखाद्या गोड हरकतीवर श्यामूची मान गाणाऱ्या पोरीसारखी हलायची. सर्वांना हव्याहव्याश्या असणाऱ्या ह्या पोरानें गळ्याला फांस लावून आत्महत्या कां केली हें खरोखरीच कुणाला कळलें नव्हतें. चित्रपट व्यवसायांतले दुष्ट आणि सुष्ट दोघेहि हळहळले होते. एका अत्यंत खट म्हणून नांवाजलेल्या निर्मात्यानें त्याच्या मरणानंतर त्याची उरलेली तीन चारशें रुपयांची बाकी श्यामूच्या म्हाताऱ्या आईला नेऊन पोहोंचवली होती. दोन तीन दिवस श्यामू कुलकर्ण्याची आत्महत्या हा सर्वांचा बोलण्याचा विषय होता. कांहींजण त्याच्या आत्महत्येचे खरें कारण आपल्याला माहित आहे पण उगीच कशाला सांगा असाहि भाव चेहऱ्यावर वागवीत होते. नामूनें ‘ कुरकळणी म्येला ’ असा त्याच्याबद्दलचा अत्यंत कोरडा अभिप्राय व्यक्त केल्यावर मी जरासा उडलोंच.

" नामू—कुलकर्णी म्येला काय म्हणतोस ? "

" तीस दिवस झाले ! "

" ते ठाऊक आहे मला !—त्यानें आत्महत्त्या केली—काय होतं बिचाऱ्याचं दुःख देव जाणें ! "

" त्याला कमलनी फशिवलं-खिशांत माचीस राहिली होती. " धुवायला टाकलेल्या विजारीतून काड्याची पेटी काढून माझ्यापुढें ठेवून नामू म्हणाला.

" कोण कमल ? "

" माणेमाच्या यष्टांतली ! " कोल्हापुरांत मामाचा नुसता मा होतो. माणेमामाचा माणेमा-शिंदेमा-साठेमा-लेलेमा वगैरे मराठी चित्रपट सृष्टींत फार नामवंत 'मा' होऊन गेले.

" कोण कमल—ती गोरटेली—"

" हां ! सफेद डोळ्यांची ! 'लाल कंदिल' पिक्चर मंदी साइड-हिरॉइनचं काम क्येल्याली ! "

" तुला सगळ्या गांवच्या गोष्टी ठाऊक ! "

" कुरकळगी आपलं गिऱ्हाइक आहे—" कुलकर्णी आतां 'म्येलाचं' नामू विसरला. " मी यकदां बजावलं होतं त्याला—"

" कशाबद्दल ? "

"कमलबद्दल ! ती..." कधीं नाहीं ती एक अस्सल गंगावेशीच्या आसपासची फर्मास शिवी हांसडून नामूनें त्या जोपांत कपड्यांचा गठ्ठा आवळला.

" तिला आतां ग्रामवेच्या इंडस्ट्रीत चान्स मिळाला. डेक्कणमंदी ती पंजाबी पार्टी आली होती दोन दिवस शूटिंगला त्याच्या डायरेक्टरनी नेस्ट पिक्चरची आफर दिली तिप..."

रेडिओच्या कोनाकोपऱ्यांत चाललेले संवाद जसे कानांत पडले तसे अत्यंत निर्विकारपणानें नामू ओतत होता.

"पण कुलकर्ण्याला जीव द्यायला काय झालं ? "

"मित्र, तिच्या आयला—" गठ्ठा पाठीवर मारून नामू निघून गेला.

आणि आमचा वस्त्रानुबंध आता तुटला. तो अजून इंडस्ट्रीत आहे, मी तिथून निघालों. इंडस्ट्री सुटली तरी माझे जुने स्नेही सहकारी सुटले नाहींत. अजूनहि जुन्या अड्ड्यांतून बसलों कीं कांहीं वर्षांपूर्वी ऐकलेले संवाद तसेच कानीं पडतात. कुणाचे कॉंट्रॅक्ट कुठें [illegible], कुणाची स्टोरी कुणी घेतली, [illegible] फायनान्सचं [illegible] आलं/आहे, कुठला डिस्ट्रीब्यूटर कुठलं पिक्चर घेतो आहे. [illegible] सर्वी मागसें त्याच उत्साहानें रंगवीत असतात. मी आतां त्या गटांत कांहींसा परका झालों आहे. कांहीं जुने स्नेही मात्र चिकाटीनें त्याच धंद्यांत टिकून आहेत. अजूनहि संध्याकाळीं 'जीवन मध्यें' कित्येक वर्षे असिस्टंट राहिलेली मंडळी चहाच्या कपाभोंवतीं सहसा सफल न होणारे बेत रंगवीत असतात. बऱ्याच वर्षांनीं मी परवां पुण्याला पुण्याला गेलों. एका टेबलाभोंवती अड्डा जमला होता. सर्वांनीं अतिशय आस्थेनें विचारपूस केली. " या नामदेवराव ! " एकानें आंत येणाऱ्या एका भक्कम मिशा वाढलेल्या भक्कम माणसाला आंत बोलावलं. " पी. एल. साहेब, ओळखलं कीं नाहीं ? " नामूला ओळखायला मला मिनिटभर लागलें.

" रामराम साहेब—"

" नामू ? प्रोड्यूसर बिड्यूसर झालास काय ? "

" हूं ! " नामू त्या मिशांत कसानाच दिसत होता.

" मिश्या खऱ्या कीं जावडेकरांनी चिटकवल्यात ? "

" वडून बगा ! " अड्ड्यांत जोरदार हंशा पिकला.

" भलताच जाडा झालास की—"

" सा म्हयने रेस्ट मिळाली—"

" रेस्ट ? "

" तुम्हांला ठाऊक नाहीं का पी एल ? " माझा एक जुना असिस्टंट डायरेक्टर म्हणाला.

" काय ? "

" नामदेवराव जाऊन आले. "

" कुठें ? "

" येरवड्याला —"

" येरवड्याला नव्हतो — नाशिकला. "

" जेलमध्यें जाऊन आलास—"

" सा महिने ! "

" कशाबद्दल ? "

" भट्टी लावल्याबद्दल ! "

"लेको आपली नेहमीची भट्टी सोडून ही भट्टी कशाला लावलीस—"

" साहेब, चालली असती तर पिक्चर काढलं असतं—"

" मग सध्यां ती भट्टी बंद की काय ? "

" ती कशाला बंद होईल ? तो काय सायकलवर गठ्ठा आहे ! " एका नव्या कोऱ्या सायकलच्या कॅरियरवर कपड्यांचा गठ्ठा बांधलेला होता.

" नवीन घेतलीस वाटतं सायकल ? " कुणीतरी विचारले.

" हो "

" केव्हढ्याला पडली ? "

तडजोड



ती बोलतां बोलूं नको,
कीं ऐकतां ऐकूं नको
डोळे मिटोनी घे सदा
तें पाहता पाहूं नको
राही मुका तुजसांगतो
तोंडास देईल तोंड ती
संसार करण्या साजरा
कर बापुड्या तडजोड ती

— कोंडबा

"साठ रुपयाला. डायमानोचे वीस शेरेट पडले."

"साठ रुपयाला? चोरीची दिसतेय्"

"त्या शिवाय साठाला नवी सायकल कोन देनार!" अगदीं पापणीचा केस देखील न हलवतां नामू म्हणाला, "साहेब. मुक्काम किती दिवस?"

"आहे आठवडाभर" माझ्या मनांत सहा महिने तुरुंगांत राहून देखील तस्साच राहिलेला हा इसम वादळ उठवून गेला होता.

"उतरलाय् कुठं?"

"इथंच जी नमतें."

"कापडं न्यायचा येऊं काय?"

"नको, मी लॉंड्रीत देईन. वेळेवर नाहीं आलास तर पंचाइत व्हायची."

"आर्जंट आनतो."

"नको--नाहीं आलास तर दिल्लीला पाठवावे लागतील तुला शर्ट."

"दिल्लीला कशाला पाठवायचे? तुमचे शर्ट आतां माझ्या अंगाला यतील. तुमच्या एवढी जाडी झाली की आपली."

आणि तरीहि मी मुकाट्यानें नामूला शर्ट धुवायला दिले. त्यानें ते मी आठ दिवसांनी पुणें सोडून निघेपर्यंत मला आणून दिले नाहींत. नक्षा तो ते निश्चित वापरीत असेल. मी पुन्हां कधीं पुण्याला गेलों की तो मला भेटेल. कोडगेपणानें "तुमचे शर्ट वापरून झाले साहेब." म्हणून सांगेल. मी त्याचें तोंड पहाणार नाहीं म्हणून त्याला सांगेन. आणि हे सांगून देखील पुन्हां त्याच्याचकडे शर्ट धुवायला देईन.

त्या हरामखोरांत हा काय असा गुण आहे हें कधींकाळीं कळेल असें मला वाटत नाहीं. सदैव काड्याच्या जगांत वावरणारा इतका नागवा माणूस माझ्या पहाण्यांत नाहीं! माझ्या पांढरपेशा परीटघडीच्या संस्काराला त्याचा रागहि येतो आणि कुठेतरी हेवाहि वाटतो--त्यांतच माझें नामू विषयीचें आकर्षण दडलें असावें!

१ ० ०

दीपावलींतील मुद्रणदोष [illegible]. 'रुडकी' चें सरकी. इत्यादि उदाहरणें दाखवितां येतील. तेव्हां हें प्रकार टाळावे. आपला,

त्र्यंबक फाटक, रुडकी, यू.पी.



शेवटचें पान

दीपावलीचें हे शेवटचें पान वाचकांसाठींच राखून ठेवलें आहे. दीपावलींत प्रसिद्ध होणाऱ्या मजकुरांबावत वाचकांच्या काय प्रतिक्रिया आहेत हे जाणण्यासाठीं दीपावली सदैव उत्सुक आहे. पत्रें सुटसुटींत छोटीं असावींत. त्यांत वैयक्तिक गाऱ्हाणें नसावें. टोपण नांवाखाली कोणतेंच पत्र प्रसिद्ध होणार नाहीं.

कलाविषयक मजकूर पाहिजे

स. न.

श्री. माधवराव सातवळेकरांचा लेख सर्वांना आवडला. विशेष असें कीं तो लेख स्कूल ऑफ आर्टच्या शिक्षकांनीं वारकाईनें वाचला आणि त्यावर चर्चाहि केली.

याच अंकांतील आर्ट सोसायटीच्या चित्र-प्रदर्शनावर जें परीक्षण लिहीलें गेलें आहे तें फारच त्रोटक वाटतें. या मासिकाचे संपादक-आपण स्वतः जातिवंत चित्रकार असल्यामुळें चित्रकलाप्रदर्शनावर, चित्रकलेवर वाङ्मयापेक्षां स्वतंत्र आणि विस्तृत मजकूराची आमची अपेक्षा आहे. प्रत्येक नव्या जुन्या चित्रकारानें दीपावलीच्या प्रत्येक आगामी अंकाची वाट पाहिली पाहिजे असा कलाविषयक भरगच्च मजकूर दीपावलीनें द्यावा ही सूचना.

आपला

ग. आ. गांगल चित्रकार

१० वसनजी पार्क मुंबई १४

वांघेसूद अंक

स. न.

फेब्रुवारीचा अंक आवडला. वांघेसूद [illegible] अंक अंतरंग आणि बाह्यांग [illegible] मनाची पकड घेतो. या अंकां[illegible] अनंत काणेकर यांचें प्रवासवर्णन व श्री

पु. भा. भावे यांचा आरंभ आणि अखेर, हा ललितलेख आवडला हें मुद्दाम नमूद करावेंसें वाटतें. आपला,

अनिल दि. फडके

उस्मानपुरा, औरंगाबाद.

पाणपोई अभिनव !

सा. न.

आपलें 'घातली पाणपोई' हें सदर अभिनव आहे. मात्र एक सूचना अशी कीं पुढील अंकीं कोण पाणपोई घालणार आहे हें आगाऊ प्रसिद्ध केल्यास त्यानुसार वाचकांना प्रश्न पाठवणें सोयीचें जाईल. आपला,

सुभाष प्रधान डोंबिवली.

सा. न.

आपल्या फेब्रुवारीच्या अंकांतील पाणपोईतील दीपावलीची स्तुति खटकली. अशा प्रकारच्या सस्त्या जाहिरातीचा मोह दीपावलीनें तरी टाळावा अशी प्रेमाची सूचना. अर्थात् उत्तरे लेखकानें पाठवली असें आपलें उत्तर मिळेल--पण त्याचें संपादन करणें आपल्याच हातीं ना ? आपली,

मोहना कोठारे, दादर.

भाषिक दत्तविधान

स. न.

फेब्रुवारीच्या अंकांतील 'भाषिक दत्तविधान' या श्री. बा. जोशी यांच्या लेखांतील पुढील चूक नजरेस आली.

Brahman Bull याचा अर्थ लेखकानें कुलशीलवान गाय असा दिला आहे तो चूक असून ब्राह्मण बुल म्हणजे हिंदुस्तानांतून अमेरिकेंत नेलेली गाईची जात आहे. ही जात कोरड्या आणि दुष्काळी भागांत जगूं शकते. [illegible]या जातीच्या ब्रह्म या हिंदी नांवावरून आलें आहे.

जुन्या लेखकांनीं निवृत्त व्हावें

स. न.

श्री. पिनाकि यांनी केलेलें दिवाळी अंकांचें धांवतें समालोचन वाचलें...एकूण आपल्याला नवोदित लेखकांविषयीं बराच प्रेमाचा पुळका आलेला दिसतो ? दीपावली मासिक यापुढें कांहीं नवोदित लेखकांना पुढें आणण्याचें सत्कार्य करील अशी आशा करतो. (अजून एखादा नवोदित लेखक पुढें आणल्याचें दिसत नाहीं.)

...क्रिकेटच्या क्षेत्रांत ज्याप्रमाणें खेळाडू आपली कारकीर्द संपली म्हणून निवृत्त होतो किंवा केला जातो, तद्वत ज्यांची प्रतिभा आटूं लागली आहे अशा लेखकांना पूर्ण विश्रांति द्यावी. किंवा जे पडेल लिहितात त्यांना विश्रांति घेण्याची विनंति करावी, तितका स्पष्टवक्तेपणा आजच्या कोणत्या संपादकांत आहे ?

इतर संपादकांपेक्षां आपण जरा वेगळे आहोंत असें दाखविण्याचा आपण प्रयत्न केला आहे पण मीं म्हणेन अशा किती नामवंत साहित्यिकांचें साहित्य आपण परत पाठवलें आहे ?" कळावें लो. अ.

आपला नम्र,

दीनानाथ सावे, शारदाश्रम, दादर.

[श्री. सावे यांच्या लांबलचक पत्रांतील महत्त्वाचा भाग येथें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. 'पिनाकि' यांचा लेख संपादकांनींच लिहिला आहे अशा सुरांत त्यांचें पत्र आहे. 'पिनाकि' हे निराळेच गृहस्थ आहेत आणि त्यांच्या सर्व मतांशीं आम्हीं सहमत नाहीं. दीपावलीचे जुने अंक चाळून पाहिले तर त्यांतील प्रत्येक अंकांत एकतरी नवा लेखक आढळेल. किती नामवंत साहित्यिकांचें साहित्य आपण परत पाठवलें आहे असा एक सावे यांचा प्रश्न. ज्या नामवंत लेखकांचें साहित्य दीपावलीनें परत पाठविलें त्यांचीं नावें प्रसिद्ध करणें शिष्टाचाराला सोडून आहे. पण श्री. सावे यांनीं आजूबाजूला जरा चाहूल घेतली तर त्यांना कळून येईल कीं उत्तम साहित्य नसलें तर दीपावली नामवंतांचीहि तमा बाळगीत नाहीं—**संपादक**

हें मासिक श्री. दीनानाथ दलाल यांनी [illegible] प्रिंटिंग प्रेस, ६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४ [illegible] दलाल [illegible] ४०/४२ केनेडी [illegible] येथें प्रकाशित के